




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार १४ मे २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## परदेश दौरे बंद अन् ताफा अर्ध्यावर; मुख्यमंत्र्यांचे कडक आदेश

### मंत्री-अधिकारी एक दिवस बस-मेट्रोने फिरणार

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक उर्जा संकट आणि इंधन बचतीच्या मोहिमेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःचा ताफा कमी करून देशासमोर एक आदर्श ठेवला आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्याच्या प्रशासनात काटकसरीचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री, मंत्री आणि वरिष्ठ अधिका-यांच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या आता थेट निम्म्यावर आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मंत्री, अधिका-यांचे विदेश दौरे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इंधन आणि परकीय चलनाची बचत करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दोन उच्चस्तरीय बैठका घेतल्या. या बैठकीला राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ अंमलबजावणीचे आदेश दिले आहेत. आता मंत्रालयातील बैठकांसाठी अधिका-यांना जिल्ह्यांतून मुंबईला यावं लागणार नाही, तर या बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतल्या जातील. महायुती सरकारचे सात महत्त्वाचे निर्णय-मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या ही तत्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्यात यावी. बाहेरच्या प्रवासात असताना ताफ्यातील वाहनांची संख्या निर्धारित संख्येपेक्षा अधिक नसेल याची जबाबदारी संबंधित पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक यांची असेल. (पान २ वर)



■ होर्डिंग्ज व फ्लेक्सवर कारवाई केली जाणार आहे.
■ लायटिंगचा वापर टाळून वीज वाचवण्यावर भर

## टीकेनंतर मोदींच्या ताफ्यातील गाड्या 50 टक्क्यांनी कमी

**नवी दिल्ली :** पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करावा आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, अशा जनतेला केलेल्या आवाहनांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पंतप्रधानांनी आपल्या अधिकृत ताफ्याचा आकार ५० टक्क्यांनी कमी केला आहे. याव्यतिरिक्त पंतप्रधानांनी वर्क फ्राम होमचे आवाहन केले आहे. खर्चात कपात करण्याची ही मोहीम आता भाजपाशासित राज्यांमध्येही जोर धरू लागली आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा (पान २ वर)



## प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या नाशिकात 35 हजार कोटींची कामे

# साधूग्राममध्ये दहा लाख साधू-महंत राहणार




**नाशिक/प्रतिनिधी-** प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या नाशिकातील त्र्यंबकेश्वरमध्ये सिंहस्थ कुंभमेळा भव्य व अविस्मरणीय करण्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विविध विकासकामे करण्यात येत आहेत.साधुग्राममध्ये १० लाख साधू-महंत राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून सिंहस्थासाठी येणा-या साधू, महंत व भाविकांसाठी पिण्याच्या आणि वापराच्या पाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पाण्याचा होणारा वापर लक्षात घेता सिंहस्थात २६० दशलक्ष लिटर पाण्याची प्रतिदिन वाढ होणार असून, या काळात सुमारे ९४० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा प्रतिदिन शहरात केला जाणार आहे. सध्या शहराला ५२० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो. त्यात वार्षिक सरासरी साडेपाच टक्के वाढ धरून सध्या ६८० दशलक्ष लिटर पाणी वितरण होत आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी मनपाने रस्ते आणि पाणी पुरवठा या दोन बाबी प्रामुख्याने हाती घेतल्या आहेत. दररोज होणा-या पाणी पुरवठ्यात वाढ करण्याबरोबर जलकुंभांची संख्या वाढवणे, नवीन जलवाहिन्या तसेच जुन्या व जीर्ण झालेल्या वाहिन्या बदलणे, जलशुद्धीकरण केंद्रांची संख्या वाढविण्यावर भर दिला आहे.शहराला सध्या प्रतिदिन ५२० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो. त्यात साडेपाच टक्के वाढ गृहीत धरून प्रतिदिन ५२० दशलक्ष लिटर पुरवठा सध्या शहराला केला जातो.

**व्यवस्था बळकट करणार-**शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था बळकट करण्याचा भाग म्हणून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्याच्या ११९ जलकुंभांव्यतिरिक्त सध्या शहरात ३० जलकुंभांची कामे प्रगतिपथावर केली जात आहेत. त्यात सर्वाधिक नउ जलकुंभांची संख्या पंचवटीत आहे. या ३० जलकुंभांची साठवण क्षमता ६० दशलक्ष लिटर इतकी होणार आहे.

## गडकरी बसने प्रवास करणार

**मुंबई-**पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करावा, महानगरात मेट्रोने प्रवास करावा असे आवाहन केले. मोदींच्या आवाहनानुसार, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आज मेट्रोने प्रवास केला. दुसरीकडे नितीन गडकरी बसने प्रवास करणार आहेत, तसेच आपल्या ताफ्यातल्या ५० टक्के गाड्या कमी करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर दिल्ली निवासस्थान ते विमानतळ मेट्रो असा प्रवास प्रताप जाधव यांनी मेट्रोने केला. यावेळी, त्यांच्या ताफ्यातील अधिकारी, कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकही मेट्रोनचे (पान २ वर)




# 'नीट'परीक्षा प्रकरण पोहचले सर्वोच्च न्यायालयात

### परीक्षा जुलैच्या दुस-या आठवडयात



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नीट युजी २०२६ परीक्षा रद्द करण्याच्या प्रकरणात फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन ने बुधवारी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली पुन्हा परीक्षा घेण्याची मागणी केली. दरम्यान नीटची परिक्षा येत्या जुलैच्या दुस-या आठवडयात होणार असल्याची माहिती खात्रीलायक सुत्रांनी दिली आहे. एफएआयएमएने म्हटले आहे की, नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) च्या कार्यप्रणालीवरील विश्वास आता उडाला आहे. त्यामुळे सध्याच्या गव्हर्निंग बॉडीची पुनर्रचना केली पाहिजे. दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करणारी सीबीआय महाराष्ट्रातील नाशिकला पोहोचली. आरोपी शुभम खैरनारला ताब्यात घेतले. तसेच, हरियाणाच्या गुरुग्राममधून बीएएमसी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याला राजस्थान पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. खरे तर, एनटीए ने १२ मे रोजी पेपरफुटीनंतर एनईईटी परीक्षा रद्द केली. एनटीएने कबूल केले की गडबड झाली आहे. ही परीक्षा (पान २ वर)


## कापून ठेवलेले कलिंगडामुळे मुलाचा मृत्यू



### चौघांची मृत्यूशी झुंज

**जांजगीर-चंपा/वृत्तसंस्था-**छत्तीसगडमध्ये उन्हाळ्याच्या सुट्टीचा आनंद लुटायला आलेल्या मुलांवर काळाने घाला घातला आहे. छत्तीसगडमधील जांजगीर-चांपा जिल्ह्यात कलिंगड आणि त्यानंतर चिकन खाल्यामुळे पाच मुलांना भीषण विषबाधा झाली. यामध्ये १५ वर्षांच्या एका मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, अन्य चार जण रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून मुंबईतला पायधुनी प्रकरणाची आठवण झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोडी दलहा येथील १५ वर्षीय (पान २ वर)

## कुंभच्या यशस्वी आयोजनासाठी निधी कमी पडू देणार नाही-मुख्यमंत्री



■ सिंहस्थ कुंभमेळासाठी प्रति आखाडा पाच कोटींचा निधी
■ साधू, महंत यांच्या मार्गदर्शनातून कुंभमेळ्याचे भव्य-दिव्य आयोजन



मुंबई, दि १३: नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा हा महाराष्ट्रासाठी सेवेचा आदर्श निर्माण करण्याची संधी आहे. आखाड्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रति आखाडा पाच कोटींचा निधी, छोट्या संस्थानसाठी प्रति संस्थान १५ लाख रुपये, आखाड्यांच्या वीज देयकाची प्राधिकरणाच्या माध्यमातून अदायगी, आखाड्याची जमीन शासकीय कामासाठी अधिग्रहित केल्यास आखाड्यांना मोबदला किंवा जमीन देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली.

कुंभमेळ्यासाठी जगभरातून येणा-या साधू, महंत व भाविक यांची सेवा करीत त्यांच्या मार्गदर्शनातून कुंभमेळ्याचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित सिंहस्थ कुंभमेळा आढावा बैठकीत सांगितले.बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कुंभ मेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले (पान २ वर)

## बारामतीत पुन्हा विमान दुर्घटना..!

**पुणे :** जिल्ह्यातील बारामती तालुक्यात पुन्हा एकदा गोजुबावी गावाच्या हद्दीत रेडबर्ड कंपनीचे प्रशिक्षणासाठी वापरले जाणारे विमान कोसळल्याने परिसरात एकच खळबळ



उडाली. सुदैवाने या अपघातात वैमानिक सुरक्षित असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे विमान प्रशिक्षणासाठी उड्डाण करत असताना अचानक तांत्रिक बिघाड झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र नेमके विमान कशामुळे कोसळले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पोलिस आणि संबंधित यंत्रणा तातडीने दाखल झाल्या.विमान कोसळल्यानंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दुर्घटनाग्रस्त विमान शेतजमिनीत पडल्याची माहिती मिळत आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. विशेष म्हणजे, याच गोजुबावी गावाच्या परिसरात यापूर्वीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला होता. त्यामुळे पुन्हा एकदा त्याच परिसरात विमान दुर्घटना घडल्याने चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, पोलिसांनी परिसराचा ताबा घेतला असून अपघातामागील नेमकं कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे.

## सीबीएससी बारावीचा निकाल जाहीर 85.20% विद्यार्थी ऊत्तीर्ण, गेल्या वर्षाच्या तुलनेत 3% कमी

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-**सीबीएससी म्हणजेच सेंट्रल बोर्ड ऑफ सेकेंडरी एज्युकेशनने १२वीचा निकाल जाहीर केला आहे. एकूण ८५.२० % विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. हे मागील वर्षापेक्षा ३% कमी आहे. यावेळी उत्तरपत्रिका ऑन-स्क्रीन मार्किंग सिस्टिम अंतर्गत तपासण्यात आल्या आहेत. उमेदवार सरबीएससी.जीओव्ही.इन वर आपला निकाल तपासू शकणार आहेत.जर विद्यार्थ्यांच्या मोबाईलमध्ये इंटरनेट नसेल किंवा सर्व्हर डाऊन असेल, तर विषयनिहाय गुण जाणून घेण्यासाठी एसएमएस पाठवून निकाल मिळवू शकतात. तथापि, ऑनलाइन स्कोअर कार्ड वैध मानले जाणार नाही. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतून मूळ गुणपत्रिका घेणे आवश्यक आहे. सीबीएससी बोर्ड गुणवत्ता यादी (मेरिट लिस्ट) जाहीर करत नाही. याव्यतिरिक्त, निकालात कोणताही टापर घोषित केला जात नाही. बोर्ड सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्थांना हे निर्देश देतो की कोणत्याही विद्यार्थ्याला शाळा किंवा जिल्ह्याचा टापर घोषित करू नये. त्रिवेंद्रम रीजनमध्ये ९५.६२% विद्यार्थी उत्तीर्ण झाले. जे देशभरात सर्वाधिक आहे. तर, प्रयागराज रीजन ७२.४३% निकालासह सर्वात खाली राहिला आहे. गेल्या वर्षीही त्रिवेंद्रमचा निकाल सर्वाधिक आणि प्रयागराजचा सर्वात कमी राहिला होता.



# 30 लाखात नीटच्या पेपरची विक्री

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी नीट पेपरफुटी प्रकरणात सत्ताधारी भाजपवर गंभीर आरोप केला आहे. भाजप नेत्याने ३० लाख रुपयांना नीटचा पेपर विकत घेतला आणि त्यानंतर त्याने तो लाखो रुपयांत विकून विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा बाजार मांडला अशी टीका करत सरकारवर संताप व्यक्त केला आहे. एनटीने गत ३ मे रोजी नीट २०२६ ची परीक्षा घेतली होती. पण हा पेपर फुटल्यामुळे ही परीक्षाच रद्द करण्यात आली आहे. आता ही परीक्षा पुन्हा घेण्यात येणार असून, त्याच्या तारखा नंतर जाहीर केल्या जाणार आहेत. या प्रकरणी लाखो विद्यार्थ्यांची मेहनत वाया गेल्याची टीका होत असताना आता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी थेट भाजपलाच आरोपीच्या पिंज-यात उभे केले आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले, देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारा नीट पेपर लीक घोटाळा हा भाजपच्या संरक्षणाखाली चालणा-या माफियांचा काळा चेहरा आहे.भारतीय जनता पार्टीचा नेता दिनेश बिंवाल याने ३० लाख रुपयांत नीटचा पेपर विकत घेतला आणि तो पुढे लाखो रुपयांत विकून विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा बाजार मांडला. सोशल मीडियावर पेपर फिरवून लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची थेट हत्या करण्यात आली.



दोन वर्षे रात्रंदिवस अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांना आज पुन्हा परीक्षा द्यावी लागत आहे, पण पेपर विकणारे आणि देशाच्या शिक्षण व्यवस्थेला काळिमा फासणारे लोक मात्र सत्तेच्या संरक्षणाखाली मोकाट फिरत आहेत. ही फक्त पेपरफुटी नाही, तर भाजपच्या काळात उभ्या राहिलेल्या भ्रष्ट व्यवस्थेची घाणेरडी वस्तुस्थिती आहे. २०२४ मध्येही पेपरफुटी झाली, आता पुन्हा तीच घटना घडली. म्हणजे पेपर लीक हा अपघात नाही, तर भाजप राजवटीत चालणारा संघटित व्यवसाय बनला आहे. लाखो कुटुंबांची स्वप्नं उद्ध्वस्त होत असताना भाजप सरकारला ना लाज, ना जबाबदारी. आज देशातील विद्यार्थी विचारत आहेत, मेहनत करणं चूक आहे का? कारण भाजपच्या राजवटीत गुणवत्ता हरते आणि माफिया जिंकतात, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

**विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा चुराडा- जयंत पाटील**

आमदार जयंत पाटील यांनीही नीटचा पेपर फुटल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा चुराडा झाल्याची टीका केली आहे. ते म्हणाले, भविष्यात डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणारे विद्यार्थी दहावीचा निकाल लागताच नीटच्या परीक्षेच्या तयारीला लागतात. सलग दोन वर्षे मेहनत करून बारावीच्या परीक्षेनंतर विद्यार्थी लगेच ही नीटची परीक्षा देतात. पण यंदाचा पेपर फुटल्याने विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा चुराडा झाला आहे.

**लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा अवमान** - रोहित पाटील

आ. रोहित पाटील यांनीही या प्रकरणी सरकारवर टीका केली आहे. नीट परीक्षेचा पेपर फुटणे हा केवळ तांत्रिक बिघाड नसून, लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा आणि त्यांच्या कष्टाचा घोर अपमान आहे. वर्षानुवर्षे मेहनत करणा-या ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या भविष्याशी असा खेळ खेळणा-यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे.

## एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांच्या घरावर बुलडोझर कारवाई

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमधून मोठी बातमी समोर आली आहे. नाशिक येथील टीसीएस धर्मांतर प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खानला आश्रय देणा-या एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांच्या घरावर कारवाई करण्यात आली आहे. अनेक दिवसांपासून निदा खान पोलिसांना चकवा देत फिरत होती. अखेर तिला पोलिसांनी गुप्त पद्धतीने छापा टाकत अटक केली. ती ज्या घरात राहत होती ते घर मतीन पटेल यांचं असल्याचं नंतर उघडकीस आलं. तसेच ते अनधिकृत असल्याचं देखील महानगरपालिकेने म्हटलं आहे. दरम्यान या घटनेने निदा खानचे राजकीय कनेक्शन असल्याचे समोर आले असून या प्रकरणात आणखी किती मासे गळाला लागणार हे (पान २ वर)








## टीव्हीके सरकारने केला विश्वासदर्शक ठराव मंजूर

**चेन्नई / वृत्तसंस्था-** तामिळनाडूमध्ये मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या टीव्हीके सरकारने विश्वासदर्शक ठराव मंजूर केला आहे. तामिळनाडु विधानसभेचे अध्यक्ष जेसीडी प्रभाकर यांनी ही घोषणा केली. १४४ आमदारांनी विश्वासदर्शक ठरावाच्या बाजूने, तर २२ आमदारांनी विरोधात मतदान केले. पाच आमदार अनुपस्थित होते.यापूर्वी, विश्वासदर्शक ठरावादरम्यान काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी सरकारला पाठिंबा दिला. विरोधी पक्ष डीएमके सभागृहातून सभात्याग करून मतदानापासून दूर राहिला. दरम्यान, भाजपने आपल्या एकमेव आमदारासह तटस्थ भूमिका घेतली. मुख्यमंत्री विजय यांनी विश्वासदर्शक ठरावासाठी प्रस्ताव मांडला. संबंधित पक्षांच्या सभागृह नेत्यांना प्रथम बोलण्याची संधी देण्यात आली. या कामकाजात एआयएडीएमकेचे महासचिव के. पलानीस्वामी यांनी विजय यांच्या सरकारला विरोध केला.



**डीएमकेचा सभात्याग-**बंडखोर पक्षाचे नेते एस. पी. वेलुमणी यांनी टीव्हीके सरकारला पाठिंबा जाहीर केला, तर पलानीस्वामी गटाने त्यांना विरोध केला. प्रमुख विरोधी पक्ष डीएमके सभात्याग करून मतदानापासून दूर राहिला.

**भाजपा राहिली तटस्थ-**काँग्रेस, सीपीआय, सीपीआय(एम), व्हीसीके, आययूएमएल आणि एएमएमके यांनी सरकारला पाठिंबा दिला, तर भाजपने आपली भूमिका तटस्थ असल्याचे सांगितले. चार आमदारांसह अंबुमणी रामदास यांच्या नेतृत्वाखालील पीएमकेने मतदानापासून दूर राहणार असल्याचे म्हटले.

### तमिळनाडू सरकारचा २४ तासात 'यू-टर्न'

## ज्योतिषी रिकी पंडित यांची ऊचलबांगडी

**चेन्नई / वृत्तसंस्था-**तमिळनाडूचे नवनियुक्त मुख्यमंत्री आणि तमिळगा वेत्री कझगमचे सर्वेसर्वा थलपती जोसेफ विजय यांनी सत्तेची सूत्रे हाती घेताच घेतलेल्या एका निर्णयाने संपूर्ण राज्यात खळबळ उडवून दिली. विजय यांनी आपले निकटवर्तीय, प्रसिद्ध ज्योतिषी आणि पक्षाचे प्रवक्ते रिकी राधन पंडित वेट्रिवेल यांची मुख्यमंत्री कार्यालयात विशेष राजकीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. मात्र, मित्रपक्षांचा तीव्र विरोध आणि टीकेची झोड उठल्यानंतर २४ तासांत ही नियुक्ती रद्द करण्याची नामुष्की त्यांच्यावर आली आहे.मंगळवारी प्रधान सचिवांनी जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार, रिकी राधन पंडित वेट्रिवेल यांची मुख्यमंत्री विजय यांचे राजकीय सल्लागार आणि समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. राजकीय रणनीती आणि प्रशासकीय कामात समन्वय राखण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली होती. एका ज्योतिषाला थेट सरकारी यंत्रणेत महत्त्वाचे पद दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले होते. विरोधकांसह मित्रपक्षांनीही या निर्णयाला विरोध केला. त्यानंतर आता बुधवारी यासंदर्भात अधिकृत निवेदन काढून नियुक्ती रद्द करण्यात आली.



तिरुपूर जिल्ह्यातील उथुकुली येथील रहिवासी असलेल्या वेट्रिवेल यांना ज्योतिष, अंकशास्त्र आणि ध्यानाचा ४० वर्षांहून अधिक अनुभव आहे. १९८९ मध्ये त्यांनी जयललिता मुख्यमंत्री बनतील, अशी भविष्यवाणी केली होती जी १९९१ मध्ये खरी ठरली. त्यानंतर जयललिता त्यांना आपले (पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# बकरी ईदच्या अगोदर गोवंशाचे टॅगींग करा -जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** बकरी ईदच्या दिवशी गोवंशाचा बळी देऊ नये, यासाठी पशूसंवर्धन विभागाने प्राण्यांचे टॅगींग करावे, यासाठी महापालिकास्तरावर टॅगींग करण्यासंदर्भात जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात प्राणीक्लेश समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, पशूसंवर्धन उपायुक्त डॉ. संजय कावरे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, गोवंशाच्या कत्तलीवर बंदी आहे. जिल्ह्यात कत्तलखाना नसल्याने अवैध कत्तलीचा प्रकार होऊ नये, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्यासोबतच नियमानुसार गोवंशाचे मांस बाळगणे आणि इतर राज्यातून मांसाची वाहतूक करणे गुन्हा आहे. गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी शहरात ८ ठिकाणी



चेकपोस्ट उभारण्यात आले आहे. गोवंश वाहतुकीसाठी नियम आहेत. त्यामुळे नियमानुसार वाहतूक होत नसल्यास प्राण्यांवरील क्रूरता या कलमाखाली गुन्हा नोंदविण्यात येणार आहे. गोवशांची कत्तल रोखण्यासह गोवंशाचे लसीकरण, आहार योजना परिणामकारकरित्या राबविणे आवश्यक आहे.

महापालिका क्षेत्रात विना टॅगींगची जनावरे टॅगींग करण्यासाठी जनजागृती करावी. त्यानंतर टॅगींग झालेली नाहीत, अशी जनावरे गोरक्षण संस्थांमध्ये पाठविण्यात यावी. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कत्तलीचे प्रकार रोखण्यासाठी जनावरांच्या अवैध वाहतुकीवर कारवाई करण्यात यावी. न्यायालयात प्रकरण सुरू असताना जप्त केलेले वाहन सोडण्यात येऊ नये, यासाठी न्यायालयात अर्ज सादर करावा. पोलिस आणि परिवहन विभागाने याबाबत कारवाई केल्यास अवैध वाहतूक करणाऱ्यांना धाक निर्माण होण्यास मदत होणार असल्याने परिणामकारक कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

अमरावती जिल्हा वकील संघाचा अभिनव उपक्रम

# दिवाणी न्यायाधीश परीक्षेसाठी मार्गदर्शन वर्ग व सराव चाचण्यांचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा वकील संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. प्रशांत आर. देशमुख यांच्या पुढाकारातून दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग (CJM/JMFC) पूर्व परीक्षा साठी मार्गदर्शन वर्ग व सराव चाचण्यांचे आयोजन करण्यात आले आहे.या अभिनव उपक्रमामुळे जिल्ह्यातील तरुण वकील तसेच न्यायव्यवस्थेत करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठी दिशा मिळणार आहे. न्यायव्यवस्थेत गुणवत्तापूर्ण आणि सक्षम न्यायाधीश घडविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेला हा उपक्रम सर्व स्तरातून कौतुकास पात्र ठरत आहे.ॲड. प्रशांत देशमुख यांनी पदभार स्वीकारताच हा सकारात्मक आणि दूरदृष्टीचा निर्णय घेतल्याने वकील संघामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या उपक्रमाअंतर्गत अनुभवी मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन, सराव चाचण्या तसेच परीक्षेची सखोल तयारी करून घेतली जाणार आहे.अमरावती जिल्हा वकील संघाने नेहमीच वकिलांच्या प्रगतीसाठी आणि न्यायव्यवस्थेच्या बळकटीसाठी कार्य केले असून, हा उपक्रम त्याच दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. सर्व वकील बंधू-भगिनींनी व विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावती जिल्हा वकील संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मध्यप्रदेशातून होणा-या दारू तस्करीवर कारवाई

## तीन वाहनांसह २५ लाखांचा मुद्देमाल जप्त; सहा आरोपी अटकेत

**अमरावती/प्रतिनिधीः-** मध्यप्रदेशातून चोरट्या मार्गाने अमरावती जिल्ह्यात आणल्या जाणा-या विदेशी दारूवर अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली. चिखलदरा घाटमार्गावर पोलिसांनी मध्यरात्रीनंतर रचलेल्या सापळ्यात विदेशी दारूने भरलेले वाहन आणि त्याला पायलटिंग करणाऱ्या दोन गाड्या पकडण्यात आल्या. या कारवाईत तब्बल २५ लाख ३२ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सहा आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.अमरावती ग्रामीण जिल्ह्यात मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणात अवैध विदेशी दारूची तस्करी होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. त्यानंतर पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अवैध दारू वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चिखलदरा पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना घटांग मार्गे विदेशी दारू आणली जाणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी घाटरस्त्यावर सापळा रचून संशयित वाहनांची वाट पाहण्यास सुरुवात केली. काही वेळात एकामागून एक तीन चारचाकी वाहने येताना दिसली. पोलिसांनी तातडीने ती वाहने अडवून तपासणी केली असता टोयोटा कारमध्ये 'ऑफिसर चॉईस' कंपनीच्या विदेशी दारूचे ४५ बॉक्स आढळून आले. प्रत्येक बॉक्समध्ये ९० एमएलच्या ९६ सिलबंद बाटल्या होत्या. या दारूची किंमत ३ लाख ७१ हजार ५२० रुपये असल्याचे निष्पन्न झाले. तपासादरम्यान दारू वाहतुकीला संरक्षण देण्यासाठी पुढे आणि मागे दोन वाहने पायलटिंग करत असल्याचेही उघड झाले. पोलिसांनी महिंद्रा बोलेरो आणि अन्य कारसह तीन वाहने जप्त केली.

आरोपींकडून १ लाख २५० रुपये रोख, सहा मोबाईल फोन आणि वाहने असा एकूण २५ लाख ३२ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या कारवाईत राजू संपतराव जनबंधू, किशोर रामाजी इंगळे, अभिषेक रामकिशोर गुप्ता, राजू श्रीओमप्रकाश शिवहरे, रामचंद्र धनपाल अमृते आणि विजय शिवचरण यादव या सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. सर्व आरोपींविरुद्ध चिखलदरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोउपनि सागर हटवार व पथकाने ही यशस्वीरीत्या पार पाडली. या धडक कारवाईमुळे अवैध दारू तस्करांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

MAHAVITARAN

E-TENDER NOTICE

Separate sealed Bids in prescribed forms are invited for execution of e-tender for hiring of vehicle for Amravati Testing Division under Amravati Circle for the year 2026-27 of Tender No. SE/AMT/OM/HOV/MVP2020/TESTING DIV/2025-26/T-35R The estimated cost of tender is Rs. 4.92 Lakhs. On line sale of Tender Documents on MSEDCL's website www.mahadiscom.in https://etender.mahadiscom.in from Dt. 13.05.2026 to Dt. 17.05.2026 upto 23.55 hrs. Last date for EMD payment is Dt. 17.05.2026 upto 17.00 hrs.

Email ID. seamravati2011@gmail.com

Contact person Executive Engineer (Adm) Tel. No 0721-2663640

PRO No.112

Superintending Engineer, M.S.E.D.C.Ltd. O&M Circle Office, Amravati

पान १ व १० वरून

## टीकेनंतर मोदींच्या ताफ्यातील गाड्या

आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांसारख्या नेत्यांनीही आपापल्या ताफयातील वाहनांची संख्या कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.

इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश

अलीकडील देशांतर्गत दौ-यांदरम्यान या उपाययोजनेची अंमलबजावणी करण्यात आली. वाहनांची एकूण संख्या कमी करण्यात आली असली तरीही आवश्यक सुरक्षा व्यवस्था एसपीजीच्या नियमावलीनुसार काटेकोरपणे कायम ठेवण्यात आली आहे. हैदराबादमध्ये दिलेल्या भाषणानंतर, गुजरात आणि आसामच्या दौ-यांदरम्यानही त्यांच्या ताफयाचा आकार याच पद्धतीने कमी करण्यात आला होता. पंतप्रधानांनी अशीही सूचना दिली आहे की, जिथे जिथे शक्य असेल तिथे त्यांच्या ताफयामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश करण्यात यावा; मात्र यासाठी केवळ याच उद्देशाने कोणतीही नवीन वाहने खरेदी केली जाउ नयेत, अशी अट त्यांनी घातली आहे.

उत्तर प्रदेशमध्ये योगींचा ताफा निम्म्यावर

इंधनाचा वाढता वापर आणि सध्याची जागतिक परिस्थिती लक्षात घेउन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही एक मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी स्वतःच्या ताफयाचा तसेच आपल्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या ताफयांचा आकार ५० टक्क्यांनी कमी करण्याचे तात्काळ निर्देश दिले आहेत. या ताफयांमधून सर्व अनावश्यक वाहने काढून टाकण्यात यावीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

मध्य प्रदेशात मोहन यादव यांच्या ताफयात फक्त ८ वाहने

मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या अधिकृत ताफयाचा आकारही कमी करण्यात आला असून, तो १३ वाहनांवरून घटून ८ वाहनांवर आला आहे. पुढील आदेश मिळेपर्यंत त्यांच्या सर्व शासकीय आणि अधिकृत दौ-यांसाठी वापरल्या जाणा-या वाहनांच्या संख्येवर मर्यादा असतील, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या दौ-यांदरम्यान कोणत्याही प्रकारच्या वाहन-रॅलींचे आयोजन केले जाणार नाही.राजस्थानमध्ये अनावश्यक वाहनांच्या वापरावर बंदी

राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी सरकारी खर्चाला कात्री लावण्यासाठी आणि इंधनाची बचत करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्र्यांनी आपल्या अधिकृत ताफयातील वाहनांची संख्या किमान पातळीवर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. याव्यतिरिक्त त्यांनी अनावश्यक वाहनांचा वापर टाळण्याचे आवाहनही केले आहे.

## गडकरी बसने प्रवास

त्यांच्यासोबत आले. शिवसेना खासदार आणि केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज दिल्ली निवासस्थान ते विमानतळ असा मेट्रोने प्रवास केला. यावेळी, तिकीट काढून ते स्वतः मेट्रोच्या एंट्रीवर लावल्याचंही दिसून आलं. आयुषमंत्री असलेल्या प्रतापराव जाधव यांनी आज विमानतळावर जाण्यासाठी शिवाजी स्टेडियम ते आयजीआय टर्मिनल ३ पर्यंतचा प्रवास मेट्रोने केला. तसेच यासंदर्भात दोन्ही मंत्रालयातील अधिकारी कर्मचारी यांना सूचना सुद्धा केल्या आहेत. केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनीही आपल्या ताफयातील गाड्या ५० टक्क्यांनी कमी करण्याच्या सूचना केल्या आहेत, तसेच पालखी मार्गाची पाहणी करताना ते बसने प्रवास करणार असल्याची माहिती आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्ग प्रकल्पाची पाहणी १४ आणि १५ मे २०२६ रोजी करणार आहेत. त्यावेळी ताफयातील गाड्या ५० टक्क्यांनी कमी करण्यात याव्यात अशी सूचना नितीन गडकरींनी पुणे प्रशासनाला केली आहे. तसेच पालखी मार्गाची पाहणी करताना सर्व सुरक्षा रक्षकांसोबत आपल्या लाल परीने म्हणजेच एसटी महामंडळाच्या बसने ते प्रवास करणार असल्याबाबत नितीन गडकरींनी नमूद केले आहे.

## 'नीट'परीक्षा प्रकरण पोहचले

३ मे रोजी झाली होती, ज्यात २२.७९ लाख विद्यार्थी सहभागी झाले होते.

**गडबड केली मान्य-** एनटीए डीजी अभिषेक सिंह म्हणाले की, या गडबडीसाठी आम्ही जबाबदार आहोत. परीक्षा पुन्हा घेतली जाईल. ६ ते ८ दिवसांत नवीन तारखेची घोषणा होईल. दुसरीकडे, केंद्र सरकारने या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवली. एजन्सीने या प्रकरणात एफआयआर दाखल केला. एनटीएने सांगितले की, भारत सरकारची मंजुरी मिळाल्यानंतर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**केरळमधून सीकरला पोहोचला-** एनईईटीचा पेपर प्रश्न बँकद्वारे लीक करण्यात आला. यात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांचे ३०० हून अधिक प्रश्न होते. हे सर्व हाताने लिहिलेले होते आणि त्यांची हस्ताक्षरेही एकच होती. तपास यंत्रणा शोध घेत आहेत की हा पेपर नेमका कुठून लीक झाला. तथापि, याचा खुलासा राजस्थानमधील सीकर येथून झाला.

## कापून ठेवलेले कलिंगडामुळे

अखिलेश धीवर आपल्या नातेवाईकांसह मामाच्या गावी एका लग्नासाठी आला होता. सोमवारी दुपारी १२ च्या सुमारास मुलांनी घरात ठेवलेले कलिंगड खाल्ले. त्यानंतर रात्री त्यांनी चिकनही खाल्ले. मात्र, दोनच तासांत मुलांचा वेदनेने ओरडण्याचा आवाज ऐकू येउ लागल्या. अखिलेशसह श्री धीवर, पिंटू धीवर, नरेंद्र आणि हितेश धीवर या सर्वांना अचानक उलटया, जुलाब आणि श्वास घेण्यास त्रास होउ लागला. कुटुंबीयांनी तातडीने त्यांना जिल्हा रुग्णालयात हलवले, पण दुर्दैवाने अखिलेशने वाटेतच प्राण सोडले. ड?क्टरांनी त्याला मृत घोषित केले.

कापलेले कलिंगड ठरले विष?

जिल्हा रुग्णालयाचे डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलांनी जे कलिंगड खाल्ले ते सकाळीच कापून ठेवण्यात आले होते. अनेक तास कापून ठेवलेल्या फळांमध्ये विषाणूंचा संसर्ग होण्याची दाट शक्यता असते. प्राथमिक दृष्टया हे प्रकरण फूड पॉयझनिंगचे दिसते. मुलांनी सकाळी कापलेले कलिंगड अनेक तासांनंतर खाल्ले आणि त्यानंतर इतर पदार्थही खाल्ले, ज्यामुळे संसर्ग बळावला असावा, असे डॉक्टरांनी सांगितले. प्रशासनाने व्हिसेरा नमुने आणि कलिंगड लॅबमध्ये तपासणीसाठी पाठवले आहेत.

**मुंबईतील घटनेची आठवण-** छत्तीसगडमधील या घटनेने काही काळापूर्वी मुंबईत घडलेल्या अशाच एका धक्कादायक घटनेची आठवण करून दिली आहे. मुंबईतही एका कुटुंबाने कलिंगड खाल्ल्यानंतर चौघांचा मृत्यू झाला

## ज्योतिषी रिकी पंडित

वैयक्तिक ज्योतिषी मानू लागल्या होत्या. विजय यांनी जेव्हा स्वतःचा पक्ष स्थापन केला, तेव्हापासून वेट्रिवेल त्यांच्यासोबत सावलीसारखे आहेत. २०२६ च्या निवडणुकीत विजय मुख्यमंत्री होतील, हे त्यांनी आधीच सांगितले होते.

पक्षाची निवडणूक रणनीती आणि सभांच्या तारखाही त्यांच्या सल्ल्यानेच ठरवल्या जात होते. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत १०८ जागा जिंकून विजय यांनी काँग्रेस,व्हीसीके, सीपीआय यांच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले आहे. मात्र, वेट्रिवेल यांच्या नियुक्तीमुळे मित्रपक्षांमध्ये नाराजी पसरली. आमदार वाणी अरासू यांनी विधानसभेत वि□ासदर्शक ठरावापूर्वी सरकारला आमच्या सरकारने वैज्ञानिक विचारांना महत्त्व दिले पाहिजे, अंधश्रद्धा किंवा ज्योतिषशास्त्राला नाही, अशा शब्दात सुनावले.मित्रपक्षांचा वाढता दबाव आणि ज्योतिषाची सरकारी पदावर नियुक्ती केल्याने टीका होत असल्याचे पाहून, मुख्यमंत्री विजय यांनी तातडीने वेट्रिवेल यांची नियुक्ती रद्द करण्याचे आदेश दिले.

## परदेश दौरे बंद अन् ताफा

राज्याचे मंत्री आणि सनदी अधिका-यांनी सध्या कोणतेही परदेश दौरे करू नयेत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.अत्यावश्यक कामाशिवाय मंत्र्यांनी शासकीय विमान किंवा हेलिकाप्टरचा वापर करू नये. त्याऐवजी नियमित व्यावसायिक विमानाने प्रवास करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

मंत्री आणि अधिका-यांनी मेट्रो किंवा बस यांसारख्या सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवावा. आठवड्यातून किमान एक दिवस असा प्रयोग करून जनतेसमोर आदर्श ठेवावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

अधिका-यांना बैठकांना बोलावण्याऐवजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठका घ्याव्यात. शासनात वितरित करण्यात आलेल्या वाहनांचा कोटेकोरपणे आढावा घेण्यात यावा. शहरांमधील अनावश्यक होर्डिंग्ज आणि फलेक्सवर कारवाई केली जाणार आहे. डेकोरेटिव्ह लायटिंगचा वापर टाळून वीज वाचवण्यावर भर दिला जाणार आहे.

अंमलबजावणीची जबाबदारी पोलिसांवर

मंत्र्यांच्या दौ-यात अनेकदा गाड्यांची मोठी रांग असते. याला चाप लावण्यासाठी पोलीस महासंचालकांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. ताफयातील वाहनांची संख्या ठरवून दिलेल्या मर्यादेतच राहील याची खात्री स्थानिक पोलीस प्रशासनाला करावी लागणार आहे.

## कुंभच्या यशस्वी आयोजनासाठी

आदी उपस्थित होते. बैठकीमध्ये कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी साधू महंतांनी दिलेल्या सूचना स्वागतार्ह असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, साधू, महंतांनी जे चांगले काम होत आहे, त्याचे कौतुक केले आहे. तसेच जे काम अधिक गतीने आणि परिणामकारक व्हायला पाहिजे, त्यासाठी सूचना केल्या आहेत. साधू महंतांच्या बैठकीतील सविस्तर चर्चेने कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी निश्चितच मदत होणार आहे. कुंभमेळ्याच्या व्यवस्थेसाठी बृहद नियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुढील वर्षी होत असलेल्या कुंभमेळ्याचे नियोजन आणि तयारी ही केवळ याच कुंभमेळ्यासाठी नसून ती पुढील १२ वर्षांनी येणा-या कुंभमेळ्यासाठी असणार आहे, या पद्धतीने आखलेल्या नियोजनाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पुढील काळात व्यवस्थेला या कुंभमेळ्यासाठी उभारलेल्या कामातूनच पुढील व्यवस्था उभाराव्या लागतील, अशा पद्धतीने काम करण्यात येत आहे. कुंभमेळा निमित्ताने नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात स्थायी स्वरूपात विकासकामे होतील, याचाच प्राधान्याने विचार होत आहे. कुंभमेळा हा भविष्यातही विस्तारणारा असल्याने त्या पद्धतीने व्यवस्थांची उभारणी करण्यात येत आहे.

त्र्यंबकेश्वर देशामध्ये अत्यंत महत्त्वाचे ज्योतिर्लिंग आहे. गोदावरी नदी उगमाच्या पवित्र सानिध्यामध्ये हा कुंभमेळा होत आहे. त्र्यंबकेश्वार मंदिर परिसरात क?रिड?रचे निर्माण करण्यात येणार आहे. यामुळे भाविकांना मोठ्या प्रमाणावर सुविधा होईल.

तसेच नाशिक येथील कुंड, रामकाल पथ, मंदिर, गुफा यांचाही जीर्णोध्दार करण्यात येत आहे. संपूर्ण नाशिक व त्र्यंबकेश्वार परिसरात अध्यात्म पूरक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. कुंभमेळा निमित्ताने आरोग्य व्यवस्थेचाही बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. येथे येणा-या प्रत्येक साधू, महंत व भाविक यांना आरोग्य विषयक कुठलीही अडचण होणार नाही, याची परिपूर्ण दक्षता घेण्यात आली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.आखाड्यांसाठी असलेल्या जमिनीमधील काही क्षेत्र प्रतिबंधित करण्याकरिता निश्चितच विचार करण्यात येईल. मागील कुंभमेळ्यापेक्षा यावेळेच्या आयोजनामध्ये गोदावरी नदीचे स्वच्छ स्वरूप आपणाला सर्वांना दिसणार आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर काम करण्यात येत आहे.

कुंभमेळ्याच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड नको -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

त्रंबके□ार सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी राज्यशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. हे आयोजन अत्यंत दिमाखदार स्वरूपात पार पडेल, असा वि□ास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त करीत या कुंभमेळ्याच्या सुरक्षतेबाबत कुठलीही तडजोड खपवून घेणार नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. भाविकांची सुरक्षा, सुविधा आणि आखाड्यांच्या मागण्यांबाबतही निर्देश दिले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, कुंभमेळ्यादरम्यान येणा-या भाविकांना किंवा सामान्य नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, अशी भूमिका आखाड्यांनी घेतली आहे. या निर्णयाचे स्वागत करत उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आखाड्यांनी दिलेली सूचना अतिशय स्वागतार्ह आहे. सर्वांच्या सहकार्यानेच हा सोहळा यशस्वी होईल.शासनाला सेवा करण्याची संधी मिळाली असून संपूर्ण प्रशासन एक 'टीम' म्हणून काम करत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे खंबीर पाठबळ असल्याने राज्य वेगाने पुढे जात आहे. मंदिरांचे पुनर्निर्माण आणि धार्मिक स्थळांचा विकास ही आमची प्राथमिकता आहे.

कुंभमेळ्यासाठी सध्या ३७७ एकर जमीन आरक्षित करण्यात आली आहे. मात्र, आखाड्यांनी अतिरिक्त जमिनीची मागणी केली असून, शासन त्याबाबत सकारात्मक आहे. कुंभमेळ्यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. भाविकांच्या सोयीसाठी आणि पायाभूत सुविधांसाठी आवश्यक तो सर्व निधी तत्काळ उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. सर्व सुरक्षा यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय राखून काम करावे, जेणेकरून कोणतीही अनुचित घटना घडणार नाही. गर्दीचे नियोजन आणि आपत्कालीन व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. कुंभमेळ्याच्या आयोजनात कुठेही उणीव राहणार नाही, याची दक्षता शासन घेत आहे,असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले. कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी सादरीकरण केले. बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, नाशिक येथील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, १३ आखाड्यांचे महंत व साधू उपस्थित होते. यावेळी आखाड्यांचे महंत यांनी विचार मांडले. बैठकीच्या सुरुवातीला त्र्यंबके□ार येथील मंदिराच्या दर्शन पथाचे ई भूमिपूजन करण्यात आले.

त्र्यंबकेश्वर दर्शन पथ प्रकल्प

एकूण खर्चः ?६६५ कोटी.

अखंड दर्शनासाठी एकेरी मार्ग प्रणाली.

टप्पेः पहिला टप्पा २७५ कोटी; दुसरा टप्पा ३९० कोटी.

९,००० भाविकांची क्षमता असलेले 'शिव दर्शन संकुल', वातानुकूलित ह?ल आणि एलईडी स्क्रीनची सुविधा.

५ मिनिटांत आपत्कालीन निर्गमन क्षमता आणि एआय-आधारित गर्दी व्यवस्थापन.

काळ्या पाषाणातील पारंपारिक मराठा शैलीतील बांधकाम.

शहरातील वाहतूक कोंडीत ८० टक्के घट आणि स्थानिक विक्रेत्यांचे पुनर्वसन.

## एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल

पाहणे महत्त्वाचे ठरेल. मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकमधील एका प्रसिद्ध आयटी कंपनीत लैंगिक अत्याचार आणि धर्मांतर सुरू होते. या प्रकरणातील मुख्य संशयित निदा खान काही दिवसांपासून फरार होती. पोलिसांनी तपासाची दिशा बदलत छत्रपती संभाजीनगरमधील नारेगाव परिसरात छापा टाकला आणि तेथून तिला अटक केली. तपासादरम्यान ती ज्या घरात लपून बसली होती, ते घर नगरसेवक मतीन पटेल यांच्या मालकीचे असल्याचे उघड झाले.

या धक्कादायक खुलाशानंतर पोलिसांनी मतीन पटेल यांच्याविरोधात गुन्हा दाखल करत तपास अधिक तीव्र केला आहे. दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत नाशिक महानगरपालिकेनेही त्यांच्या मालमत्तांची चौकशी सुरू केली. प्राथमिक तपासात पटेल यांच्या मालकीची दोन घरे आणि एक कार्यालय अशा तीन मालमत्तांचे बांधकाम विनापरवानगी आणि नियमबा असल्याचे आढळून आले.

महापालिकेने तीन दिवसांपूर्वी नोटीस बजावत संबंधित कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, दिलेल्या मुदतीत आवश्यक परवानग्या किंवा कागदपत्रे सादर करण्यात अपयश आल्याने आज सकाळी महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला. अधिकारी, कर्मचारी आणि पोलिसांच्या बंदोबस्तात पथक घटनास्थळी दाखल झाले आणि अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर फिरवण्यात आला.

या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून राजकीय वर्तुळातही चर्चांना उधाण आले आहे. पुढील काळात या प्रकरणात आणखी कोणते धागेदोरे समोर येतात आणि कायदेशीर कारवाई कितपत पुढे जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## साऊर येथे भीषण आग;

तसेच इतर संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. प्राथमिक अंदाजानुसार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून महसूल प्रशासनाकडून पंचनामा करण्यात आला.

घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून नुकसानग्रस्त कुटुंबाला तातडीची मदत देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## चांदुर रेल्वेत गोवंश तस्करी

१० हजार रुपये किमतीचे ७ गोवंशीय जनावरे मिळून आले. पोलिसांनी वाहन सह गोवंशला ताब्यात घेतले. गोवंशाची तातडीने वैद्यकिय तपासणी करण्यात आली असून त्यांना योग्य व्यवस्थापनासाठी गोशाळेत पाठवण्यात आले. आरोपी चालक इर्शाद खान व मालक शेख हारून शेख महबूब यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. चांदुर रेल्वेचे उपनिरीक्षक रोहित कुदळे, योगेश नेवारे, रवी भुताडे, संदीप वासनिक, निलेश गरजे, स्वप्निल परिहार यांनी ही कारवाई केली.

## अमरावतीत पुन्हा एमडीचा साठा जप्त;

वाडी गवळीपुरा, अमरावती) असे आहे. आरोपीकडून सुमारे ४ लाख ५ हजार रुपये किमतीचे एमडी आणि ६० हजार रुपये किमतीची एक्टिवा मोपेड जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे शहरातील ड्रग्ज पुरवठा साखळीवर आणखी एक आघात मानला जात आहे.

पोलिसांकडून आरोपीची कसून चौकशी सुरू असून, त्यामागे आणखी कोणते तस्कर किंवा नेटवर्क कार्यरत आहे का, याचा तपास केला जात आहे. तसेच एमडीचा साठा अमरावतीत कुठून आणला जात होता आणि तो कोणाला पुरविला जाणार होता, याचाही तपास गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

## शेतकऱ्याला हनी ट्रॅप मध्ये अडकून

आरोपी महिला आणि तिच्या पती विरूद्ध खंडणीसह विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला. पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे. माहिती नुसार शेतकऱ्याने आपली जमीन विकली आणि त्यातून त्यांना दोन ते अडीच कोटी रुपये प्राप्त झाले अशी माहिती आरोपींना होती. हे माहीत झाल्यावर आरोपी त्यांना पैशासाठी अधिक त्रास द्यायला लागले.

## बंद रुग्णालयातील पाण्याच्या

बोलावले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. दरम्यान, बंद रुग्णालयात संबंधित व्यक्ती कशी पोहोचली, मृतदेह पाण्याच्या टाकीत कसा गेला, तसेच या प्रकरणामागे कोणता गुन्हेगारी कट आहे का, याचा शोध नागपुरी गेट पोलीस घेत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजही तपासण्यात येत असून पोलिस सर्व शक्यता पडताळून पाहत आहेत. या घटनेनंतर पठाण चौक परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.

## पहाटे टोकन, दिवसभर उन्हात

वाढत्या उन्हात पिण्याच्या पाण्याची किंवा सावलीची कोणतीही सुविधा नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.नितेश इंण्डेन एजन्सीकडे सुमारे ७० गावांतील अंदाजे १६ हजार ग्राहक नोंदणीकृत असल्यामुळे एवढ्या मोठ्या क्षेत्रात प्रभावी वितरण करणे शक्य होत नाही. त्यामुळे अतिरिक्त ग्राहकभार कमी करण्यासाठी स्वतंत्र नवीन गॅस वितरक नेमण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदन देतेवेळी शुभम जवंजाळ, येलकीचे सरपंच जयंत करडे, प्रशांत पाटील, सौरभ कुरळकर, अफसर कुरेशी, बाळासाहेब महिंगे, पप्पू बोबडे आणि विलास भालाधरे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी ग्राहक हित लक्षात घेऊन योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले.

## आरोग्य अधिकारी जाधव व

स्वच्छतेच्या संदर्भात जारी करण्यात आलेल्या निविदांमध्ये भाग अ व भाग ब अशा कामांचा व स्थायी समितीच्या टिपणीमध्ये सुद्धा अटीशर्थी नमूद करण्यात आल्या आहे, परंतु या विषयांच्या कार्यवृत्तामध्ये योजनेतील वाहतुकीचा समावेश असलेला फक्त भाग यालाच समिती सभेने मान्यता प्रदान केली होती. कार्य वृत्तांत यातील डोअर टू डोअर कलेक्शन असलेला भाग व याचा कोणत्याही अटी शर्ती अथवा योजनेला सभेची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. त्यामुळे वैधानिक दृष्ट्या मनपा अधिनियम कलम ७३ क अन्वये स्थायी समितीची मान्यता प्राप्त नाही. कंपनी आणि आरोग्य अधिकाऱ्यांच्या मनमर्जीमुळे शहरातील स्वच्छतेचा धिंगाणा झालेला आहे. दहा लाख नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे. यामुळे दोषीवर कारवाई करण्याची मागणी पत्रकार परिषदेमध्ये मुन्ना राठोड आणि इतरांनी केली आहे.

# जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १४ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## दिव्यांग व ज्येष्ठनागरिकांनी मोफत कृत्रिम अवयव शिबिराचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

*श्री भगवान महाविर विकलांग सहायता समिती, दिल्ली यांच्या जयपूर फुट कॅम्प अंतर्गत दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत कृत्रिम अवयव तसेच विविध सहाय्यक उपकरणांचे वितरण करण्यात येणार असून जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.*



या उपक्रमाअंतर्गत दि. १८ मे २०२६ ते २५ मे २०२६ या कालावधीत तपासणी व साहित्य वितरण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील विविध दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी यांच्या समवेत आढावा सभा पार पडली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी विठ्ठल भुसारे, शासकीय दिव्यांग संमिश्र केंद्राचे अधीक्षक ज्ञानोबा पुंड आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निर्देश देतांना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, लाभार्थ्यांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच आवश्यक त्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना संबंधित यंत्रणांना दिल्या. तसेच जिल्ह्यातील दिव्यांग संघटनांनीही या उपक्रमासाठी आवश्यक ते सहकार्य करावे, अधिकाधिक गरजू लाभार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचवावी व शिबिर यशस्वी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे सांगितले.

जयपूर फुट कॅम्पच्या माध्यमातून व्हिल चेअर, चालण्याची काठी, कानाची मशिन, तिवई काठी (ट्रीपॉड), मानेचा बेल्ट, कमरेचा बेल्ट, मनगटाचा बेल्ट, टॉयलेट चेअर, चष्मा, वॉकर, गुडघ्याचा बेल्ट, कॅलीपर, शुज आदी विविध सहाय्यक साधनांचे मोफत वितरण करण्यात येणार आहे.

### शिबिराचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे

१) निवासी मतिमंद मुलांची कवठा कार्यशाळा, ता. रिसोड, जि. वाशिम दि. १८ मे २०२६ व १९ मे २०२६ वेळ: सकाळी १० ते सायंकाळी ५ संपर्क प्रमुख : रवि हरिमकर मो.क्र. ८८८८२०४३३७

२) जिल्हा परिषद हायस्कूल, ग्रामीण पोलीस स्टेशनच्या मागे, वाशिम दि. २१ मे २०२६ व २२ मे २०२६ वेळ: सकाळी १० ते सायंकाळी ५ संपर्क प्रमुख: कृष्णा सावसुंदर मो.क्र. ७३५०३३५५०७

३) पंचायत समिती, कारंजा, ता. कारंजा, जि. वाशिम दि. २४ मे २०२६ व २५ मे २०२६ वेळ: सकाळी १० ते सायंकाळी ५ संपर्क प्रमुख : सचिन अवटिक मो.क्र. ९६०४४३७७९५

शिबिरासाठी लाभार्थ्यांनी आधार कार्डची झेरॉक्स प्रत तसेच उपलब्ध असल्यास युडीआयडी कार्डची झेरॉक्स प्रत सोबत आणणे आवश्यक असल्याचे प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रीय अपंग विकास महासंघाचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

## पर्यावरण संवर्धनाचा ऐतिहासिक विजय


### १०९ झाडांना उच्च न्यायालयाचा स्थगिती आदेश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सार्वजनिक हित याचिका क्रमांक ३४/२०२६ मध्ये महत्त्वपूर्ण आदेश देत राष्ट्रीय महामार्ग १६१ वरील १०९ झाडांच्या तोडीस तात्पुरती स्थगिती दिली आहे. मा. न्यायमूर्ती रजनिश व्यास यांनी दिलेल्या आदेशानुसार १० जून २०२६ पर्यंत संबंधित झाडे तोडण्यास मनाई करण्यात आली आहे.

ही जनहित याचिका पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने लढा देणारे सामाजिक कार्यकर्ते सागर शंकर कोकास यांनी दाखल केली होती.मा..उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, मार्च २०२६ मध्ये झाडतोडीची अधिसूचना जारी झाली असली तरी अद्याप झाडे तोडण्यात आलेली नसल्याने पुढील सुनावणीपर्यंत संरक्षण देणे आवश्यक आहे.

तसेच या आदेशात १० जून २०२६ पर्यंत १०९ झाडांची तोड थांबविण्यात आली आहे. याचिकाकर्त्यास उर्वरित प्रतिवाद्यांना नोटीस बजावण्याचे निर्देश दिले असून पर्यावरणीय मुद्द्यावर न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. या लढ्यासाठी वाशीम येथील ॲड. डॉ.मोहन गवई यांनी मा.न्यायालयामध्ये प्रभावी कायदेशीर बाजू मांडत पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सागर कोकास यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि निसर्गप्रेमी भूमिकेमुळे हा मोठा विजय शक्य झाला.



'हा विजय केवळ १०९ झाडांचा नाही, तर आपल्या पुढील पिढ्यांच्या सुरक्षित पर्यावरणाचा विजय आहे. विकासाच्या नावाखाली बेकायदेशीर झाडतोड सहन केली जाणार नाही.' हा निर्णय पर्यावरण संरक्षणासाठी जनआंदोलन, न्यायव्यवस्था आणि

सामाजिक बांधिलकी यांचे प्रभावी उदाहरण आहे.

**सागर कोकास**
सामाजिक कार्यकर्ते, वाशीम

## यापुढे बुद्ध, आंबेडकरप्रामाण्यवादीच कविता टिकेल - महेंद्र ताजणे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विनोदिनी फाउंडेशन वेंगुर्लेचा पुरस्कार माझ्या कवितेला ऊर्जेचे पंख देणारा. मानवी मूल्यांच्या स्वप्नांसाठी आंदोलन उभारणारी कविता लिहिण्याचा मी 'खूप काही आणखी' या कवितासंग्रहाच्या अनुरोधाने प्रयत्न केलाय. क्रांतीज्योती, सावित्रीबाई फुले यांच्या कवितेच्या वाटेने जाणारी कविता या कवितासंग्रहात आपल्याला भेटेल. माणूसपण देणारी आणि माणूसपणाची सर्वव्यापी सौंदर्य जपणारी कविता हीच सर्वश्रेष्ठ कविता असते. यापुढे बुद्ध, आंबेडकर प्रामाण्यवादीच कविता टिकेल असे मनोगत पुरस्कारा दरम्यान कवी महेंद्र ताजणे यांनी व्यक्त केले. विनोदिनी आत्माराम जाधव फाउंडेशन इंगोले संस्थेच्या वतीने नुकताच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांना वेंगुर्ले येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करून शाल, स्मृतिचिन्ह रोख रक्कम, सन्मानचिन्ह अशा स्वरूपात पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## आंतरजिल्हा मोटारसायकल चोरट्यांच्या टोळीला बेड्या

### स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; ४ दुचाकींसह साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून सुरू असलेल्या धडक मोहिमेत वाशिम पोलिसांनी मोटारसायकल चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने तिन्ही आरोपींना अटक करून त्यांच्याकडून ४ मोटारसायकली, १ टेम्पो, मोबाईल, रोख रक्कम व चोरीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण ३ लाख ५५ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



पोलीस स्टेशन आसेगाव येथे फिर्यादी अतिश भगवान चवरे (वय २९, रा. दस्तापूर ता. मंगरुळपीर) यांनी त्यांच्या एमएच ३७ ए के ५३०३ क्रमांकाच्या होंडा शाईन मोटारसायकल चोरीची तक्रार दिली होती. याप्रकरणी आसेगाव पोलिसांनी अप.क्र. १३८/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांना गोपनीय माहिती मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि शेखर मास्कर व पथकाने १२ मे रोजी मानोरा तालुक्यातील साखरडोह येथून तिन्ही संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींकडून चोरीस गेलेली मोटारसायकल हस्तगत करण्यात आली. तसेच आरोपींनी अकोला जिल्ह्यातील अकोट फैल व दहीहांडा पोलीस ठाणे हद्दीतून प्रत्येकी एक मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. बुलढाणा जिल्ह्यातील बोराखेडी येथूनही दुचाकी चोरीसह घरफोडी करून दागिने व रोख रक्कम लंपास केल्याचे उघड झाले. याशिवाय वाशिम शहरातील लाखाळा परिसरातील पानटपरी फोडून चोरी केल्याची कबुलीही आरोपींनी दिली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे राहुल राजेश भगत (वय २१, रा. साखरडोह ता. मानोरा जि. वाशिम), अजय भारत डाखोरे (वय २१, रा. इंदिरा आवास, सोनगीरी झोपडपट्टी, बार्शीटाकळी जि. अकोला) व योगेश पप्पू तायडे (वय २१, रा. इंदिरा आवास, सोनगीरी झोपडपट्टी, बार्शीटाकळी जि. अकोला) अशी आहेत. सदर आरोपींना पुढील तपासासाठी आसेगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून जिल्ह्यातील आणखी मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षीरसागर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, पोउपनि शेखर मास्कर व त्यांच्या पथकाने केली.

## ईचा (नागी) येथील श्रीकृष्ण सिताराम राऊत 'महाराष्ट्र आयकॉन अवॉर्ड' पुरस्काराने सन्मानित



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील शेलुबाजार येथून जवळच असलेल्या ईचा नागी येथील रहिवाशी श्रीकृष्ण सिताराम राऊत यांना नाशिक अँग्रो केअर कृषी मंचाच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'महाराष्ट्र आयकॉन अवार्ड २०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अँग्रो केअर कृषीमंच नाशिक संस्थेच्या वतीने महाराष्ट्र आयकॉन अवॉर्ड पुरस्काराची घोषणा महाराष्ट्र दिन करण्यात आली होती या पुरस्काराचे वितरण नाशिक येथील आज यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ येथे करण्यात आले. या सोहळ्यात भारत सरकारकडून पद्मश्री व महाराष्ट्र राज्याच्या वनभूषण पुरस्कार प्राप्त मा चैत्राम पवार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू मा प्रा.संजीव सोनवणे, नियुक्त संचालक, फलोत्पादक कैलास मोते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, प्रकल्प संचालक आत्मा अभिमन्यू काशीद तसेच संस्थापक अध्यक्ष भूषण निकम यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थींना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षण व संगोपनासाठी तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अन्नधान्य व शालेय साहित्य घेण्यासाठी तीन लाख रुपयाचा धनादेश वितरित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी विविध जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची निवड करण्यात आली होती त्यामध्ये वाशिम जिल्ह्यातून श्रीकृष्ण सीताराम राऊत यांची निवड करण्यात आली.

## स्वाभिमान दिनानिमित्त रुग्णांना फळवाटप



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

दि. १० मे रोजी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार ?ड बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त 'स्वाभिमान दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर ग्रामीण रुग्णालय, मालेगाव येथे रुग्णांना फळवाटपाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास तालुका महासचिव राजुभाऊ जमधाडे, वंचित बहुजन आघाडीचे नेते तथा सरपंच कृष्णा देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष ॲड. किसनराव साळुंखे, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब खंडारे, तालुका अध्यक्ष सारनाथ अवचार, सामाजिक कार्यकर्ते रमेश टाले, गोविंद वर्मा, शहराध्यक्ष अमोल पखाले, ग्रामपंचायत सदस्य बाबुराव कांबळे, ग्रामपंचायत सदस्य गौतम गवई, सुरज गवई, जऊळका सर्कल अध्यक्ष वासुदेव कांबळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संघर्षावर मात करत शिक्षणाची नवी वाट

### २० वर्षांनंतर दहावी उत्तीर्ण; दोन मुलांसाठी आईची जिद्द

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■



मूळच्या वाशिम जिल्ह्यातील आणि सध्या मुंबई येथे वास्तव्यास असलेल्या संध्या महादेव वानंखडे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची जिद्द कायम ठेवत तब्बल २० वर्षांनंतर दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्यांनी यंदा ३८ टक्के गुण मिळवत दहावी पूर्ण केली.

संध्या वानंखडे या कर्मवीर भाऊराव पाटील रात्रशाळा, जोगेश्वरी पूर्व, मुंबई येथे शिक्षण घेत आहेत. लग्नाआधी त्यांचे नाव संध्या रामदास वैरागडे असून त्या मंगरूळपीर तालुक्यातील वनोजा येथील रहिवासी आहेत. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे त्यांना आठवीत असताना शिक्षण सोडावे लागले होते. मात्र शिक्षण अपूर्ण राहिल्याची खंत त्यांच्या मनात कायम होती. दरम्यान, २८ जानेवारी २०२२ रोजी त्यांच्या पतींचे निधन झाले. पतीच्या निधनानंतर दोन लहान मुलांची जबाबदारी त्यांच्यावर आली. त्यांना एक ८ वर्षांचा मुलगा आणि ६ वर्षांची मुलगी आहे.

या मुलांचे शिक्षण चांगले व्हावे याकरिता ये वाशिम जिल्हा मधून मुंबई येथे कामासाठी आले आहेत या आपल्या पोटच्या मुलांची शिक्षण चांगल्या दर्जाचे व्हावे तसेच यांच्या शिक्षणात कुठलाही व्यक्ती येऊ नये यासोबतच आपलेही शिक्षण घेता यावे याकरिता लागणारा पैसा काम केल्याशिवाय मिळत नाही यांनी या सर्व आव्हान स्वीकारण्यासाठी रोज सकाळी घरातील सर्व कामे करून मुलांना शाळेत सोडतात. त्यानंतर दिवसभर घरोघरी जाऊन घरकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. संध्याकाळी मुलांचा अभ्यास घेत स्वतः रात्रशाळेत शिक्षणासाठी जातात. रात्री उशिरापर्यंत घरकामे करूनही त्यांनी शिक्षणाची वाट सोडली नाही.

पतीच्या निधनाच्या दुःखातून बाहेर पडण्यासाठी आणि मुलांचे भविष्य घडवण्यासाठी त्यांनी शिक्षण पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. 'वडिलांची इच्छा होती की मुलांनी खूप शिकावे. त्यांचे ते स्वप्न पूर्ण करण्याचा मी प्रयत्न करत आहे,' असे त्या सांगतात.

## आई-वडिलांची सेवा करा; कलियुगात चांगले कर्मच तारणार- श्रीकृष्ण महाराज



■ प्रतिनिधी | वाशिम ■

आई-वडिलांची सेवा करा. कलियुगात माणसाला चांगले कर्मच तारणार आहे. संसारातील सर्व नाती क्षणभंगूर असून, येथे कोणीही कायमचे कोणाचे नसते. त्यामुळे मिळालेला मानवजन्म व्यसनात किंवा वाईट मार्गात न घालवता सत्कर्म आणि मातापित्यांच्या सेवेत घालवावा, असे प्रतिपादन मराठा सेवा संघ प्रणित संत नामदेव तुकाराम वारकरी परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त राष्ट्रीय कीर्तनकार हरिभक्तपरायण श्रीकृष्ण महाराज राऊत पाटील यांनी केले.

गोंधळसम्राट कलामहर्षी वैकुंठवासी उमेश कडोळे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित हरिकीर्तन कार्यक्रमात ते बोलत होते. रामगाव रामेश्वर येथील उत्तरवाहिनी अडाण नदीकाठी त्रिवेणी संगमावरील शिवालयाजवळ असलेल्या सिद्धगुरू श्री रामनाथ स्वामी महाराज मठात हा धार्मिक कार्यक्रम पार पडला. मागील वर्षी १९ जून २०२५ रोजी उमेश कडोळे यांचे निधन झाले होते. त्यांच्या वर्षश्राद्धानिमित्त आयोजित कार्यक्रमात श्रीकृष्ण महाराज राऊत यांनी सलग दोन तास हरिकीर्तन करून उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले.


## अकोला पोलीसांची 'डायल ११२' मध्ये राज्यात अव्वल झेप

### १० हजारांहून अधिक कॉल्सना तत्पर प्रतिसाद; एकही तक्रार प्रलंबित नाही

■ प्रतिनिधी | अकोला ■

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सुरू करण्यात आलेली 'डायल ११२' आपत्कालीन सेवा अकोला जिल्ह्यात प्रभावीपणे कार्यरत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अत्यल्प प्रतिसाद वेळ, तातडीची कार्यवाही आणि शून्य प्रलंबित तक्रारींच्या जोरावर अकोला पोलीस दलाने राज्यातील 'डायल ११२' सेवेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. पोलीस प्रशासनाच्या या कामगिरीमुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली डायल ११२ कक्षाने केलेल्या सातत्यपूर्ण आणि शिस्तबद्ध कामकाजामुळे ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाल्याचे सांगितले जात आहे. नागरिकांना पोलीस, अग्निशमन दल आणि वैद्यकीय मदत एकाच क्रमांकावर उपलब्ध करून देणारी ही यंत्रणा आज सर्वसामान्यांसाठी विश्वासार्ह ठरत आहे.



१ जानेवारी २०२६ ते ११ मे २०२६ या कालावधीत अकोला पोलीस दलाच्या डायल ११२ कक्षाकडे तब्बल १० हजार १६७ कॉल प्राप्त झाले. विशेष म्हणजे, प्राप्त झालेल्या प्रत्येक कॉलवर प्रभावी कार्यवाही करण्यात आली असून एकही कॉल प्रलंबित ठेवण्यात आलेला नाही. तक्रारींवर त्वरित प्रतिसाद देण्याच्या कार्यपद्धतीमुळे अकोला पोलीस दलाने राज्यात सर्वोत्तम कामगिरी नोंदविली आहे.

अधिकृत आकडेवारीनुसार, संपर्क अधिकारी (A) यांचा सरासरी प्रतिसाद वेळ २ मिनिटे ४९ सेकंद इतका नोंदविण्यात आला आहे. डिस्पॅच ऑफिसर (B) यांचा प्रतिसाद वेळ अवघा ५१ सेकंद असून, एमडीटी पथकाचा सरासरी प्रतिसाद वेळ ३ मिनिटे ४९ सेकंद इतका आहे. एकूण मिळून डायल ११२ सेवेत कॉल प्राप्त झाल्यानंतर अंतिम प्रतिसादासाठी सरासरी ७ मिनिटे ३३ सेकंदांचा कालावधी लागत असल्याची नोंद झाली आहे. ही कामगिरी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये सर्वोच्च ठरली आहे.

महिला अत्याचार, अपघात, चोरी, मारामारी, संशयास्पद हालचाली किंवा वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी तात्काळ ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अकोला पोलीस दलाने केले आहे. ही सेवा २४ तास कार्यरत असून संकटाच्या वेळी नागरिकांना जलद मदत पोहोचविण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

या यशाबद्दल पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी डायल ११२ कक्षातील अधिकारी, अंमलदार आणि बीट मार्शल यांच्या कार्याचे कौतुक केले. 'नागरिकांची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता आहे. प्रत्येक कॉलला तातडीने प्रतिसाद देणे हे पोलीस दलाचे कर्तव्य असून नागरिकांच्या सहकार्यामुळेच अकोला पोलीस दलाला हा मान मिळाला,' असे त्यांनी नमूद केले. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विशेष रिवार्ड जाहीर करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

अकोला पोलीस दलाने मिळविलेला हा राज्यस्तरीय बहुमान केवळ आकडेवारीपुरता मर्यादित नसून, नागरिकाभिमुख आणि उत्तरदायी पोलीस व्यवस्थेचे उदाहरण म्हणून पाहिले जात आहे. भविष्यात आणखी वेगवान, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित सेवा देण्यासाठी पोलीस दल प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १६६ ■ गुरूवार १४ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण



**मुंबई जनमाध्यम :** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांचा एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.

यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध आखाड्यांचे साधू, संत उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी यावेळी उपस्थित साधू संतांचे स्वागत केले.

नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाविषयी

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, 'मायगव्ह' आणि 'असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून या बोधचिन्हाची निवड करण्यात आली. २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मायगव्ह प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३,०६७ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या.

सहभागाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर राहिले, त्याखालोखाल दिल्ली आणि तामिळनाडूचा क्रमांक लागला. १८ ते २४ वयोगटातील तरुणांनी या स्पर्धेत सर्वाधिक सक्रिय सहभाग नोंदवला.

हे बोधचिन्ह नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या पवित्र भूगोल आणि धार्मिक परंपरांवर आधारित आहे.


भगवान शंकराचे त्रिशूळ: आध्यात्मिक उर्जेचे प्रतीक.

त्र्यंबकेश्वर मंदिर: प्रादेशिक वारशाचे दर्शन घडवणारी मंदिराची प्रतिकृती.

काळाराम मंदिराची कमान आणि गोदावरी नदी: गोदावरी नदीला 'शिवलिंगा'च्या रूपात दर्शविण्यात आले असून, ते कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित करते.

# सीबीएसई बारावी निकालात वर्धा जिल्ह्याची दमदार झेप

## केन्द्रीय विद्यालय पुलगाव कॅम्पचा शतप्रतिशत निकाल; भवन्स लॉयड्स व अल्फोन्सा स्कूलच्या विद्यार्थ्यांचीही चमकदार कामगिरी


**वर्धा जनमाध्यम:** सीबीएसई बारावी परीक्षेचा निकाल जाहीर होताच वर्धा जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये आनंदोत्सवाचे वातावरण पाहायला मिळाले. केन्द्रीय विद्यालय पुलगाव कॅम्प, भवन्स लॉयड्स विद्या निकेतन तसेच सावंगी (मेघे) येथील अल्फोन्सा स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालक, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापनात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

केन्द्रीय विद्यालय पुलगाव कॅम्पचा यंदाचा बारावीचा निकाल शतप्रतिशत लागला असून गुणवत्तापूर्ण निकालामुळे संपूर्ण परिसरात समाधान व्यक्त करण्यात येत आहे.


या शाळेत कु. प्रतिक्षा कुमारी हिने ९१.६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. साधना सारस्वत हिने ९०.६ टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. प्राची बिस्वाल हिने ९०.४ टक्के गुण मिळवत तृतीय स्थान प्राप्त केले. विद्यालय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत कुमार तसेच प्राचार्य सुनिल परदेशी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, भुगाव येथील भवन्स लॉयड्स विद्या निकेतन च्या विद्यार्थ्यांनीही नेत्रदीपक यश संपादन केले. विज्ञान शाखेत आदिती मून हिने ९२.६० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. वेदांत तपासे (९१.२० टक्के) द्वितीय, तर शिवम कमिला (८७.८० टक्के) तृतीय ठरला. वाणिज्य शाखेत ध्रुव राठी याने ९२.८० टक्के गुणांसह अव्वल स्थान पटकावले. युवराज सिग व रोहन गोरसीया यांनी ९१.६० टक्के गुण मिळवत द्वितीय, तर लौकिक बेद याने ९१.४० टक्के गुणांसह तृतीय स्थान मिळवले.

सावंगी (मेघे) येथील अल्फोन्सा स्कूल च्या विद्यार्थ्यांनीही बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. विज्ञान शाखेतील अन्वेश संतोष नगराळे याने ८५.२ टक्के गुणांसह शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. देवश्री अमीत वोरा हिने ८४.६ टक्के गुणांसह द्वितीय, तर नेहा राहुल दीडपाये हिने ८०.६ टक्के गुणांसह तृतीय स्थान पटकावले. शाळेतील एकूण ३७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे जिल्ह्यातील शैक्षणिक वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून विविध स्तरांतून यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विदर्भ भाजतोय... वर्धा पुन्हा 'हॉट'

## ४५ अंशांवर तापमान; उष्णतेने नागरिक हैराण, सायंकाळच्या सरींनी दिला क्षणिक दिलासा



**वर्धा जनमाध्यम :** विदर्भातील उष्णतेचा कहर दिवसेंदिवस तीव्र होत असून वर्धा जिल्ह्याचा पुन्हा एकदा सर्वाधिक तापमान असलेल्या टॉप-३ जिल्ह्यांमध्ये समावेश झाला आहे. बुधवारी जिल्ह्याचे कमाल तापमान तब्बल ४५ अंश सेल्सिअसवर पोहोचल्याने नागरिक अक्षरश होरपळून निघाले. एप्रिल महिन्यातच ३० वर्षांपूर्वीचा तापमानाचा विक्रम मोडणाऱ्या वर्ध्यात मे महिन्यातही उष्णतेचा तडाखा कायम असल्याचे चित्र आहे.

सकाळपासूनच सूर्याने आग ओकण्यास सुरुवात केली होती. दुपारपर्यंत उष्ण वाऱ्यांचा जोर वाढल्याने शहरातील मुख्य रस्ते ओस पडले होते. नागरिकांनी अत्यावश्यक कामांशिवाय घराबाहेर पडणे टाळले. बाजारपेठांमध्येही नेहमीपेक्षा कमी वर्दळ दिसून आली. उकाड्यामुळे शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि मजूर वर्गाला सर्वाधिक त्रास सहन करावा लागला.

दुपारनंतर शहरातील थंड पेये, उसाचा रस, लस्सी आणि आईस्क्रीम विक्रेत्यांकडे नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. यंदाची उष्णता मागील अनेक वर्षांपेक्षा अधिक तीव्र आहे, अशी प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास वर्धा शहरात अचानक पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. काही भागांत वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आणि उष्णतेने त्रस्त नागरिकांना काही काळासाठी दिलासा मिळाला. मात्र हा दिलासा तात्पुरताच असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात येत असून पुढील काही दिवस तापमान उच्चांकी पातळीवर राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# थंडावा देणाऱ्या कुलरनेच हिरावला संसाराचा आधार

## विजेच्या धक्क्याने शीतल चावडा यांचा मृत्यू

**हिंगणघाट जनमाध्यम-** उन्हाच्या तीव्र झळांपासून दिलासा मिळावा म्हणून घरात सुरू असलेला कुलरच एका कुटुंबासाठी मृत्यूचा सापळा ठरला. हिंगणघाट शहरातील न्यू यशवंत नगर, झाशी राणी चौक परिसरात घडलेल्या हृदयद्रावक घटनेत विजेच्या धक्क्याने ४० वर्षीय विवाहित महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून चावडा कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.मृत महिलेची ओळख शीतल प्रितेश चावडा (वय ४०) अशी झाली आहे. सोमवारी दुपारी सुमारे दोन वाजताच्या सुमारास त्या घरातील कुलरजवळ काम करत होत्या. त्यावेळी अचानक कुलरमध्ये वीजप्रवाह उतरल्याने त्या जबर विजेच्या धक्क्याच्या संपर्कात आल्या. काही क्षणातच त्या बेशुद्ध पडल्या. घरातील सदस्यांनी आक्रोश करत त्यांना तातडीने हिंगणघाट उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.घटनेची माहिती मिळताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. नेहमी हसतमुख आणि मनमिळावू स्वभावाच्या शीतल चावडा यांच्या अकस्मात निधनाने नातेवाईक व शेजारी भावूक झाले. एका क्षणात आनंदी संसार उद्ध्वस्त झाल्याने परिसरातील नागरिकांनी तीव्र दुःख व्यक्त केले.

# लग्नाचा आनंद क्षणात मातमात

# भीषण अपघातात पती-पत्नी जागीच ठार; चार वर्षांची चिमुकली मृत्यूशी झुंज देतेय




**हिंगणघाट जनमाध्यम-** लग्नसमारंभाचा आनंद घेऊन घरी परतणाऱ्या एका कुटुंबावर काळाने क्रूर घाला घातला. भरधाव ट्रकने दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांची चार वर्षांची चिमुकली गंभीर जखमी झाली आहे. हिंगणघाट शहराजवळ रात्री घडलेल्या या हृदयद्रावक अपघाताने संपूर्ण परिसर हादरला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, इंदिरा गांधी वॉर्ड येथील रहिवासी यादवराव बापूराव सलाम (वय ३५), पत्नी विद्या यादवराव सलाम (वय २७) आणि मुलगी पूर्वा (वय ४) हे आपल्या स्कुटी क्रमांक ॱ-३२ ॱ-२२६५ ने वरोरा येथे नातेवाईकांच्या लग्नासाठी गेले होते. रात्री ते परत हिंगणघाटकडे येत असताना कुटीर रुग्णालयाजवळील पुलावर वळण घेताना नागपूरकडून हैदराबादकडे जाणाऱ्या भरधाव ट्रक क्रमांक ॱ-४७ ॱ-४७२६ ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की यादवराव आणि विद्या सलाम हे ट्रकच्या मागील चाकाखाली येऊन जागीच ठार झाले. तर चार वर्षांची पूर्वा दूर फेकली गेल्याने गंभीर जखमी झाली. तिला तातडीने सेवाग्राम रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर ट्रक चालक वाहन जागीच सोडून फरार झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, कलोडे चौक ते कुटीर रुग्णालयादरम्यान पुलाचे बांधकाम सुरू असल्याने या मार्गावर एकेरी वाहतूक सुरू आहे. राष्ट्रीय महामार्ग, रुग्णालय परिसर आणि दाट नागरी वसाहत यामुळे येथे कायम वाहतुकीचा ताण असतो. मात्र वाहतूक नियंत्रणासाठी ट्रॅफिक पोलिसांची अनुपस्थिती असल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. निष्काळजी व्यवस्थेने एका कुटुंबाचा बळी घेतला, अशी भावना परिसरातून व्यक्त होत आहे.

# शिक्षण राज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात शिक्षणाचा नवा प्रयोग मांडला ग्रामपंचायतीचा धडाकेबाज निर्णय

## गावची शाळा वाचवा ; घरकर माफीच्या निर्णयाने मांडल्याची राज्यभर चर्चा



**वर्धा जनमाध्यम :** शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच आता ग्रामीण शिक्षण वाचविण्यासाठी एका सरपंचाने नवा अध्याय सुरू केला आहे. खासगी शाळांच्या वाढत्या मोहामुळे ओस पडत चाललेल्या जिल्हा परिषद शाळांना पुन्हा जीवदान देण्यासाठी आर्वी तालुक्यातील मांडला ग्रामपंचायतीने धडाकेबाज निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषद शाळेत मुलांना प्रवेश द्या आणि घरकर माफ करा, असा भन्नाट फंडा ग्रामपंचायतीने जाहीर करत संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधले आहे.

गावातील पालकांनी आपल्या पाल्यांना पहिली ते चौथीपर्यंत जिल्हा परिषद शाळेत प्रवेश दिल्यास त्या कुटुंबाचा एका वर्षाचा घरकर माफ करण्यात येणार असल्याचा ठराव ग्रामपंचायतीच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. त्यानंतर गावात दवंडी देऊन जनजागृती सुरू करण्यात आली असून शिक्षण वाचविण्यासाठी ग्रामपंचायत थेट मैदानात उतरली आहे.



इंग्रजी शाळांच्या झगमगाटात ग्रामीण शिक्षणाचा पाया हादरत असताना मांडला ग्रामपंचायतीने मात्र गावची शाळा टिकली पाहिजे, अशी ठाम भूमिका घेतली आहे. शिक्षक आहेत, इमारती आहेत, पण विद्यार्थी नाहीत, अशी अवस्था अनेक जिल्हा परिषद शाळांची झाली आहे. हीच धोक्याची घंटा ओळखून सरपंच धुर्वे यांनी ग्रामपंचायत सदस्य आणि सचिवांच्या सहकार्याने हा अभिनव निर्णय राबविला आहे.

शिक्षणाचा प्रश्न केवळ शासनाचा नाही, तर गावाचाही आहे, असा संदेश या निर्णयातून देण्यात आला आहे. गरीब आणि मध्यमवर्गीय पालकांना आर्थिक दिलासा देतानाच गावातील शाळा टिकविण्याचा प्रयत्न म्हणून या निर्णयाकडे पाहिले जात आहे.

आर्वी तालुक्यातील मांडल्याने उचललेले हे पाऊल आता संपूर्ण वर्धा जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत असून, इतर ग्रामपंचायतीही असा धाडसी निर्णय घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बसस्थानक बेवारस... प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू

## वाहतूक नियंत्रकांशिवाय कारंजा बसस्थानकाचा कारभार; रात्री दारुड्यांचा हैदोस, प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



**कारंजा घाडगे जनमाध्यम** राष्ट्रीय महामार्गावरील महत्त्वाचे केंद्र असलेल्या कारंजा बसस्थानकाचा कारभार सध्या अक्षरशः 'रामभरोसे' सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून बसस्थानकावर वाहतूक नियंत्रक नियमित उपस्थित नसल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

कारंजा बसस्थानकावरून दररोज शेकडो एसटी बसेसची ये-जा होत असते. कारंजा तालुक्यातील जवळपास ८० गावांतील नागरिक, विद्यार्थी आणि महिला या स्थानकावर अवलंबून आहेत. विशेष म्हणजे हे बसस्थानक राष्ट्रीय महामार्गालगत असल्याने २४ तास प्रवाशांची वर्दळ सुरू असते. मात्र अशा महत्त्वाच्या ठिकाणी वाहतूक नियंत्रकच नसल्याने बसस्थानक बेवारस अवस्थेत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. स्थानिकांच्या माहितीनुसार, तळेगाव आगाराने कारंजा बसस्थानकासाठी दोन वाहतूक नियंत्रकांची नियुक्ती केली होती. मात्र काही महिन्यांपासून बसस्थानकावरील कार्यालयाला कुलूप लावून संबंधित कर्मचाऱ्यांना दुसरीकडे ड्युटीवर पाठवले जात असल्याची चर्चा रंगली आहे. परिणामी रात्रीच्या वेळी बसस्थानकावर दारुड्यांचा मुक्त संचार वाढला असून महिला प्रवासी व विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी ट्युशन आणि शिक्षणासाठी कारंज्यात येतात. रात्री उशिरापर्यंत बसची प्रतीक्षा करताना त्यांना कोणतीही सुरक्षा मिळत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तसेच शाळांना सुट्ट्या लागल्यापासून तळेगाव आगाराच्या सात बसेस कारंज्यात ठेवण्यात येत होत्या, मात्र आता फक्त एकच बस ठेवली जात असल्याने प्रवाशांचे हाल होत असल्याचे सांगितले जात आहे.

एखादी गंभीर घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. दोन वाहतूक नियंत्रकांची नेमणूक असूनही त्यांना कारंज्यात न पाठवणाऱ्या प्रशासनाविरोधात विद्यार्थ्यांसह नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. बसस्थानकावर तातडीने दोन वाहतूक नियंत्रक नियुक्त करून प्रवाशांच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# लग्नास नकार मिळताच पेट्रोल ओतून तरुणाचा थरार

## खानावळसमोर उडाला एकच गोंधळ

**वर्धा जनमाध्यम :** उसनवारीच्या पैशाच्या वादातून एका तरुणाने खानावळसमोर स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून धिंगाणा घातल्याची धक्कादायक घटना भुगाव येथील एस्टेन्शन कॉलनीत घडली. माझ्यासोबत लग्न कर, अशी अट घालत तरुणाने महिलेला धमकावले. मात्र, तिने नकार देताच त्याने स्वतःलाच पेटवून घेतल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आकाश चिडे (रा. चंद्रपूर) असे आरोपीचे नाव असून सावंगी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सरोज कल्लू सिंग या भुगाव रोडवरील जय माँ शारदा मेस चालवितात. त्यांनी काही महिन्यांपूर्वी आकाशकडून उसनवारीने ४५ हजार रुपये घेतले होते. काही रक्कम परत केल्यानंतर उर्वरित पैशासाठी आकाश सातत्याने फोनवरून शिवीगाळ करीत होता. १० मे रोजी तो मेससमोर आला आणि स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून आरडाओरड सुरू केली. पैसे परत करते, असे सरोज यांनी सांगितले असता त्याने लग्नाची अट घातली. नकार मिळताच त्याने लाईटरने स्वतःलाच पेटवून घेतले. कपडे पेटल्याने सरोज यांनी तत्परता दाखवत ब्लँकेट टाकून आग विझवली. त्यानंतर तूच मला पेटविले, असे पोलिसांना सांगून तुला फसवितो, अशी धमकी देत आरोपी पसार झाला. पोलिस पुढील तपास करीत आहेत

# वर्ध्यात युवक काँग्रेससाठी 'रणधुमाळी'; जिल्हाध्यक्षपदासाठी १२ जणांची जोरदार फिल्डिंग

## कपिल ढोके यांच्या उपस्थितीत इच्छुकांच्या मुलाखती; संघटनेत नव्या नेतृत्वाची जोरदार चर्चा



**वर्धा जनमाध्यम** वर्धा जिल्हा युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदासाठी आता चुरशीची लढत रंगू लागली असून तब्बल १२ इच्छुकांनी मैदानात उडी घेतल्याने पक्षांतर्गत राजकीय वातावरण तापले आहे. वर्धा येथील शासकीय विश्रामगृहात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष व विभागीय प्रभारी कपिल ढोके यांच्या अध्यक्षतेखाली इच्छुक पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती पार पडल्या.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस सागर चव्हाण तसेच प्रदेश सचिव व वर्धा जिल्हा सहप्रभारी आयुषी देशमुख उपस्थित होत्या. जिल्हाध्यक्ष पदासाठी १२ जणांनी आपली उमेदवारी नोंदवली असून इतर विविध पदांसाठीही अनेक इच्छुकांनी मुलाखती दिल्या.

मुलाखतीदरम्यान संघटना विस्तार, युवकांमध्ये पक्षाची ताकद वाढवणे, गावपातळीवर काँग्रेसचे विचार पोहोचवणे आणि आगामी निवडणुकांसाठी पक्षबांधणी या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक इच्छुकाने आपल्या नेतृत्वाची दिशा आणि संघटनात्मक दृष्टीकोन मांडत पक्षश्रेष्ठींसमोर शक्तिप्रदर्शन केल्याचे चित्र पाहायला मिळाले.

पत्रकारांशी संवाद साधताना कपिल ढोके यांनी सांगितले की, निवड प्रक्रिया पूर्णतः गुणवत्ता, कार्यक्षमता आणि संघटनात्मक पात्रतेच्या आधारे केली जाणार आहे. पुढील एका महिन्यात नवीन जिल्हाध्यक्ष, विधानसभाध्यक्ष, तालुकाध्यक्ष आणि संपूर्ण जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महात्मा गांधींच्या विचारांची भूमी असलेल्या वर्ध्यात युवक काँग्रेसला अभ्यासू, सक्षम आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्रदेश सचिव अफजल बेरा व अंकुश मुंजेवार यांचीही उपस्थिती होती.

# नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते अनावरण






**मुंबई/प्रतिनिधी :**नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांचा एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देउन सन्मानित करण्यात आले.

प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध आखाड्यांचे साधू, संत उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी यावेळी उपस्थित साधू संतांचे स्वागत केले.

**नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाविषयी-**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, 'मायगव्ह' आणि 'असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून या बोधचिन्हाची निवड करण्यात आली. २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मायगव्ह प्लॅटफार्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३,०६७ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. सहभागाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर राहिले, त्याखालोखाल दिल्ली आणि तामिळनाडूचा क्रमांक लागला. १८ ते २४ वयोगटातील तरुणांनी या स्पर्धेत सर्वाधिक सक्रिय सहभाग नोंदवला.हे बोधचिन्ह नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या पवित्र भूगोल आणि धार्मिक परंपरांवर आधारित आहे. भगवान शंकराचे त्रिशूळ: आध्यात्मिक ऊर्जेचे प्रतीक.त्र्यंबकेश्वर मंदिर: प्रादेशिक वारशाचे दर्शन घडवणारी मंदिराची प्रतिकृती. काळाराम मंदिराची कमान आणि गोदावरी नदी: गोदावरी नदीला 'शिवलिंगा'च्या रूपात दर्शविण्यात आले असून, ते कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित करते.

## हिंदूंना श्रद्धा सिद्ध करण्यासाठी मंदिरात जाण्याची गरज नाही

### सर्वोच्च न्यायालयाचे हिंदुत्वावर महत्त्वपूर्ण भाष्य

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** श्रद्धा सिद्ध करण्यासाठी हिंदूंनी मंदिरात जाण्याची गरज नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. हिंदुत्व ही जगण्याची पद्धत आहे. श्रद्धा सिद्ध करण्यासाठी वारंवार मंदिरात जाणे किंवा विधी करणे बंधनकारक नाही. श्रद्धा आहे हे सिद्ध करायला घरात एक दिवा पेटवला तरी पुरेसे आह, असे सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी स्पष्ट केले. धार्मिक स्थळांवर महिलांबरोबर होणा-या भेदभावाशी निगडीत याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले.सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्यासह नउ न्यायाधीशांचा समावेश असलेल्या घटनापीठाने धार्मिक स्थळांवर महिलांबरोबर होणा-या भेदभावाशी निगडीत याचिकेची सुनावणी घेतली. यामध्ये केरळमधील सबरीमाला मंदिराचाही समावेश होता.



यासह दाउदी बोहरा आणि विविध धार्मिक मान्यता आणि प्रथांचा या याचिकेत समावेश करण्यात आला आहे, असे वृत्त पीटीआय या वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केले आहे. सुनावणीच्या १५ व्या दिवशी वकील डॉ. जी. मोहन गोपाळ यांनी धार्मिक समुदायातून सामाजिक न्यायाची मागणी केली जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला.

**धार्मिकस्थळी भेदभावाशी निगडीत याचिका**

हिंदू धर्माला एक धार्मिक श्रेणी म्हणून परिभाषित केले गेले होते. त्यानंतर, १९६६ मध्ये जो धर्म आणि तत्त्वज्ञानाच्या सर्व बाबींमध्ये वेदांना सर्वोच्च प्रमाण मानतो, तोच खरा हिंदू आहे, असे ठरवण्यात आले. त्यांनी मला कधी विचारले नाही. आमच्यापैकी कोणीही असे कधी म्हटले नाही, असे मोहन गोपाळ यांनी युक्तिवाद करताना म्हटल्याचे पीटीआयने वृत्त दिले आहे. मला देखील वेदांप्रती आदर आहे. पण, आज हिंदू धर्मातील प्रत्येक व्यक्ती वेदांना आणि तत्त्वज्ञानाच्या सर्व बाबींमध्ये वेदांना सर्वोच्च प्रमाण मानतो का?, असा सवाल गोपाळ यांनी उपस्थित केला.

**सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले महत्त्वपूर्ण निरीक्षण**

गोपाळ यांच्या युक्तिवादाला उत्तर देताना न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या की, त्यामुळेच हिंदुत्वाला जगण्याची पद्धत म्हटले जाते. हिंदू राहण्यासाठी हिंदू व्यक्तीला मंदिरात जाणे किंवा विधी करणे बंधनकारक नाही. त्यासाठी कोणीही कर्मकांड करण्याची गरज नाही तसेच लोकांच्या श्रद्धेच्या आड देखील कोणी येउ शकत नाही. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी याप्रकरणी बोलताना, घरात एक दिवा लावणे देखील धर्म सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहे, असे निरीक्षण नोंदवले.

## नागपुरात क्रिकेट खेळताना वीज कोसळली; दहावीच्या विद्यार्थ्याचा मृत्यू

**नागपूर :** नागपुरातील भीलगाव परिसरात बुधवारी सायंकाळी वादळी वा-यासह आलेल्या अवकाळी पावसादरम्यान वीज कोसळून दहावीतील विद्यार्थ्याचा मृत्यू झाला, तर त्याचा मित्र जखमी झाला. हस्तीनापूर रोडवरील मोकळ्या जागेत क्रिकेट खेळत असताना ही दुर्दैवी घटना घडली. दोघेही विद्यार्थी जरीपटक्यातील महात्मा गांधी सेन्टेनियल सिंधू हायस्कूलचे असल्याची माहिती आहे. दरम्यान घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरन पसरले होते. भिलगाव ग्रामपंचायत हद्दीतील तिवारी नगर ते हस्तीनापूर मार्गावरील मोकळ्या जागेत पाच मुले क्रिकेट खेळत होती. सायंकाळी अचानक जोरदार पाउस आणि विजांचा कडकडाट सुरू झाला. पावसापासून बचाव करण्यासाठी मुले रस्त्याच्या मधोमध असलेल्या कडुनिंबाच्या झाडाखाली थांबली. त्याचवेळी झाडावर अचानक वीज कोसळली. या घटनेमुळे विद्यार्थी घाबरले होते. त्यांनी आरडा- ओरड केली. त्यामुळे परिसरातील नागरिक तेथे आले. या दुर्घटनेत उज्वल सुनील भेलावे (१५), रा. तिवारी नगर, बेलगाव, नागपूर याचा जागीच मृत्यू झाला. उज्वल हा दहावीत शिक्षण घेत होता. तर देवांश कपूरचंद पारधी (१४), रा. हस्तीनापूर, भीलगाव, नागपूर हा विद्यार्थी या घटनेत जखमी झाला. त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. देवांशने नुकतीच नववीची परीक्षा दिली होती. रात्री उशिरापर्यंत त्याच्या वैद्यकीय स्थितीची माहिती कळू शकली नाही

## नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आधुनिकीकरणाला केंद्र सरकारची मंजुरी

### 30 वर्षांच्या भाडेपट्ट्यासह विकासाचा मार्ग मोकळा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अद्ययावतीकरण आणि आधुनिकीकरणाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राबवण्यास मंजुरी दिली आहे. या महत्वाच्या निर्णयानुसार, भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या मिहान इंडिया लिमिटेडला दिलेल्या




जमिनीची भाडेपट्ट्याची मुदत ६ ऑगस्ट २०३९ नंतरही वाढवण्यात आली आहे. या मुदतवाढीमुळे आता सवलतदार असलेल्या जीएमआर नागपूर इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडला (जीएनआयएएल) व्यावसायिक कामकाज सुरू झाल्यापासून पुढील ३० वर्षांच्या कालावधीसाठी विमानतळाचे संचालन आणि विकास करणे शक्य होणार आहे.'मल्टी-मोडल इंटरनॅशनल कार्गो हब अँड एअरपोर्ट ॲट नागपूर' (मिहान) प्रकल्पांतर्गत या विमानतळाला प्रादेशिक विमान वाहतूक केंद्र बनवण्याच्या दिशेने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. यापूर्वी २००९ मध्ये विमानतळ मालमत्ता हस्तांतरित करण्यात आली होती, मात्र जमिनीच्या सीमांकनामुळे भाडेपट्टा करारास विलंब झाला होता. २०१६ मध्ये काढलेल्या जागतिक निविदेत जीएमआर एअरपोर्ट्स लिमिटेडने सर्वोच्च बोली लावली होती, जी नंतर १४.४९ टक्के महसूल हिश्श्यासह सुधारित करण्यात आली. २०२० मध्ये निविदा रद्द करण्यावरून उद्भवलेला न्यायालयीन वाद सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर संपुष्टात आला असून, ८ ऑक्टोबर २०२४ रोजी जीएनआयएएलसोबत नवीन सवलत करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे नागपूर विमानतळाच्या विकासाच्या एका नवीन पर्वाला सुरुवात होणार आहे.जीएनआयएएलद्वारे या विमानतळाचे जागतिक दर्जाच्या सुविधेत रूपांतर करण्यात येईल, ज्याची अंतिम क्षमता वार्षिक ३ कोटी प्रवाशांना हाताळण्याची असेल. या परिवर्तनामुळे केवळ विदर्भ प्रांतातील संपर्क व्यवस्था (कनेक्टिव्हिटी) सुधारणार नाही, तर मालवाहतूक क्षमतेत मोठी वाढ होउन आर्थिक पायाभूत सुविधाही अधिक मजबूत होतील. खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक आणि सरकारी देखरेख यांच्या संगमातून प्रवाशांना दर्जेदार सेवा आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधा मिळतील, ज्यामुळे नागपूर हे मध्य भारतातील विमान वाहतुकीचे प्रमुख केंद्र म्हणून नावारूपास येईल.

## बालगृहातील 715 बालके दहावीत ऊत्तीर्ण

### यशस्वी विद्यार्थ्यांचे मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून अभिनंदन

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रतिकूल परि?स्थितीवर मात करत बालगृहातील ७१५ विद्यार्थ्यांनी दहावीत यश संपादन करत सकारात्मक जीवनाचा मार्ग अवलंबिला आहे. महिला व बालविकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या विविध बालगृहातील एकूण ७१५ विद्यार्थ्यांनी दहावीत यश संपादित केले असून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, या विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सकारात्मक जीवनाचा मार्ग स्वीकारत उल्लेखनीय यश मिळवले आहे.

विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी शासनाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. तसेच बालगृहांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा, मार्गदर्शन आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. बालगृहातील या मुलांचे ऑनलाईन सेशन घेण्यात आले, तसेच त्यांचा सराव घेण्यात आला. शिक्षकांचे विशेष वर्ग या दहावीच्या मुलांसाठी आयोजित करण्यात आले होते. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ११८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यानंतर मुंबई उपनगर येथील बालगृहातील ८८, अहिल्यानगर येथील ८०, तर बीड येथील ४७ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. ठाणे जिल्ह्यात ४२, सोलापूर येथे ३९, तर कोल्हापूर येथे ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांनी उच्च गुणांची नोंद केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवणा-या विद्यार्थ्याने ९५.२० टक्के गुण मिळवले असून द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्याला ८६ टक्के गुण मिळाले. तसेच बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांकासाठी ९४ टक्के, तर द्वितीय क्रमांकासाठी ९२.४० टक्के गुणांची नोंद झाली आहे. पुणे, सोलापूर, मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनीही ८५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. काही जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी असली तरी गुणवत्तापूर्ण निकाल लागल्याचे दिसून आले. नंदुरबार, लातूर, नाशिक आणि नागपूर येथील विद्यार्थ्यांनीही चांगली कामगिरी केली आहे.

## पंढरपूर येथे पाच एकर जागेत भक्तनिवास होणार

### पर्यटनमंत्री शंभूराज देसाई

**मुंबई/प्रतिनिधी :** पंढरपूर येथे पाच एकर जागेत माजी सैनिक कल्याण विभाग, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराचे देवस्थान व पर्यटन विभागाच्या समन्वयातून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची जागा भक्तनिवासासाठी विकसित करण्याची कार्यवाही पर्यटन विभागाने करावी असे निर्देश पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. मेघदूत शासकीय निवासस्थान येथे पंढरपूर येथील पर्यटन विभागाच्या जागेच्या विकासासंदर्भात आयोजित बैठकीत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई बोलत होते.यावेळी पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पंढरपूर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज (औसेकर) कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यासह इतर अधिकारी उपस्थित होते. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, पंढरपूर येथील पाच एकर जागेत माजी सैनिक कल्याण विभाग देवस्थान व पर्यटन विभागाच्या समन्वयातून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची जागा विकसित करण्यात यावी. सर्वांच्या सूचना लक्षात घेवून सर्वसमावेशक काम करण्यात यावे. असे निर्देशही पर्यटनमंत्री देसाई यांनी दिले.

## सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बदल्या समुपदेशनाद्वारे

### - आरोग्य विभागाचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-ब, गट-क आणि गट-ड कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्यांसाठी समुपदेशन प्रक्रियेला गती देत स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून महत्त्वाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि त्यात सुसूत्रता आणण्यात भर देण्यात आला आहे.सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक १५ एप्रिल २०२६ नुसार समुपदेशनाद्वारे सर्वसाधारण बदल्या करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, त्याअनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा यांनी ८ परिमंडळातील सर्व कार्यक्रम प्रमुख यांच्या बदल्यांचे टप्प्याटप्प्याने वेळापत्रक जाहीर केले आहे. जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार रिक्तपदांची यादी ६ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर बदलीपात्र कर्मचा-यांची सेवा ज्येष्ठता यादी ८ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केली गेली. तसेच, प्रपत्र १ ते ५ तयार करून नागरी सेवा मंडळासमोर १० मे २०२६ रोजी सादर करण्यात आली. नागरी सेवा मंडळाकडून समुपदेशनाने बदलीचे अंतिम प्रस्ताव १५ मे २०२६ पर्यंत पाठविण्यात येणार आहेत. समुपदेशनाद्वारे करण्यात आलेल्या अंतिम बदल्यांचे आदेश ३१ मे रोजी वेबसाईटवर निर्गमित करण्यात येणार आहेत. या सर्व बदली प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी चार वरिष्ठ अधिका-यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नव्या धोरणानुसार बदल्या करताना सेवा कालावधी, प्राधान्यक्रम, पसंतीक्रम, प्रशासकीय गरज तसेच दुर्गम भागातील सेवेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. अपंग कर्मचारी, गंभीर आजारांनी ग्रस्त कर्मचारी, विधवा महिला, पती-पत्नी एकत्रीकरण आणि शैक्षणिक कारणे यांसारख्या मानवी बाबींनाही प्राधान्य देण्यात आले आहे.बदली प्रक्रिया पूर्णपणे प्रशासकीय आणि पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून कोणत्याही प्रकारचा बाह्य दबाव अथवा हस्तक्षेप सहन केला जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य विभागातील मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होउन राज्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे. या सर्वसमावेशक बदली धोरणामुळे सार्वजनिक आरोग्य विभागातील मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक पारदर्शक, गतिमान आणि परिणामकारक होण्यास मदत होणार असून, राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## जनगणना प्रक्रियेत खोटी माहिती दिल्यास होणार तुरूंगवास

**नवी दिल्ली** :भारताच्या सर्वांगीण विकासाचा पाया असलेल्या आगामी जनगणनेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. मात्र, ही प्रक्रिया केवळ आकडेवारी गोळा करण्याचे साधन नसून ते एक कायदेशीर कर्तव्य आहे. जनगणनेच्या प्रक्रियेत प्रगणकांना सहकार्य न करणे, माहिती देण्यास नकार देणे किंवा जाणीवपूर्वक खोटी माहिती दिल्यास आता अदखलपात्र गुन्हा दाखल होउ शकतो, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.भारतातील जनगणना ही जनगणना कायदा १९४८ अंतर्गत पार पडते. या कायद्यातील तरतुदींनुसार, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे प्रत्येक नागरिकासाठी बंधनकारक आहे. कलम ११ (१) (ड) नुसार, जर एखादी व्यक्ती प्रगणकाला उत्तरे देण्यास जाणीवपूर्वक नकार देत असेल किंवा चुकीची माहिती लिहून देत असेल, तर तो कायदेशीर अपराध मानला जातो. या नियमांचे उल्लंघन करणा-या व्यक्तीस एक हजार रुपयांपर्यंत दंड होउ शकतो. जर गुन्ह्याचे स्वरूप गंभीर असेल किंवा प्रक्रियेत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न झाला, तर संबंधित व्यक्तीला ३ वर्षांपर्यंतचा कारावास भोगावा लागू शकतो.

माहिती सुरक्षित आणि गोपनीय-आपण दिलेली माहिती इतर कारणांसाठी वापरली जाईल, असा नागरिकांचा गैरसमज असतो. मात्र, जनगणना कायद्याच्या कलम १५ नुसार, नागरिकांनी दिलेली वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते. ही माहिती कोणत्याही न्यायालयात पुरावा म्हणून वापरता येत नाही किंवा ती इतर कोणत्याही सरकारी डेटाबेसशी लिंक केली जात नाही. त्यामुळे नागरिकांनी निर्भयपणे खरी माहिती देण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## विद्यार्थ्यांची अपार आयडी आणि डिजीलाकर नोंदणी पूर्ण करण्याचे ऊच्च शिक्षण संचालनालयाचे निर्देश

### *जून २०२६ पर्यंत क्रेडिट डेटा अपलोड करण्याची कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना*

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी एक राष्ट्र, एक विद्यार्थी ओळख या संकल्पनेतून अपार (एपीएआर) आणि अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या अनुषंगाने राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची अपार आयडी आणि डिजीलाकर नोंदणी तसेच क्रेडिट डेटा अपलोड करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलसचिवांना दिले आहेत.शिक्षण मंत्रालय, भारत सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), नवी दिल्ली यांनी याबाबत अनिवार्य तरतुदी केल्या आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत?चा १२ अंकी अपार आयडी तयार करणे आणि तो आधार कार्ड व डिजील?करशी लिंक करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि श्रेयांक सुरक्षित ठेवण्यासाठी डिजील?कर नोंदणी आवश्यक असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.प्रत्येक शैक्षणिक वर्षाचा प्राप्त श्रेयांक डेटा त्या त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर अखेरपर्यंत अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. २०२६ मध्ये घेतलेल्या सर्व परीक्षा आणि मूल्यमापनाचा श्रेयांक डेटा विद्यार्थ्यांच्या अपार आयडीशी मॅप करून जून २०२६ पर्यंत पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. या मुदतीनंतर पोर्टलवरील डेटा गोठविला जाईल आणि त्यात कोणताही बदल करता येणार नाही.उच्च शिक्षण संचालनालयाने विद्यापीठांना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालये, स्वायत्त संस्था आणि पदव्युत्तर विभागांना विद्यार्थ्यांची १०० टक्के अपार आयडी नोंदणी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यास सांगितले आहे. तसेच प्रवेश प्रक्रिया आणि परीक्षा अर्ज भरताना अपार आयडी अनिवार्य करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.विहित मुदतीत क्रेडिट डेटा अपलोड न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्थेवर राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील किती महाविद्यालये, विद्यापीठे आणि उच्च शैक्षणिक संस्थांमधील किती विद्यार्थ्यांनी अपार आयडीची नोंदणी पूर्ण केली आहे, याचा संपूर्ण तपशील तात्काळ संचालनालयास mavi.dhepune@nic.in या ईमेलवर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## एमपीएससीकडून ऑप्टिंग आउट आणि संमती पर्याय रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) भरती प्रक्रियेत महत्त्वाचा बदल करत उमेदवारांना उपलब्ध असलेले ऑप्टिंग आउट तसेच संमती (गिव्ह अप / अक्सेप्टेड) हे पर्याय रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील प्रसिद्धीपत्रक आयोगाने जारी केले आहे.

आयोगाने भरती प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने यापूर्वी ऑप्टिंग आउट ही संकल्पना लागू केली होती. त्यानुसार निवड यादीतील उमेदवारांना भरती प्रक्रियेतून स्वेच्छेने बाहेर पडण्याचा पर्याय देण्यात आला होता. मात्र, या पर्यायासंदर्भात आयोगाच्या बैठकीत चर्चा झाल्यानंतर आता हा पर्याय रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षांसाठी भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे (ऑप्टिंग आउट) तसेच संमती (गिव्ह अप / अक्सेप्टेड) देणे हे पर्याय उपलब्ध राहणार नाहीत. एकल संवर्गाच्या भरती प्रक्रियेसाठी प्रतिक्षा यादी कार्यान्वित राहील व बहुसंवर्गीय पदांच्या भरती प्रक्रियेसाठी प्रतिक्षा यादी राहणार नाही. बहुसंवर्गीय पदभरतीत उमेदवाराला ज्या पदावर अगोदरच नियुक्ती मिळाली आहे अशा पदाचा किंवा निम्न पदाचा पर्याय उमेदवाराने पसंतीक्रमात दिल्यास त्याचा त्या पदावरील किंवा निम्न पदावरील शिफारशीसाठी विचार केला जाणार नाही. हा निर्णय १३ मे २०२६ पासून अमलात येणार असल्याचे आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## अर्थव्यवस्थेवर ताण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'वर्क फ्रॉम होम' पुन्हा सुरू करणे, कारपुलिंग, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे, सोन्याची आयात कमी करणे आणि रासायनिक खत वापर कमी करून सेंद्रिय शेतीकडे वळणे याबाबत जनतेला सकारात्मक प्रतिसाद देण्याचे आवाहन केले.पंतप्रधानांच्या प्रत्येक वक्तव्याचे समग्र अर्थकारणावर, समाजकारणावर आणि राष्ट्राच्या जागतिक गरिमेवर बरे-वाईट परिणाम होत असतात. त्यांनी अंधुकशी नकारात्मकता दर्शवली, तरी विदेशी गुंतवणुकीवर आणि गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर गंभीर परिणाम होतात आणि भांडवली बाजारात लाखोंचा चुराडा होतो. हा धोका पत्करून पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना तेल, सोने, विदेशी पर्यटन यांबाबत काटकसरीचे आवाहन केले. यामध्ये निश्चितच काही गर्भितार्थ दडलेला आहे; पण विरोधी पक्षांनी मोदी सरकारचे अर्थकारण फसले, असे म्हणत टाहो फोडण्यास सुरुवात केली आहे. वस्तुतः राष्ट्रहिताच्या मुद्द्यावर राजकारण करू नये, असे संकेत आहेत; पण बहुतेकदा त्यांचे पालन होत नाही. इंधन बचतीचे आवाहन पंतप्रधानांनी काल पहिल्यांदा केलेले नाही. गेल्या ११ वर्षांत याबाबत पंतप्रधान मोदी स्वतः सातत्याने विविध व्यासपीठांवरून देशाची तेल आयात आणि त्यासाठी द्याव्या लागणाऱ्या अब्जावधी डॉलरबाबत बोलत आले आहेत. सरकारने पर्यायी इंधनाला-ऊर्जेला चालना देण्यासाठी धोरणात्मक पावलेही टाकली; पण त्यांच्या मर्यादा आणि वर्तमानातील इंधन संकट पाहता नागरिकांच्या सक्रिय सहभागाने या आव्हानाचा मुकाबला केला जाऊ शकतो. वर्क फ्रॉम होम, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर ही यासाठीची प्रभावी शस्त्रे आहेत. देशभरामध्ये त्यांचा वापर सोयीचा नसला, तरी शक्य आहे तिथे केल्यास मोठे परिवर्तन घडू शकते.सुवर्णप्रेमासाठी प्रसिद्ध असणारा भारत दरवर्षी ६०० ते ७०० टन सोन्याची आयात करतो. डॉलर खर्च करून आयात होणारे सोने चालू खात्यातील तुटीवर परिणाम करते. २०२१-२२ मध्ये सुमारे ४६ अब्ज डॉलर किमतीचे सोने भारतात आयात झाले. २०२५-२६ मध्ये हा आकडा ७२ अब्ज डॉलरपर्यंत गेला आहे. हे सोने अर्थव्यवस्थेत सक्रिय न होता साठवणुकीच्या स्वरूपात राहते. आरबीआयने केलेला सुवर्णसाठा अर्थव्यवस्थेला भक्कम बनवण्यासाठी उपयुक्त असला, तरी वैयक्तिक पातळीवर प्रतिष्ठेसाठी आणि हौसेसाठी होणारी सोने-खरेदी चालू खात्यावरचा बोजा वाढवते. नागरिकांचे सोनेप्रेम आणि सोने आयातीमुळे निर्माण होणारा ताण लक्षात घेता सरकारने गोल्ड सॉवेरियन बाँडचा पर्याय उपलब्ध करून दिला; पण त्याने फारसा फरक पडलेला नाही. भारत खाद्यतेलाचाही मोठा आयातदार असून त्यासाठीही लाखो डॉलर्स दरवर्षी खर्च करावे लागतात. या तिन्हींच्या वापराबाबत सामूहिक काटकसर प्रभावीपणे अमलात आली, तर देशाचे अब्जावधी डॉलर वाचू शकतील.भारतात नानाविध परंपरांनी साजरे होणारे विवाहसोहळे जगभर प्रसिद्ध आहेत. ही 'वेडिंग इकॉनॉमी' तळागाळातील अर्थकारणासाठी बूस्टर ठरते; परंतु अलीकडील काळात विदेशात प्रेक्षणीय स्थळी जाऊन विवाह सोहळ्यांसाठी शेकडो डॉलर्स खर्च केले जातात. संपत्ती दर्शनाचे हे फॅड रोखण्यासाठी केंद्राने 'वेड इंडिया' नावाचे मिशन सुरू केले होते. त्याला बॉलीवूडसह अनेक क्षेत्रांतून सकारात्मक प्रतिसादही मिळाला. सेंद्रिय शेतीलाही या सरकारने सुरुवातीपासून चालना दिली आहे. म्हणजेच पंतप्रधानांनी काटसरीसंदर्भात केलेले आवाहन ही अचानक आलेली जाग नसून ते धोरणात्मक सातत्य आहे. श्रीलंकेमध्ये तीन वर्षांपूर्वी उद्धवलेल्या अराजकाचे कारण विदेशी गंगाजळीत डॉलरचा झालेला खडखडाट हे होते. त्यावेळी कच्च्या तेलाची दरवाढ पाकिस्तान, बांगला देश, श्रीलंका, नेपाळ यांसारख्या देशांच्या अर्थव्यवस्थांसाठी मारक ठरली होती. विदेशातून वस्तूंची आयात करण्यासाठी या देशांकडे डॉलरच शिल्लक राहिले नव्हते. त्यामुळे विदेशातून येणारे वेफर्स खाऊ नका, असे आवाहन राष्ट्रीय नेतृत्वाला करावे लागले होते. पश्चिम आशियामध्ये युद्धातून निर्माण झालेली अस्थिरता आणि अडीच महिन्यांत विस्कळीत झालेली जागतिक पुरवठा साखळी हे संकट लवकर संपण्याची चिन्हे नाहीत. युद्ध नुकसानभरपाई आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीवर सार्वभौमत्वाची इराणची मागणी अमेरिकेला मान्य होणारी नाही. होर्मुझ ७५ दिवसांपासून बंद असल्याने जगातील एकूण इंधन पुरवठ्यापैकी २० टक्के पुरवठा ठप्प आहे. इंधनाचे दर फेब्रुवारीच्या तुलनेत तब्बल ४० ते ४५ टक्क्यांनी वाढले. यामुळे देशातील तेल कंपन्यांना दररोज १००० कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे.रुपयाचे मूल्य ९६ पर्यंत घसरल्याने दुहेरी संकट उभे राहिले आहे.सरकारने अद्याप या दरवाढीचा बोजा ग्राहकांवर टाकलेला नाही; परंतु ही परिस्थिती रुपयाचे मूल्य, परकीय चलन साठा आणि एकूणच अर्थव्यवस्थेवर मोठा ताण निर्माण करत आहे. हे संकट किती काळ लांबणार, याबाबत अस्पष्टता असल्याने केंद्राने याबाबत धोरणात्मक उपाययोजना आधीच सुरू केल्या आहेत. आता जनतेलाही याची जाणीव करून देत, लोकसहभागातून या संकटाचा सामना करण्याची तयारी केली जात आहे.भारताची परिस्थिती या देशांसारखी बिलकूल नाही. देशाची विदेशी गंगाजळी ७०० अब्ज डॉलरहून अधिक आहे; पण म्हणून गाफील राहत 'आग लागल्यावर विहीर खणणे' हे कुशल नेतृत्वाचे लक्षण मानले जात नाही. संभाव्य धोक्यांचा वेध घेऊन बिकट परिस्थिती उद्भवल्यास त्यावर मात करण्यासाठी तयार राहणारे नेतृत्वच प्रभावी मानले जाते. 'द प्रिन्स' या ग्रंथात राज्यशास्त्रज्ञ निकोलो मॅकियावेली म्हणतो की,राष्ट्रप्रमुखाला काळाची गरज ओळखून कृती करावी लागते. प्रसिद्ध राजकीय विचारवंत हॅना आरेंट यांच्या मते, नेतृत्व म्हणजे केवळ इतरांवर हुकूमत गाजवणे नव्हे, तर लोकांशी संवाद साधून त्यांना कृतीप्रवृत्त करणे होय. या अनुषंगाने पंतप्रधान मोदींच्या आवाहनांकडे पाहता येणाऱ्या काळात उद्भवू शकणाऱ्या संभाव्य आव्हानांचा मुकाबला आपण सामूहिक प्रयत्नांतून यशस्वीपणे करू शकतो, हा आत्मविश्वास जनतेत निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. याचा विपर्यास करण्यापेक्षा वास्तव समजून घेत राष्ट्रहितपूरक कृती करणे इष्ट ठरेल. अर्थात, सत्ताधारी राजकीय व्यवस्थेपासून या काटकसरीची सुरुवात झाल्यास समाजाकडून त्याचे अनुसरण होण्याच्या शक्यता वाढतील, हे निश्चित! जोडीला आर्थिक सुधारणांचा कार्यक्रमही गतिमान करायला हवा.



# शेतीपुढे तिहेरी संकट !

**युद्ध , बदलते हवामान आणि महागाई ही आव्हाने भारतातील शेतकऱ्याला भेडसावत आहेत. खाद्य असुरक्षेचे संकट आगामी काळात गहिरे होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**

मध्य-पूर्वेतील धगधगणाऱ्या युद्धाचे चटके आता हळूहळू सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचू लागले आहेत. या संघर्षांची खरी किंमत मोजली जाते रोजच्या बाजारात, भाजीपाल्याच्या दुकानात आणि शेतक-याच्या उद्धवस्त मनात. महागडे कच्चे तेल, गगनाला भिडलेल्या खताच्या किमती आणि शेतीचा वाढता खर्च या गोष्टी एकत्र येऊन जागतिक खाद्यमहागाईसाठी जमीन तयार करत असून हे संकट थेट माणसाच्या पोटापाण्याशी निगडित आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेने (एफएओ) आपल्या ताज्या अहवालात एक महत्त्वाचा इशारा दिला आहे. जागतिक खाद्यकिंमत निर्देशांक सलग दुसऱ्या महिन्यात वाढला असून मार्च २०२६मध्ये तो १२८.५ अंकांवर पोहोचला. फेब्रुवारीच्या तुलनेत तब्बल २.४ टक्के अधिक. एक वर्षापूर्वीच्या तुलनेत हा आकडा एक टक्क्याहून अधिक आहे. मार्च २०२२च्या विक्रमी पातळीपेक्षा हे अजून सुमारे २० टक्के कमी असले तरी, पुन्हा चढ्या दिशेने सुरू झालेली वाटचाल चिंताजनक आहे. कारण बाजार एखाद्या लंबकाप्रमाणे असतो. एकदा गती पकडली की थांबणे कठीण होते. या वाढीची मुळे शोधायची तर उत्तर एकाच ठिकाणी सापडते कच्चे तेल. मध्य-पूर्वेतील संघर्षाने ऊर्जाबाजारात अस्थिरता आणली आहे. युद्धाचे ढग गडद होताच कच्चे तेल महाग होते, आणि तेल महाग झाले की एक अदृश्य लाट संपूर्ण अर्थव्यवस्थेतून धावत जाते. ट्रॅक्टर चालवणे, खत, माल वाहतूक महाग होते. शेती ही एकच अशी गोष्ट आहे जिचा खर्च एकाच वेळी अनेक बाजूंनी वाढतो आणि तरीही शेतकऱ्याला मिळणारा भाव मात्र बाजाराच्या मनावर अवलंबून असतो. वाढलेल्या खर्चाचा बोजा अखेर ग्राहकाच्या थाळीवर येऊन पडतो, हे तर अगदी शालेय अर्थशास्त्राइतके साधे सत्य आहे.

या साखळीत सर्वांत आधी धक्का बसतो तो गव्हाला. मार्चमध्ये गव्हाच्या जागतिक किमती ४.३ टक्क्यांनी वाढल्या. अमेरिकेत दुष्काळाने पिकांच्या अपेक्षा धुळीस मिळवल्या, तर ऑस्ट्रेलियात महागड्या खतांमुळे शेतकरी पेरणी कमी करण्याच्या विचारात आहेत. पुढे मक्याच्या किमती ०.९ टक्क्यांनी वाढल्या कारण महागड्या तेलामुळे इथेनॉलची मागणी वाढण्याची शक्यता आहे आणि ब्राझिल व अमेरिकेत हवामानाच्या अनिश्चिततेने पुरवठ्यावर दबाव आणला आहे. तांदळाच्या किमती काही प्रमाणात घसरल्या, धानाच्या किमतीत तीन टक्के घट दिसून आली, पण ही घसरण अल्पकालीन असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. कारण परिवहन खर्च वाढल्याने निर्यातदार देशांमधील बाजारावरचा दबाव कायम आहे, खाद्यतेल महागले आहे. हा निर्देशांक गतवर्षीच्या तुलनेत तब्बल १३.२ टक्के अधिक आहे. पाम तेलाने तर २०२२ नंतरची सर्वोच्च पातळी गाठली. एप्रिलमध्ये हा निर्देशांक आणखी उसळून १९३.९ अंकांवर पोहोचला. जुलै २०२२ नंतरची ही सर्वात उंच पातळी आहे.

कच्या तेलाच्या चढत्या किमतींमुळे जैवइंधन म्हणजेच बायोफ्युएलची मागणी जगभरात वाढत आहे. सोयाबीन तेलातून इथेनॉल बनवणे परवडते, त्यामुळे सोयाबीन तेलाचे भाव उसळतात. काळ्या समुद्राच्या क्षेत्रातून होणारा पुरवठा युद्धजन्य परिस्थितीमुळे विस्कळीत झाला आहे, त्यामुळे सूर्यफुलाचे तेल महाग होते. दक्षिण-पूर्व आशियात उत्पादन घटण्याच्या भीतीने पाम तेलाच्या किमती आकाशाला भिडल्या आहेत. पाम, सोया, सूर्यफूल आणि रेपसीड चारही तेले एकाच वेळी महाग झाली आहेत. आणि साखरेच्या किमतीही या वादळात सापडल्या आहेत. मार्चमध्ये साखरेचे भाव ७.२ टक्क्यांनी वाढले, कारण सर्वांत मोठा साखर उत्पादक ब्राझील आपला ऊस वाढत्या प्रमाणात इथेनॉलसाठी वापरत आहे, कारण इंधन बाजारात जैवइंधनाची मागणी उंचावली आहे. साखरेचे भाव नोव्हेंबर २०२५ नंतरच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचले होते. मात्र एप्रिलमध्ये भारत, थायलंड आणि ब्राझीलमध्ये चांगल्या उत्पादनाच्या अपेक्षेने किमती ४.७ टक्क्यांनी घसरल्या. साखर निर्देशांक ९२.८ वरून ८८.५ अंकांवर आला. पण ही घसरण टिकेल का, याची हमी कुणीच देऊ शकत नाही. एफएओचे मुख्य अर्थतज्ज्ञ मॅक्सिमो टोरेरो यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे 'ऊर्जासंकट आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावाचे परिणाम आता खाद्यबाजारांपर्यंत पोहोचत आहेत, महागडे इंधन आणि खते कृषीखर्च वाढवत आहेत आणि त्याचा बोजा अखेर सामान्यांवर पडत आहे.' त्यांनी पुढे इशारा दिला, हा संघर्ष लांबला तर शेतकऱ्यांना कठोर निर्णय घ्यावे लागतील. कमी खत, कमी पेरणी आणि कमी खर्चाच्या पिकांकडे वळणे याचा फटका पुढच्या हंगामात उत्पादनाला बसेल. आणि खाद्यकिमतींचा भडका उडेल.

या संकटाचा सर्वात खोल व्रण उमटतो तो गरीब आणि मध्यमवर्गीयांवर, ज्या घरांमध्ये कमाईचा मोठा हिस्सा आहारावर खर्च होतो, तिथे थेट ताटातील जेवण कमी होते. श्रीमंताला महागाई 'दिसते' गरिबाला ती 'सोसावी लागते. जागतिक खाद्यसुरक्षातज्ज्ञ सतत इशारा देत आहेत की ऊर्जासंकट, युद्ध आणि हवामान बदलाच्या आपत्ती जर याच गतीने सुरु राहिल्या तर जगभरातील कमकुवत देशांमध्ये आणि उत्पन्नाच्या तळाशी असलेल्या कुटुंबांमध्ये खाद्यसुरक्षा आणि कुपोषणाचे संकट अधिक गडद होऊ शकते, अन्न, दूध, तेल लाखो लोकांच्या आवाक्याबाहेर जाऊ लागले आहे आणि हे केवळ आर्थिक नव्हे, तर मानवी संकट आहे.

जागतिक खाद्यसंकटाची एक बाजू बाजारात दिसते, तर दुसरी बाजू शेतीत आणि ती बाजू कितीतरी अधिक वेदनादायक आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाने (एनसीआरबी) नुकताच 'भारतातील अपघाती मृत्यू आणि आत्महत्या २०२४' हा अहवाल जाहीर केला. त्याने एक धक्कादायक वास्तव समोर ठेवले आहे. २०२४ या एकाच वर्षात देशात कृषी क्षेत्राशी संबंधित १०.५४६ जणांनी आपले जीवन संपवले. देशातील १,७०,७४६ आत्महत्यांत हे प्रमाण ६.२ टक्के आहे. म्हणजे रोज सरासरी २८ शेतकरी व शेतमजूर जगाचा निरोप घेत आहेत. ही संख्या २०२३ च्या तुलनेत थोडी कमी आहे तेव्हा १०,७८६ जणांनी आत्महत्या केली होती. २०२२ मध्ये हा आकडा सर्वाधिक ११,२९० इतका नोंदवला गेला होता आणि त्यानंतर तो हळूहळू घसरत आला. पण पाच वर्षांची आकडेवारी पाहता, भारतात दर तासाला सुमारे एक शेतकरी आपले जीवन संपवत असल्याचे दिसते.

आत्महत्या करणाऱ्या १०,५४६ जणांपैकी तब्बल ५,९१३ (५६ टक्के) शेतमजूर होते. हे प्रमाण गेल्या पाच वर्षांतील सर्वाधिक आहे. २०२० मध्ये हेच प्रमाण ४७.७५ टक्के होते म्हणजे चार वर्षांत ते आठ टक्क्यांनी वाढले आहे. शेतमजूर हे सहसा चर्चेत येत नाहीत. 'शेतकरी आत्महत्या' या संज्ञेत आपण बहुतांशी जमीनमालक शेतकऱ्यांचाच विचार करतो. मात्र ज्या माणसाकडे स्वतःची जमीनही नाही, जो दुसऱ्याच्या शेतात राबतो, पण ज्याची मजुरी वाढत्या महागाईपुढे तोकडी पडत आहे त्या शेतमजुराची व्यथा समाजाच्या नजरेआड राहते.

या बदलाचे एक महत्त्वाचे आर्थिक कारण आहे. गेल्या अनेक वर्षांत शेती-उत्पादनातून होणारे उत्पन्न घटत आहे आणि मजुरीवर अवलंबित्व वाढत आहे. शेतीतील नफ्याने घर चालत नाही, म्हणून कुटुंबातील सदस्य मजुरीसाठी बाहेर पडतात. पण खताच्या किमती आणि इंधनखर्च वाढल्याने शेतमालकही मजुरांना कमी दिवस काम देऊ लागतो. परिणामी, शेतमजुराच्या हातात येणारे उत्पन्न अपुरे पडते आणि कर्जाचा डोंगर वाढत जातो.

कोंडीतून मार्ग दिसेनासा झाला आहे. राज्यनिहाय आकडेवारी पाहिली २०२४ मध्ये महाराष्ट्रात शेतकरी आणि शेतमजुरांच्या २.८२४ आत्महत्या नोंदवल्या गेल्या. देशातील एकूण कृषी आत्महत्यांमधील तब्बल ३६.२६ टक्के हिस्सा या एका राज्यातून आला. देशातील सर्वांत प्रगत आणि आर्थिकदृष्ट्या बलाढ्य मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची ही अवस्था चिंताजनक आहे.

एनसीआरबी अहवाल या आत्महत्यांची नेमकी कारणे सांगत नाही, पण एक तथ्य नोंद घेण्यासारखे आहे. २०२४मध्ये महाराष्ट्रात पूर व अतिवृष्टीमुळे किमान २० लाख ३७ हजार हेक्टरपेक्षा अधिक पिकांचे नुकसान झाले. हा आकडा देशभरात टोकाच्या हवामानामुळे बाधित एकूण ४० लाख ७२ हजार हेक्टरपैकी जवळपास निम्मा आहे. म्हणजे एकाच राज्याने देशाच्या अर्ध्या पिकनुकसानीचा बोजा उचलला आहे. पीक गेले, उत्पन्न गेले, कर्ज राहिले आणि शेतकऱ्याच्या सहनशक्तीचा बांध फुटला. महाराष्ट्राखालोखाल कर्नाटकात २,९७१, मध्य प्रदेशात ८३५, आंध्र प्रदेशात ७८०, तामिळनाडूत ५०३ आणि छत्तीसगडमध्ये ४८६ आत्महत्या नोंदल्या गेल्या. वाढीच्या दरात मात्र कर्नाटक सर्वांत पुढे आहे. तिथे गतवर्षाच्या तुलनेत २२.६१ टक्क्यांनी वाढ झाली. राजस्थानात १४ टक्के आणि मध्य प्रदेशात ७.४६ टक्के वाढ दिसून आली. आंध्र प्रदेशात मात्र आत्महत्यांमध्ये १५.६७ टक्क्यांची घट नोंदवली गेली हा थोडासा दिलासा. पण एकूण चित्र गडद आहे.

या साऱ्या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग आहे परवडणारी शेती. खत आणि बियाण्यांवरील अनुदान पुरेसे असणे, पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, हमीभाव लागू करणे आणि बाजारात शेतमालाचे योग्य मूल्य मिळण्याची व्यवस्था उभारणे या गोष्टी सोप्या वाटतात, पण प्रत्यक्षात अत्यंत कठीण आहेत. जागतिक स्तरावर युद्ध थांबवणे, ऊर्जाकिमती नियंत्रणात आणणे आणि हवामान बदलांवर उपाय करणे या गोष्टी एका देशाच्या आवाक्याबाहेर आहेत. पण देशांतर्गत धोरणांनी शेतकऱ्याला किमान एक आधार देता येतो की त्याने घेतलेल्या कर्जापायी कुटुंबाची उपासमार होणार नाही आणि पीक गेले तरी तो मोडणार नाही.

जगभरातील तज्ज्ञांचे एकमत आहे की कुपोषण आणि खाद्य असुरक्षेचे संकट आगामी काळात अधिक गहिरे होऊ शकते, जर ऊर्जासंकट, भू-राजकीय तणाव आणि हवामान बदलाचे दुष्परिणाम असेच सुरू राहिले. ज्या देशांमध्ये आणि घरांमध्ये लाखो लोक आधीच उपासमारीशी झुंजत आहेत, तिथे खाद्यकिमतींमधील आणखी वाढ म्हणजे जगण्याचा प्रश्न निर्माण होणे. आणि हा प्रश्न केवळ दुर्गम गावांमध्ये नाही महानगरांच्या झोपडपट्ट्यांमध्ये, छोट्या शहरांतील मजूरवस्त्यांमध्येही तो तितक्याच तीव्रतेने उभा आहे. पण कोणीही लक्षात घेत नाही ही मूलभूत समस्या आहे.

**विकास परसराम मेश्राम**

## भारतीय सेलिब्रिटी ज्योतिषी

राधन पंडित वेट्रिवेल, जे पूर्वी पंडित वेट्रिवेल म्हणून ओळखले जात होते.हे तामिळनाडूच्या राजकारणातील त्यांच्या सहभागासाठी ओळखले जाणारे एक प्रसिद्ध भारतीय सेलिब्रिटी ज्योतिषी, अंकशास्त्रज्ञ आणि आध्यात्मिक गुरू आहेत.२०२६ च्या तामिळनाडू निवडणुकीतअभिनेते-राजकारणी विजय यांच्या सत्तेवर येण्याचे आणि त्यांच्या पक्षाच्या (तामिळगा वेट्रि कझगम-टीव्हीके ) यशाचे अचूक भाकीत केल्यामुळे ते विशेष चर्चेत आले.

राधन पंडित वेट्रिवेल संबंधी मुख्य तपशील येथे आहेत:-शासकीय नियुक्ती: मे २०२६ पासून, त्यांची तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्याकडे राजकीय विशेष कार्य अधिकारी (ओएसडी) म्हणून



नियुक्ती करण्यात आली आहे.

पार्श्वभूमी: मूळचे दक्षिण भारतातील असलेले ते २००८ मध्ये दिल्लीला स्थलांतरित झाले आणि पंडित वेट्रिवेल या नावाने ओळखले जाण्याऐवजी राधन पंडित म्हणून ओळखले जाऊ लागले.

भविष्यवाणी: मिळालेल्या माहितीनुसार, त्यांनी विजय यांच्या कुंडलीला 'त्सुनामी कुंडली' म्हटले होते, ज्यात एका मोठ्या राजकीय उलथापालथीची आणि त्यांच्या पक्षाच्या विजयाची भविष्यवाणी केली होती. त्यांनी तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री जे. जयललिता यांच्यासह अनेक राजकीय व्यक्तींना सल्ला दिल्याचे ज्ञात आहे.

आध्यात्मिक मार्गदर्शन: वैदिक ज्योतिष, ध्यान आणि 'जाणीवेचे अनुभवात्मक विज्ञान' यामध्ये विशेष प्राविण्य मिळवून, नेते, सीईओ आणि सरकारी अधिकाऱ्यांना सल्ला देण्याचा त्यांचा ४० वर्षांहून अधिक अनुभव असल्याचा दावा आहे.

त्यांच्या ओएसडी पदावरील नियुक्तीमुळे ऑनलाइन वाद निर्माण झाला, ज्यात टीकाकारांनी एका खाजगी ज्योतिषाची सरकारी पदावर नियुक्ती करण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, तर समर्थकांनी हा मुख्यमंत्र्यांचा विशेषाधिकार असल्याचे सांगून त्याचे समर्थन केले.

**(साभार व्हॉट्स ॲप)**

## विशेष गाड्या वेळेवर धावाव्यात

कधीकधी, विशेष गाड्यांना ५ ते ६ तासांचा विलंब होतो. भाडेही जास्त असते, मग विशेष गाड्यांना इतका उशीर का होतो? रेल्वे विभाग जर कोणत्याही विशेष गाड्या चालवत असेल, तर त्यांनी सर्वप्रथम त्या गाड्या वेळेवर धावतील याची खात्री करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

उदाहरणार्थ, जर एखादी विशेष गाडी धावत असेल, तर कोणत्याही सुपरफास्ट गाडीने त्या गाडीला ओव्हरटेक करू नये. दुरंतो एक्सप्रेस आणि राजधानी एक्सप्रेस वगळता इतर कोणत्याही गाडीने विशेष गाडीला ओव्हरटेक करू नये. कारण त्यांचे भाडे जास्त असते.अनेकदा असे दिसून येते की विशेष गाड्यांमध्ये पाण्याची कमतरता असते. ज्यामुळे प्रवाशांना मोठी गैरसोय होते. प्रत्येक प्रमुख स्थानकावर पाणीपुरवठ्याची तपासणी केली पाहिजे.विशेष गाड्यांमधील स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक डब्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले पाहिजेत. कारण गाड्यांमध्ये वारंवार चोऱ्या होतात. ज्यामुळे प्रवाशांचे मोबाईल फोन आणि मौल्यवान वस्तूंची चोरी होते. प्रत्येक विशेष गाडीवर आरपीएफ कर्मचारी तैनात केले पाहिजेत. आम्हाला आशा आहे की रेल्वे विभाग याकडे लक्ष देईल.

**राजेश पी.करिया**
राधे नगर,अकोला (महा)

## ममतांची मोगलाई आणि इडी आघाडीची अगतिकता!

ममता बॅनर्जी या 'इंडिया' आघाडीतील महत्त्वाचा घटक असल्याने, त्यांच्या राज्यात होणाऱ्या हिंदूंवरील अत्याचारांवर बोलण्याची हिंमत राहुल गांधी किंवा इतर मित्रपक्षांनी दाखवली नाही.तेथील जनता व भाजप जमिनीवर उतरून ममतांच्या मोगलाई विरोधात लढत होता. जेव्हा सर्व सामान्य जनता, भाजप कार्यकर्ते रस्त्यावर रक्त सांडत होते, तेव्हा स्वतःला लोकशाहीचे रक्षक म्हणवणारे आघाडीतील इतर पक्ष सोयीस्कर मौन बाळगून होते. विरोधकांच्या या अगतिकतेमुळे आणि स्वार्थी राजकारणामुळे बंगालची जनता स्वतःला पोरकी समजत होती.'मां, माटी, मानुष'च्या वल्गना करणाऱ्या सरकारच्या काळात महिलांची सुरक्षा रामभरोसे झाली. कोलकाता येथील आर. जी. कर मेडिकल कॉलेजमधील डॉक्टरवर झालेला अत्याचार आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. या घटनेनंतर ज्या पद्धतीने राज्य सरकारने पुरावे नष्ट करण्याचा आणि आरोपींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला,त्यावरून ममतांच्या कारभाराला 'मोगलाई'ची उपमा देणे सार्थ ठरते.महिलांच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेला हा अविश्वासच तृणमूलच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण ठरले.ममता बॅनर्जी यांनी आपल्या कार्यकाळात मुस्लिम मतपेटी सुरक्षित ठेवण्यासाठी 'तुष्टीकरणाचे' सर्व विक्रम मोडीत काढले. एका विशिष्ट समुदायासाठी सवलतींची खैरात आणि बहुसंख्य हिंदू समाजासाठी मात्र जाचक अटी, यामुळे समाजात मोठी दरी निर्माण झाली. बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांवर ममतांनी बाळगलेले मौन आणि सीमावर्ती भागातील घुसखोरीकडे केलेले दुर्लक्ष यामुळे हिंदू समाज स्वतःच्याच राज्यात असुरक्षित झाला होता.सत्ता ही जनतेची सेवा करण्यासाठी असते, छळण्यासाठी नाही. १५ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर बंगालच्या जनतेने दिलेला कौल हा परिवर्तनासाठी दिलेला कौल आहे.

**अविनाश देशपांडे**

## इंधन बचतीचे उपाय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन इचाईच्या पार्श्वभूमीवर काटकसरीचे काही उपाय सुचविले आहेत सरकारी पातळीवर याची अंमलबजावणी होणे अतिशय जरुरी वाटते. आज प्रत्येक मंत्री मंत्रिमंडळाच्या बैठकीला स्वतंत्रपणे जात असतात.तीन चार जणांनी एकत्र गेल्यास इंधन वाचू शकत.सरकारी कार्यालयातील ऑफिसेस मध्ये जेव्हा कर्मचाऱ्यांना बाहेर जावयाचे असते तेव्हा लाईट व पंखे बंद करावेत कर्मचाऱ्यांनी ऑफिस चे अंतर कमी असल्यास सायकलीचा वापर करणे योग्य आहे.मेट्रोचाही वापर करावा. पेट्रोल व डिझेलची वाहने वापरण्या ऐवजी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करावा .वाहनांचा ताफा कमी असावा.शपथ विधी किंवा स्वागत समारंभाला जाताना एका मंत्र्याने उपस्थित राहावे यात उपस्थिती महत्वाची आहे . काही बैठका ऑनलाईन पद्धतीने आयोजित करणे शक्य आहे.मंत्र्यांच्या बंगल्याची दुरुस्ती किंवा रिनोव्हेशन अगदी आवश्यक असेल तेथेच करावे.सरकारी पातळीवर इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवावा. इंधन टंचाई असेतोपर्यंत स्वइच्छेने मंत्री व आमदार यांनी पगाराचा काही भाग सरकारी पातळीवर जमा करावा मंत्र्यांनी आपल्या खात्याच्या बैठका ऑनलाईन पद्धतीने घ्याव्यात.विमान वापरावयाचे असल्यास मुख्यमंत्र्यांची परवानगी आवश्यक असावी.सरकारी कार्यालयातील खर्च कमी करावा .

**शांताराम वाघ**

# अवैध सावकारीवर महसूल-सहकार विभागाचा धडक छापा

## चार ज्वेलर्सच्या दुकानांवर झडती आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त, पुढील कारवाईचे संकेत

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : जिल्ह्यात अवैध सावकारी विरोधात महसूल, सहकार व पोलीस प्रशासनाने संयुक्त धडक कारवाई करत शहरातील चार ज्वेलर्सच्या दुकानांवर झडती मोहीम राबविली. या कारवाईत विविध आक्षेपार्ह दस्तऐवज, सौदेपत्रे, खरेदीखत व अन्य कागदपत्रे जप्त करण्यात आली असून, त्यांची पडताळणी करून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत पुढील कारवाई प्रस्तावित करण्यात येणार आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार,शुभांगी राहुल गुल्हाने यांनी दि. ११ मे २०२६ रोजी पलक ज्वेलर्स, विनायक ज्वेलर्स, राठी ज्वेलर्स आणि



वेदधारिणी ज्वेलर्स यांच्या विरोधात अवैध सावकारी सुरू असल्याची तक्रार तालुका स्तरीय प्रशासकीय समन्वय समितीकडे दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे तहसीलदार तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या आदेशानुसार दि.१३ मे रोजी विशेष सावकारी पथकाने झडती कारवाई केली.कारवाई दरम्यान संबंधित दुकानांची तपासणी करण्यात आली असता, दोन जणांकडे सावकारीचा परवाना असल्याचे समोर आले, तर अन्य दोन जण विनापरवाना धारक सावकारी करत असल्याचा प्राथमिक निष्कर्ष नोंदविण्यात आला. यावेळी दुकानांतून विविध आर्थिक व्यवहाराशी संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली. ही कारवाई सहाय्यक निबंधक तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ रिता निनावे यांच्या नियोजनाखाली चार स्वतंत्र पथकांमार्फत पार पडली. पथकांमध्ये सहकार विभागाचे अधिकारी, महसूल विभागाचे कर्मचारी, ग्राम वसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, पोलीस प्रशासनाचे कर्मचारी तसेच व्हिडीओ फोटोग्राफर सहभागी होते. पथक क्रमांक १ चे नेतृत्व कैलाश खटारे (सहाय्यक निबंधक, घाटंजी), पथक क्रमांक २ चे नेतृत्व व्ही. के. हिरूळकर (दारव्हा), पथक क्रमांक ३ चे नेतृत्व श्रीमती रिता निनावे (यवतमाळ) तर पथक क्रमांक ४ चे नेतृत्व प्रकाश झळके (आर्णी) यांनी केले.संपूर्ण कारवाई जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण तसेच तहसीलदार डॉ. योगेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रशासनाच्या या कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध सावकारी व्यवसायावर मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत असून, संबंधित व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

# शिरपूर पोलिसांची गोवंश तस्करांवर मोठी कारवाई

## २६ लाख ८० हजाराचा मुद्देमाल जप्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - शिरपूर पोलिसांनी अवैध गोवंश तस्करीच्या विरोधात मोठी कारवाई करत ३४ गोवंश बैलांची सुटका केली आहे. या धडाकेबाज कारवाईत पोलिसांनी तब्बल २६ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून तस्करांच्या टोळीचा पर्दाफाश केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १३ मे २०२६ रोजी रात्री शिरपूर पोलिस स्टेशनला अवैध गोवंश वाहतुकीबाबत गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे ठाणेदार संतोष मनवर व त्यांच्या पथकाने शिरपूर ते चारगाव चौकी दरम्यान नाकाबंदी लावली. यादरम्यान वणीकडून शिरपूरकडे



येणाऱ्या अशोक लेलँड कंटेनर क्रमांक NL 01 AG 1288 संशयावरून थांबवून झडती घेतली असता, त्यात ३४ गोवंश बैल अतिशय निर्दयीपणे आखूड दोरीने बांधलेल्या स्थितीत मिळून आले. पोलिसांनी कंटेनर चालक सरगम गुलाबसिंग धुर्वे याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने हे बैल कत्तलीसाठी नागपूर येथील तोसिक अहमद आणि गडचांदूर येथील इरफान यांच्या सांगण्यावरून नेत असल्याचे कबूल केले. या कारवाईत पोलिसांनी ६ लाख ८० हजार रुपये किमतीचे बैल आणि २० लाख रुपयांचा कंटेनर असा एकूण २६ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंधक अधिनियम आणि मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दिग्रसमध्ये शेतकरी संघटनेची भव्य रॅली: 'एचटीबीटी' ला मंजुरी द्या, शेतकरी गुन्हेगार नाही !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस : शेतकरी संघटनेने आज दिग्रस शहरात हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत मोटरसायकल रॅली काढून एचटीबीटी कापूस तंत्रज्ञानाला जलदगती मंजुरी देण्याची जोरदार मागणी केली. तहसीलदारामार्फत शासनाला निवेदन सादर करण्यात आले.

प्रमुख मागण्यामध्ये अप्रमाणित सोयाबीन लागवड कायदेशीर तशीच कापूस व मका लागवड करावी. जनुकीय पिकांच्या क्षेत्रीय चाचणीसाठी राज्यांना 'ना-हरकत प्रमाणपत्र' अट रद्द झाल्याचे



कळवावे कायद्याने बाजारातून सरकी विकत घेऊन डीलिंटिंग व बियाणे प्रक्रिया करण्याचा हक्क दिला आहे, तो मान्य करावा अप्रमाणित बियाणे वापरणारे शेतकरी व पुरवठादार गुन्हेगार नाहीत यावेळी मिलिंद दामले, विजय निवल, राजेंद्र झोटींग, दिपक आनंदवार, देवेंन्द्र राउत, अक्षय महाजन, कृष्णराव भोंगाडे, गिरिश तुर्के, शिवाजीराव शिंदे नांदेड, अविनाश पोळकर, इंदल राठोड, मनिष जाधव, पंडीतराव भेंडेकर गुरुजी वाशिम, चंद्रशेखर देशमुख, शंकर राठोड, विनोद जाधव वसंतनगर, रमेश पाटील ठाकरे, डॉ. राजेश देशमुख, रमेश गावंडे, सतिश ठाकरे, बालाजी ठाकरे, विजय ठाकरे, बच्चूसेठ खंडलोया, राजु पाटिल, सुनिल साबळे, रामसिंग चव्हाण, प्रेम आंबेकर, विनोद काळे, एकनाथ करमाळे, गोलु गावंडे, तुकारामजी गोरे, विठ्ठलराव देशमुख, गजाननराव देशमुख, रियाज पठाण, रायसिंग राठोड, अजय राठोड, विजय जवके, रमेश अंड्रस्कर, रामराव राठोड, बाळकृष्ण गावंडे, अमित तायडे, सुरेश अट्टल, हर्षद देशमुख, श्रीकांत देशमुख, संदिप देशमुख, हक्कम चव्हाण, दिवाकर सुनकेवार, राम गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, सचिन तिपसेटवार, नामदेव जाधव* यांच्यासह नांदगव्हाण, तुपटाकळी, चिचपातर, बेलोरा, धानोरा, सावंगा, लाख, उवणाव, वाई, मेंढी, महागांव, डेहणी, कांदळी, वसंतनगर, वरंदळी, विठोली, लिंबा, रामनगर, सिंगद, मांडवा, हरसुल येथील असंख्य शेतकरी उपस्थित होते. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

# युनिव्हर्सल इंग्लिश स्कूल सलग २१ व्या वर्षी १०० टक्के निकाल

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - येथील युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूलने इयत्ता दहावीच्या निकालात सलग 21 व्या वर्षी 100 टक्के निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे उमरखेड तालुक्यातील पहिले तीन क्रमांक या शाळेच्या विद्यार्थ्यांनी पटकावून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला.

कु. ओवी महेश चिन्नावार हिने 97.20 टक्के गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. कु. समृद्धी सुनील निलावार हिने 96.60 टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर आयुष संजय देशमुख याने 96 टक्के गुण मिळवत तालुक्यात तृतीय क्रमांक प्राप्त केला. यावर्षी शाळेतील एकूण 60 विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी 53 विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून उर्वरित सात विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/४००/२०२६
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- ११/०५/२०२६

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार मोहम्मद इलियास मोहम्मद उमर रा.उमरखेड ता.उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची पुतणी नामे शबाना बेगम मोहम्मद हारुण जन्म दि-०४/०१/१९९२ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक ३०.०५.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा./-
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# यवतमाळ जिल्ह्यासाठी आदर्श ठरणारा सर्वधर्मीय विवाह सोहळा

## श्रीरामपूर येथे ६० वा नि:शुल्क सामूहिक विवाह

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - वाढत्या दिखाऊपणा मुळे आणि अनावश्यक खर्चामुळे विवाह सोहळे आर्थिक ओझे बनत असताना श्रीरामपूर येथे आयोजित सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याने समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. गुरुकुंज मोझरी येथील जीवन प्रचारक अरुण महाराज सालोडकर यांनी हा उपक्रम संपूर्ण यवतमाळ जिल्ह्याने आदर्श म्हणून घ्यावा," असे प्रतिपादन केले.

गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर व ग्रामपंचायत श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामजयंती महोत्सवानिमित्त सुसंस्कार शिबिर, कीर्तनमाला व निःशुल्क सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना सालोडकर म्हणाले की, "आजच्या विवाह सोहळ्यांत चैनीला अधिक महत्त्व दिले जाते. मात्र येथे देवी-देवतांचा आशीर्वाद, गुरुदेवांची कृपा आणि संस्कारांचा संगम दिसून येतो. नवदांपत्यांनी समाजऋण फेडण्यासाठी



समाजकार्यात सक्रिय सहभागी व्हावे. या कार्यक्रमाला जिल्हा सेवाधिकारी दत्ता मार्कंड, भाजपा जिल्हाध्यक्ष दीपाली जाधव, विजय इंगोले, बाबाराव केशवे, नारायण महाराज, विठ्ठल चव्हाण, मुरलीधर धनरे, आशिष काळबांडे, भारत पेंशनवार आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी गुरुदेव सेवा मंडळाच्या समाजोपयोगी कार्याचे कौतुक करत गरजू कुटुंबांनी अशा सामूहिक विवाह सोहळ्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी श्रद्धेय कुसुमताई धर्माळे स्मृती जीवनगौरव पुरस्कार ज्ञानेश्वर ताकतोडे यांना, आदर्श प्रचारक पुरस्कार शिवशंकर नागरे यांना तर सेवा सन्मान पुरस्कार पंजाब गडदे यांना प्रदान करण्यात आला.सोहळ्यात पाच गरजू जोडप्यांचे विवाह राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या आदर्श पद्धतीने पार पडले. नववधूंना मंगळसूत्र, चांदीचे जोडवे, शालू तर वरांना ड्रेस, चप्पल, संसारोपयोगी साहित्य व शिवप्रभा ट्रस्टतर्फे शिलाई मशीन देण्यात आल्या. शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या सोहळ्याने सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

# नेरच्या तीन विद्यार्थ्यांची अझीम प्रेमजी विद्यापीठात १०० टक्के शिष्यवृत्तीवर निवड

**जनमाध्यम प्रतिनिधी**

नेर - तालुक्यातील तीन होतकरू विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ब्राह्मणवाडा (पश्चिम) येथील शितल चंदुजी रामटेके, इंद्रठाणा येथील शुभम ओंकार डोंगरे आणि सावरगाव (काळे) येथील वैष्णवी उमेश चातुरकर यांची देशातील नामांकित अझीम प्रेमजी युनिव्हर्सिटी मध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी १०० टक्के शिष्यवृत्तीवर निवड झाली आहे.

शितलची बंगळुरू कॅम्पससाठी एम.ए. डेव्हलपमेंट, शुभमची रांची कॅम्पससाठी एम.ए. एज्युकेशन, तर वैष्णवीची भोपाळ कॅम्पससाठी निवड झाली आहे. विशेष म्हणजे, तिन्ही विद्यार्थी अत्यंत सामान्य कुटुंबातील आहेत. शितल ही भूमिहीन शेतकरी कुटुंबातील असून तिचे आई-वडील रोजमजुरी करून संसार चालवतात. शुभमचे पालक अल्पभूधारक शेतकरी आहेत, तर वैष्णवीचे वडील गावात सलून व्यवसाय करतात. आर्थिक अडचणी असूनही पालकांनी मुलांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. तिघांनीही १२ वी नंतर यवतमाळ येथील सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालयातून बीएसडब्ल्यूचे शिक्षण घेतले. शिक्षणा दरम्यान एकलव्य इंडिया फाउंडेशन च्या मार्गदर्शनाखाली त्यांनी उच्च शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न केले. ग्रामीण भागातील मर्यादित साधनसामग्री, आर्थिक अडचणी आणि संघर्ष यांवर मात करत त्यांनी मिळवलेले हे यश नेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळाली असून शिक्षणाच्या बळावर मोठे ध्येय गाठता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.



# सोन्याची पोत पळविली

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : एका मंगल कार्यालयातील महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत अंदाजे १५ हजार ६३६ रुपयांची कुणीतरी अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही घटना सुयोग मंगल कार्यालय जांब रोड येथे घडली. रेखा दिलीप चोडके (६०) रा. सत्यसाई ज्योत मंगल कार्यालय यवतमाळ. असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी अवधूतवाडी पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/४०२/२०२६
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- २९/०४/२०२६

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शेख साबीर शेख इमाम रा. उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की. त्यांची मुलगी नामे महेक परवीन शेख साबीर जन्म दिनांक १६/०२/२००९ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक २०/०६/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

स्वा./-
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# परमेश्वर माध्यमिक विद्यालय लोहरा (ई) चा निकाल ९१.४२ टक्के

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - युवक मंडळ पुसद द्वारा संचालित, परमेश्वर माध्यमिक विद्यालय लोहरा (ई) या शाळेचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९१.४२ टक्के लागला असून विद्यालयाने ग्रामीण भागात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यालयातून एकूण ३६ विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले होते त्यापैकी ३५ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेत प्रविष्ट झाले परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाच्या एकूण निकाल ९१.४२% इतका लागला. निकालाच्या विश्लेषणाानुसार ०८ विद्यार्थी प्राविण्यश्रेणीत २० विद्यार्थी प्रथम श्रेणीत ०३विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर ०१ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे विद्यालयातील



गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये मनीष रामराव मुखाडे याने ८२.८०% गुण घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला. कु. साक्षी अर्जुन चव्हाण हिने ८१.६० टक्के घेऊन तृतीय क्रमांक तर ओम संतोष पवार याने ८०.८० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच वैभव आणि राठोड याने ७९.४० टक्के , कु. नेहा एकनाथ चिरंगे हिने ७८.४० टक्के, कु .प्रतीक्षा संतोष झोडगे हिने ७७.४०टक्के, आदित्य बाळू कराळे याने ७७.२० टक्के, कु. सिम्पल ज्ञानेश्वर पवार हीने ७६.८० टक्के गुण मिळवून प्रावीण्य प्राप्त केले व शाळेच्या यशात भर घातली. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल युवक मंडळ पुसदचे सचिव मा. विजयभाऊ जाधव, मुख्याध्यापक शिवशंकर घरडे, वर्गशिक्षक एस. बी. राठोड , बी. डब्ल्यू. जमधाडे , अनिल वायकोस, शिवाजी राणे, ए. व्ही. राठोड, मनोज राठोड,नितीन हगवने, मदन जाधव, रमेश राठोड, रामदास यमजलवाड या सर्वांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन तथा कौतुक केले आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकाचे योग्य मार्गदर्शन विद्यार्थ्यांचे परिश्रम आणि पालकांचे सहकार्य मिळाले.

# ११ वी प्रवेश प्रक्रिया: विद्यार्थ्यांसाठी सोय की डोकेदुखी ?

## किचकट वेबसाईटमुळे विद्यार्थ्यांच्या सासेहोळपाट. दुसरा पर्याय का नाही?

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - दहावीचा निकाल लागल्यानंतर विद्यार्थ्यांच्या मनात महाविद्यालयात जाण्याची एक वेगळीच उत्सुकता असते. पुढील शिक्षणाची दिशा ठरवणारा ११ वीचा टप्पा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाचा असतो. मात्र, सध्या सुरू असलेल्या ११ वीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेने विद्यार्थ्यांचा हा उत्साह हिरावून घेतला असून, त्यांच्या वाट्याला केवळ निराशा आणि मनस्ताप आला आहे. प्रवेशासाठी वापरण्यात येणारी वेबसाईट अत्यंत संथ (Slow), किचकट असल्याने विद्यार्थ्यांसह पालकही त्रस्त झाले आहेत.

सर्वात मोठा प्रश्न हा उपस्थित राहतो की, नुकतेच दहावी उत्तीर्ण झालेले, साधारण १५-१६ वर्षे वयाचे हे विद्यार्थी आहेत. त्यांच्यासाठी एवढी गुंतागुंतीची आणि किचकट वेबसाईट का तयार करण्यात आली आहे? प्रवेशाची प्रक्रिया सोपी, सुटसुटीत आणि सामान्य माणसाला समजेल अशी असायला हवी, जेणेकरून कोणत्याही विद्यार्थ्याला घरबसल्या आपला अर्ज सहज भरता येईल. मात्र, सध्याची परिस्थिती याच्या अगदी उलट आहे. अनेक विद्यार्थी रात्र-रात्र जागून किंवा सायबर कॅफेमध्ये तासनतास ताटकळत बसून फॉर्म भरण्याचा प्रयत्न करत आहेत. शिक्षणाकडे वाटचाल करण्यासाठी ठेवलेला हा पहिलाच टप्पा जर एवढा कठीण आणि त्रासदायक असेल, तर विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर याचा काय परिणाम होईल? तंत्रज्ञानाचा वापर हा कामे अधिक जलद आणि सोपी करण्यासाठी होतो, पण इथे मात्र प्रशासनाच्या तंत्रज्ञानानेच विद्यार्थ्यांची अडचण वाढवली आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी एखादा सोपा पर्याय नक्कीच उपलब्ध होऊ शकला असता. एकाच वेळी लाखो विद्यार्थी प्रवेशासाठी वेबसाईटला भेट देणार आहेत, प्रक्रिया कमी टप्प्यांची आणि समजायला सोपी का ठेवली जात नाही? हे प्रश्न सध्या प्रत्येक विद्यार्थी आणि पालक विचारत आहे.

# "लालटेन भेट" आंदोलनातून केंद्र सरकार विरोधात बहुजन मुक्ति पार्टीचा एल्गार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांविरोधात बहुजन मुक्ति पार्टीच्या वतीने मंगळवारी यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयावर "लालटेन भेट" आंदोलन करण्यात आले. वाढती महागाई, बेरोजगारी, स्मार्ट मीटरच्या नावाखाली होत असलेली आर्थिक लूट, वाढते वीज बिल, पेट्रोल-डिझेल दरवाढ तसेच घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या वाढत्या किमतींविरोधात आंदोलनकर्त्यांनी तीव्र घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला.

12 मे 2026 रोजी सकाळी 11 वाजता पार पडलेल्या या आंदोलनात बहुजन समाज, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, युवक व विविध संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. देशातील 625 जिल्ह्यांमध्ये एकाचवेळी आंदोलन करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. "स्मार्ट मीटर



हटवा", "जनतेची लूट बंद करा", "महागाई कमी करा", "बेरोजगारांना न्याय द्या" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. सरकार खासगी कंपन्यांच्या फायद्यासाठी स्मार्ट मीटर लादत असून सामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. वीज पुरवठा नसतानाही अवाजवी बिल आकारले जात असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. आंदोलनादरम्यान स्मार्ट मीटर हटवून पारदर्शक मीटर बसविणे, चुकीच्या वीज बिलाची रक्कम ग्राहकांना परत करणे, घरगुती गॅस सिलेंडर 400 रुपयांत व कमर्शियल सिलेंडर 700 रुपयांत उपलब्ध करून देणे, गॅस काळाबाजार थांबवणे तसेच हॉटेल, ढाबा व रेस्टॉरंट व्यावसायिकांना नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व बिमोद मुधाणे यांनी केले. यावेळी भुवन मुनेश्वर, सुनील गवई, प्रशांत मुनेश्वर, राजीव डफाडे, किशोर मुनेश्वर, उत्तमराव बनसोड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# शमसुल उलूम उर्दू हायस्कूल, पुसदचा दहावी परीक्षेत घवघवीत यश

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - मुस्लिम मायनॉरिटी सोशल वेल्फेअर अँड एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित पुसद येथील शमसूल उलूम उर्दू हायस्कूल पुसद या विद्यालयाने सन २०२६ च्या दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी शाळेतील एकूण ५६ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी तब्बल ५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा एकूण निकाल ९८.२१ टक्के इतका लागला आहे.

निकालामध्ये १८ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळविले असून २४ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे. तसेच १३ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीमध्ये यश संपादन केले आहे. या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अकील मिर्झा, सचिव अब्दुल रहमान, उपाध्यक्ष शेख अतीक, सहसचिव शोएब खान, संस्थेचे इतर सदस्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक शेख परवेज यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शाळेच्या या अभिमानास्पद यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून विद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'एकाग्रता आणि जिद्द' हीच यशाची गुरुकिल्ली

## सहायक जिल्हाधिकारी रेवैयाह डोंगरे

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या मोहापासून दूर राहून अभ्यासात एकाग्रता, सातत्य आणि लक्ष्य गाठण्याची जिद्द ठेवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन भारतीय प्रशासकीय सेवेतील सहायक जिल्हाधिकारी रेवैयाह डोंगरे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे आयोजित 'युवा संवाद' कार्यक्रमात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी विकास मीना होते. यावेळी उपजिल्हाधिकारी पूनम अहिरे, शिक्षणाधिकारी किशोर पागोरे, मुख्यमंत्री फेलो विठ्ठल गाडगे, प्रसाद कुलकर्णी, कुणाल पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व स्पर्धा परीक्षार्थी उपस्थित होते. रेवैयाह डोंगरे




यांनी तेलंगणातील 'सुपर ५०' आश्रम शाळेपासून आयआयटी मद्रास आणि त्यानंतर युपीएससीपर्यंतचा संघर्षमय प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. इंग्रजी माध्यमातील अडचणी, आर्थिक परिस्थिती, ओएनजीसीमधील कठीण नोकरी आणि अपघातानंतरच्या विश्रांतीचा अभ्यासासाठी केलेला उपयोग याबाबत सांगताना त्यांनी "आपदा में अवसर" ही म्हण सार्थ ठरवली. स्पर्धा परीक्षेतील यशासाठी त्यांनी 'एनसीईआरटी' पुस्तकांपासून अभ्यास सुरू करणे, मर्यादित व दर्जेदार अभ्याससामग्री वापरणे, सातत्याने उजळणी करणे, मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करणे आणि युट्यूबचा स्मार्ट अभ्यासासाठी वापर करण्याचा सल्ला दिला. जिल्हाधिकारी विकास मीना यांनीही योग्य मार्गदर्शन, शिस्त आणि रणनीती असल्यास कोणत्याही कोचिंगशिवाय युपीएससीसारख्या परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतात, असे सांगून विद्यार्थ्यांना मोठी ध्येये ठेवण्याचे आवाहन केले. जिल्हा प्रशासनाच्या 'युवा संवाद' उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## विदर्भातील शाळा १५जुनला सुरु करण्याच्या विरोधात

# शिक्षक समितीची नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील शाळांचे शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासंबंधाने महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने उच्च न्यायालय,नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे.१२मेला याचिकेची सुनावणी सुट्टी कालीन न्यायाधीश रजनिश व्यास यांचेकडे झाली.शिक्षक समिती याचिकाकर्त्याचे वतीने अ‍ॅड. (डॉ.) बी. जी. कुलकर्णी काम पाहत आहेत.प्रतिवादी शासनाकडे नोटीस पाठविण्यात आल्या आहेत.पुढील सुनावणी ९ जून २०२६ रोजी होईल.अशी माहीती प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी दिल्याचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.



सुट्टयाबाबत राज्यात एकसमानता येण्यासाठी राज्य शासनाने १५ जुनपासून शाळा सूरू करण्याचा निर्णय घेतला. पण यास विदर्भात विरोध होत आहे. त्याचे विविध कारणे दिल्या जातात. महाराष्ट्रातील सर्वच विभागातील शाळा दरवर्षी १५ जूनला सुरू करण्यासाठी २००७ मध्ये शासन निर्णय काढला होता. या निर्णयाला विरोध म्हणून विदर्भात शिक्षक समितीसह अन्य काही शिक्षक संघटनांनी आंदोलन केले.शेवटी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठात (सिटिझन फोरम महाराष्ट्र सह, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, पुरोगामी शिक्षक संघटना, शिक्षक सेना) या तीन शिक्षक संघटनांनी या सर्व पिटीशनमध्ये कोर्टाने जो निकाल दिला होता, उच्च न्यायालयाने विदर्भ शाळा सुरू करण्याबाबतचा निकालाचा संदर्भ दिल्या जात आहे.

महाराष्ट्र शासनाने संपूर्ण राज्यात शाळा सुरू करण्याच्या तारखेत समानता आणण्यासाठी एक शासन निर्णय निर्गमित केला होता. त्यानुसार, विदर्भातील शाळा देखील १५ जूनपासून सुरू करण्याचे आदेश देण्यात आले होते. या निर्णयाला विदर्भातील विविध संघटनांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले होते.याचिकाकर्त्यांचा मुख्य युक्तिवाद हवामानातील तफावत : विदर्भात जून महिन्यात तापमान अत्यंत जास्त असते. अशा परिस्थितीत शाळा सुरू करणे विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी (उदा. उष्माघात) घातक ठरू शकते.यावर्षी सुध्दा ही परीस्थिती आहे.

महाराष्ट्राच्या इतर भागांच्या तुलनेत विदर्भाची भौगोलिक आणि हवामान स्थिती वेगळी आहे, त्यामुळे सरसकट एकच नियम लावणे अयोग्य आहे. न्यायालयाने शासनाच्या निर्णयावर कडक ताशेरे ओढले. शासनाने विदर्भातील तापमानाचा आणि हवामान खात्याच्या आकडेवारीचा कोणताही वस्तुनिष्ठ अभ्यास न करता हा निर्णय घेतला आहे.कलम १४ चे उल्लंघन होत आहे. प्रादेशिक भिन्नता विचारात न घेता घेतलेला हा निर्णय 'समानतेच्या तत्त्वाचा' भंग करणारा आणि मनमानी स्वरूपाचा आहे.आरोग्य आणि हवामान तज्ज्ञांचा सल्ला न घेतल्यामुळे हा निर्णय प्रशासकीयदृष्ट्या त्रुटीयुक्त ठरतो.

न्यायालयाने शासनाचा तो निर्णय केवळ विदर्भविभागापुरता रद्दबातल ठरवला होता. विदर्भासाठी स्वतंत्र शैक्षणिक वेळापत्रक आणि शाळा सुरू करण्याची तारीख निश्चित करण्याचे स्वातंत्र्य शासनाला दिले, मात्र ते वस्तुनिष्ठ डेटावर आधारित असावे असे निर्देश दिले. धोरणात्मक निर्णय घेताना राज्याची भौगोलिक विविधता आणि प्रादेशिक गरजा लक्षात घेणे अनिवार्य असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. हा निकाल प्रशासकीय निर्णयांमध्ये 'प्रादेशिक वास्तव' आणि 'विद्यार्थ्यांचे हित' यांना सर्वोच्च स्थान देणारा ठरला आहे.विदर्भात जवळपास दहा दिवस शाळा उशिरा सुरू होत असल्याने राज्यातील अन्य जिल्ह्याच्या तुलनेत दिवाळीच्या सुट्टया कमी आहेत.काही भागात गणेशोत्सवाच्या अधिकच्या सुट्टया असतात; तर ठाणे सारख्या जिल्ह्यात नाताळाच्या अधिक सुट्टया असतात. सातारा जिल्ह्यातील पाटण आणि महाबळेश्वर या अतिवृष्टीच्या भागात पावसाळ्यात विद्यार्थ्यांना होणारा त्रास लक्षात घेता उन्हाळ्यात शाळा सुरू असते व पावसाळ्याच जुलै ऑगस्ट महिन्यात काही दिवस शाळांना सुट्टी असतात.त्या वेळ पासुन विदर्भातील शाळा २६जुन कींवा त्या नंतर भरत होत्या पण काही वर्षा पासुन संबंधित अधिकारी न्यायालयाचा विचार न करता एकवाक्यता या नावा खाली शाळा सुरु करण्याचा प्रयत्न करत आहे.पण याला विदर्भातील संघटना यांचा विरोध असून विदर्भातील शाळा २६जुन कींवा त्या नंतरच सुरु कराव्यात व परीपत्रक रद्द करण्या विरोधात,शिक्षण विभागातील संबंधित अधिकारी यांच्या विरोधात याचिका दाखल केली त्याची पुढिल सुनावणी ९जुनला अशी माहीती प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.

## संक्षिप्त

### छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा



**ब्राह्मणवाडा थडी-**चांदूरबाजार तालुक्यातील ब्राम्हणवाडा थडी येथे हिंदवी स्वराज्याचे रक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने भव्य जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही १४ मे २०२६ ला सायंकाळी ६ वाजता ग्रामपंचायत कार्यालय चौक, ब्राह्मणवाडा थडी येथे हा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे.सोहळ्यात महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, अभिवादन तसेच विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या हिंदुत्व ऐतिहासिक आणि प्रेरणादायी सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी सर्व संभाजी भक्त, नागरिक, महिला व युवकांना उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक कमांडर धीरजराजे सुरेशपंत सातपुते संपर्कप्रमुख शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी केले आहे.

### शिवमंदिराच्या जीर्णोद्धारासाठी २१ हजारांची देणगी



**अमरावती-**स्थानिक संगमेश्वर नगर येथील शिवमंदिराच्या जीर्णोद्धारासाठी स्व. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने २१ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. ट्रस्टचे अध्यक्ष विवेक गुल्हाने यांनी मंदिर व्यवस्थापनाकडे धनादेश सुपूर्द करत सामाजिक व धार्मिक कार्यात आपला सक्रिय सहभाग नोंदवला.सदर शिवमंदिर हे परिसरातील भाविकांचे प्रमुख श्रद्धास्थान असून, गेल्या काही काळापासून मंदिराच्या जीर्णोद्धाराची गरज भासत होती. मंदिराच्या दुरुस्ती व सुशोभीकरणासाठी आवश्यक निधी उभारण्याचे प्रयत्न सुरू असताना ट्रस्टच्या या योगदानामुळे कामाला निश्चितच गती मिळणार असल्याचे मंदिर व्यवस्थापनाने नमूद केले.यावेळी विवेक गुल्हाने यांच्यासह कानसिंह राणावत, देवकिशन बहरूपी, राजू देशमुख, ओम देशमुख, सचिन राऊत, भीमराव इंदौरे, प्रतीक इंदौरे, सविता इंदौरे, विभा देशमुख, सुनील आमले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती-**शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश १२ ते २६ मे च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

### जागतिक तंबाखू नकार दिनानिमित्त जनजागृती

**अमरावती-**येत्या ३१ मे २०२६ च्या जागतिक तंबाखू नकार दिनाचे औचित्य साधून अमरावती जिल्हा आरोग्य विभागामार्फत तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत व्यापक जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. 'व्यसनाला नकार, आरोग्याचा स्वीकार' हा निर्धार करीत १ मे महाराष्ट्र दिनी जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये अधिकारी, कर्मचारी आणि रुग्णांना तंबाखू मुक्तीची सामूहिक शपथ देण्यात आली. धूम्रपान व थुंकणाऱ्यांवर कलम ४ नुसार २०० रुपये दंडात्मक कारवाई केली जात आहे. तसेच, कलम ६(ब) नुसार शाळा-महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखू विक्रीवर कडक बंदी आहे. नागरिकांनी भुलथापांना बळी न पडता तंबाखूमुक्त व्हावे आणि आपले कुटुंब सुरक्षित ठेवावे, असे आवाहन डॉ. पवार यांनी केले आहे.

### भूमिपूजन सोहळा आज

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित मॉडेल डिग्री कॉलेज, बिरसिंगपूर, बुलढाणा येथील नूतन इमारतीचा भूमिपूजन सोहळा १४ मे, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ना. प्रतापराव जाधव, राज्यमंत्री, आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा राज्यमंत्री, आरोग्य व कुटुंब कल्याण, भारत सरकार आणि ना.रक्षाताई खडसे, राज्यमंत्री, युवक कल्याण व क्रीडा, भारत सरकार यांचे शुभहस्ते मॉडेल डिग्री कॉलेज परिसर, अजिंठा रोड, ग्राम-बिरसिंगपूर, बुलढाणा येथे संपन्न होणार आहे. भूमिपूजन सोहळ्याचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे सहपालकमंत्री ना. संजय सावकारे, महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.मकरंद जाधव (पाटील) व महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अ‍ॅड. आकाश फुंडकर उपस्थित राहतील.

## अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी अरुण डोंगरे

**अमरावती/का.प्र.**



सामान्य प्रशासन विभागाच्या ३० एप्रिल २०२६ च्या अधिसूचनेनुसार अरुण किशोर डोंगरे यांची अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी डोंगरे यांना पद व गोपनियतेची शपथ दिली.

नवीन प्रशासन भवन, मुंबई येथील महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या कार्यालयात झालेल्या शपथग्रहण सोहळ्यामध्ये माजी आयुक्त दिलीप शिंदे यांनी नियुक्तीची अधिसूचना वाचून दाखविली. अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल नवनियुक्त आयुक्त अरुण डोंगरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले.

या शपथविधी सोहळ्याला विधानसभा सदस्य करण देवतळे, राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे, कोकण विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त बलदेव सिंह, पुणे विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त सुधाकर तेलंग तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## नियोजनचा निधी तातडीने खर्च होण्यासाठी प्रयत्न करावेत-जिल्हाधिकारी

**अमरावती/का.प्र**



चालू आर्थिक वर्षासाठी जिल्हा नियोजनला ६०५ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सध्यास्थितीमध्ये प्राप्त निधीच्या खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येतील. त्यामुळे यंत्रणांनी जिल्हा नियोजनचा निधी तातडीने खर्च होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

महसूल भवनातील बैठकीला जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे यांच्यासह यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी येरेकर यांनी सुरुवातीला जिल्हा नियोजनच्या बैठकीमधील उपस्थित मुद्यांबाबत अनुपालन अहवालाबाबत माहिती घेतली. त्यानंतर यावर्षी मंजूर निधीपैकी ६० टक्के निधी प्राप्त झाला असल्याने प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे यंत्रणांनी तातडीने याबाबत कार्यवाही सुरू करावी. येत्या जूनमध्ये प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रशासकीय मान्यता घेताना कामाच्या याद्यांबाबत लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावे. त्यानंतर प्रस्ताव सादर करावेत. जिल्हा नियोजनच्या कामांना एमएच-यूडीआयडी क्रमांक देण्यात येणार आहे. त्यामुळे ही कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात यावी.जिल्हा नियोजनमधून केलेल्या कामांना कार्यालय प्रमुखांनी भेटी द्याव्यात. यात कामाचा दर्जा तपासण्यात यावा. जिल्हा परिषद आणि अन्य यंत्रणांना निधी दोन वर्षे खर्च करण्याची परवानगी आहे. त्यामुळे गेल्यावर्षीची कामे तातडीने पूर्ण होतील, याची काळजी घ्यावी. तसेच सेवा हक्क अधिनियमात अधिसूचित सेवा विहित कालमर्यादेत देण्यात यावा. याबाबत कार्यालयाला प्राप्त अर्ज निकाली काढावेत. याबाबत नियमित आढावा घेण्यात यावा, असे निर्देशही जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिले.

## मनपाच्या वतीने १८०६ प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षण

### नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

भारतीय जनगणना २०२७ च्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने अमरावती शहरातील जनगणना प्रक्रिया सुरळीत व अचूक पार पाडण्यासाठी व्यापक तयारी करण्यात आली असून, यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या १८०६ प्रगणक व पर्यवेक्षक यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. जनगणना ही देशाच्या विकास आराखड्यासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया मानली जात असल्याने प्रशासनाने यासाठी काटेकोर नियोजन सुरू केले आहे. प्रगणकांना नागरिकांशी संवाद कसा साधावा, माहिती संकलनाची प्रक्रिया कशी पार पाडावी तसेच डिजिटल प्रणालीचा वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे प्रगणकांना प्रत्यक्ष कामकाजाची माहिती मिळाली असून जनगणना अधिक प्रभावीपणे राबवण्यास मदत होणार आहे.

महानगरपालिकेच्या आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी वर्षा लड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली ही जनगणनेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून प्रत्यक्ष प्रशिक्षणामध्ये प्रात्यक्षिक देण्यात आले. संपूर्ण जनगणना मोहीम राबवण्यात येणार आहे. त्यांनी नागरिकांना जनगणनेत सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. जनगणना ही केवळ लोकसंख्येची मोजणी नसून शासनाच्या विविध योजना, विकासकामे, निधी वितरण आणि भविष्यातील नियोजनासाठी महत्त्वपूर्ण आधार असतो. त्यामुळे नागरिकांनी अचूक माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे त्यांनी सांगितले. या जनगणनेत दोन टप्प्यांमध्ये माहिती संकलन करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात १ मे ते १५ मे दरम्यान स्वगणना प्रक्रिया राबविण्यात येणार असून नागरिकांना स्वतःची माहिती ऑनलाइन पद्धतीने भरता येणार आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणक नागरिकांच्या घरी भेट देऊन प्रत्यक्ष माहिती संकलित करणार आहेत. या प्रक्रियेत नागरिकांना ३३ प्रश्न विचारण्यात येणार असून कुटुंबातील सदस्यांची माहिती, निवास व्यवस्था स्थिती यासंदर्भातील माहिती नोंदवण्यात येणार आहे. महानगरपालिका प्रशासनाने जनगणना प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज केली असून नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त वर्षा लड्डा यांनी केले आहे.

## भारत कृषक समाजाची राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक

### शेतकऱ्यांच्या निधीत वाढ आणि कृषी धोरणात बदल करण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**



डॉ. पंजाबराव देशमुख यांनी स्थापीत केलेल्या अराजकीय भारत कृषक समाजाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक गुजरातच्या अहमदाबाद येथे राष्ट्रीय अध्यक्ष अजय वीर जाखड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत देशातील सर्व राज्यांतील राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य सहभागी झाले होते.

महाराष्ट्र राज्याचे भारत कृषक समाजाचे संयोजक डॉ. वसंत लुंगे यांनी सांगितले की, बैठकीत अध्यक्षांनी मागील वर्षातील उपक्रम, यश आणि या वर्षाच्या उद्दिष्टांविषयी माहिती दिली. ते म्हणाले की, कृषी धोरण आणि देशातील शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या समस्यांबाबत नीती आयोग, केंद्रीय अर्थ आणि कृषीमंत्री तसेच सचिव स्तरावरील उच्च अधिकाऱ्यांशी चर्चा झाली. अधिकाऱ्यांसोबत बैठका आयोजित करून सरकारवर दबाव आणण्याचे आणि समस्यांवर उपाय सुचवण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. बैठकीत, गावे, शेती आणि शेतकऱ्यांसाठीचे बजेट अपुरे असल्याचे म्हटले गेले आणि ते वाढवण्याच्या मागणीसोबतच, वाटप केलेल्या बजेटपैकी जवळपास अर्धा निधी खर्च न झाल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली.

बैठकीत, कृषी धोरण आणि शेतकऱ्यांसाठीचे सरकारी निर्णय तयार करताना शेतकऱ्यांच्या सूचनांना प्राधान्य देण्याची आणि कृषी संबंधित संस्थांमध्ये देशाच्या विविध भागातील शेतकऱ्यांच्या खऱ्या प्रतिनिधींचा सहभाग सुनिश्चित करण्याची मागणी करण्यासोबतच, आधारभूत किंमत, बाजारपेठ, आयात-निर्यात, जागतिक व्यापार संघटनेकडून वाढता दबाव, कृषी निविष्ठांची कमतरता आणि वाढत्या किमतींमुळे शेती खर्चात होणारी वाढ या समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य दिल्लीहून लोकेंद्र सिंग, महाराष्ट्रातून मुरलीधर पाटील, डॉ. वसंत लुंगे, तामिळनाडूचे अंडूगौडा, पंजाबचे सुखपाल भुल्लर, मेजर मनमोहन सिंग, हरियाणाचे चंदबीर सिंग, कर्नाटकचे मनोज सिंग हजारी, ओडिशाचे प्रदीप मोहंती, मती देबा स्मिता, मध्यप्रदेशमधून चौधरी भरत सिंग, पश्चिम बंगालचे हसानू जमाल, बिहारमधून मनोज झा, राजस्थानचे आर.एस. जाखड़, उत्तर प्रदेशचे विजय दीक्षित यांच्यासह झारखंड, काश्मीर, तेलंगणा, वृद्ध गुजरात आदी राज्यांतील शेतकरी प्रतिनिधींनी केंद्र सरकारला सादर करावयाच्या शिफारशींच्या नवीन मसुद्यात समाविष्ट केलेल्या महत्त्वाच्या सूचना मांडल्या.

## आरोग्य विभागाची गरुडझेप:२८ बालकांना थॅलेसिमियामुक्त नवजीवन!

### जागतिक थॅलेसिमिया दिनानिमित्त 'एचएलए' तपासणी शिबीर

**अमरावती/का.प्र.**

एका आईच्या डोळ्यांतील आनंदाश्रू, वडिलांच्या चेहऱ्यावर उमललेले हास्य आणि रक्ताच्या बाटल्यांपासून मुक्त झालेलं बालपण... हे सुखद चित्र आज अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयामुळे साकार झाले आहे. 'जागतिक थॅलेसिमिया दिनाचे' औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या विशेष शिबिरात अमरावती आरोग्य विभागाने थॅलेसिमियामुक्तीच्या दिशेने एक आशादायी पाऊल टाकले असून, आतापर्यंत २८ बालकांना यशस्वी बोन मॅरो ट्रान्सप्लांटद्वारे नवे आयुष्य मिळाले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

जिल्हा सामान्य रुग्णालयातील डे केअर युनिट आणि संकल्प इंडिया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक थॅलेसिमिया दिनानिमित्त मोफत एचएलए तपासणी शिबिर नुकतेच पार पडले. बोन मॅरो ट्रान्सप्लांटसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या तपासणीमुळे अनेक बालकांना भविष्यात थॅलेसिमियामुक्त जीवन जगण्याची नवी आशा मिळाली आहे. या शिबिरात २० बालकांच्या कुटुंबीयांची तपासणी करण्यात आली.

जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या डे केअर युनिटमार्फत सीएमसी वेल्लोर, बंगळुरू, अहमदाबाद, ऐंण्ण मुंबई व इतर नामांकित रुग्णालयांमध्ये आतापर्यंत २८ बालकांचे यशस्वी बोन मॅरो ट्रान्सप्लांट करण्यात आले असून ही सर्व बालके आज निरोगी आणि थॅलेसिमियामुक्त आयुष्य जगत आहेत.

जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या डे केअर युनिटव्दारे आयोजित शिबिरात २४७ रुग्णांना अपंग प्रमाणपत्र तर ३५४ रुग्णांना एँऊण कार्ड वितरित करण्यात आले. तसेच ६२ मातांची CVS तपासणी करण्यात आली, ज्याद्वारे ४६ बालके थॅलेसिमियामुक्त असल्याचे जन्मापूर्वीच निष्पन्न झाले. संकल्प इंडिया फाउंडेशनच्या टीमने २० रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांचे रक्तनमुने संकलित करून पुढील तपासणीसाठी बंगळुरू येथे पाठविले आहेत. कार्यक्रमास जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रमोद निरवणे, डॉ. संदीप हेडाऊ, डॉ. सोळंके सर, डॉ.मनीष पाडिया, डॉ. सोनाली शिरभाते,डॉ. श्याम गावंडे उपस्थित होते.संचालन व आभार प्रदर्शन मनोज सहारे यांनी केले.उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी त्रिशिला सरदार, डॉ. वासनकर मॅडम, डॉ. काबळे,ललिता अग्रवाल, चव्हाण सिस्टर तसेच डे केअर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

# सोन्याचे भाव आणि अर्थव्यवस्था

काल पंतप्रधान श्री मोदींनी नागरिकांना वर्षभर सोने खरेदी करू नका असे आवाहन केले. त्या निमित्ताने सोन्याचे आंतरराष्ट्रीय बाजारात भाव कसे प्रभावित होतात यावर एक नजर! आंतराराष्ट्रीय बाजारात सोन्याचे भाव ५,५०० डॉलर्स प्रती औंस वर पोचून आता ४,७०० डॉलर्स प्रती औंस वर खाली आले आहेत. २०२१ मध्ये हा भाव १७०० ते १९०० डॉलर्स प्रती औंस होता. (एक औंस म्हणजे २८.३५ ग्रॅम्स)

भारतातील सोन्याचे भाव आंतरराष्ट्रीय सोन्याच्या भावाला बॅक टू बॅक फॉलो करतात. अर्थात रुपया डॉलर विनिमय दर त्यावर निर्णायक प्रभाव टाकतो. त्यानुसार भारतात १० ग्रामची किंमत १,६२,००० रुपयांवर जाऊन आता १,५५,००० रुपयांवर आली आहे. सोन्याच्या बाबतीत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा आयातदार देश आहे आपला.२०२५ मध्ये साडेपाच लाख कोटी रुपयांचे परकीय चलन सोने आयातीसाठी देशाने खर्च केले. हे झाले फक्त एका वर्षाचे. काही दशकांचा हिशोब तुम्हीच करा.

असे जरी असले तरी अंतरराष्ट्रीय / म्हणून भारतीय बाजारात सोन्याचे भाव वाढण्यामागे कुटुंबांची सोने खरेदी हे कारण नाही. तर विकसित आणि विकसनशील देशांच्या जवळपास सर्व केंद्रीय बँकांनी गेली काही वर्षे केलेली सोने खरेदी कारणीभूत आहे. २०२२, २०२३,२०२४ या तीन वर्षात जगातील केंद्रीय बँकांनी दरवर्षी सरासरी १००० टन सोने खरेदी केली. २०२५ मध्ये थोडी कमी , ९०० टन. ( एक तोळा म्हणजे दहा ग्रॅम. हजार टन म्हणजे किती तोळे ते तुम्हीच काढा)

जगातील सर्व केंद्रीय बँकाकडील एकत्रित सोन्याचे साठे ऐतिहासिक उंचीवर आहेत.का करत आहेत केंद्रीय बँका सोने खरेदी ? आपापल्या चलनाची स्थिरता ठेवणे हे प्रत्येक केंद्रीय बँकेचे प्राथमिक कर्तव्य असते. त्यासाठी त्यांच्याकडे साठलेले परकीय चलन कोणत्यातरी स्थिर किमतीच्या वित्तीय / भौतिक मत्तेमध्ये गुंतवले जाते. अनेक वर्षे अमेरिकेचा डॉलर असे स्थिर चलन मानले जायचे. त्यामुळे केंद्रीय बँकांकडे जमा होणारे परकीय चलन अमेरिकेन सरकारच्या रोख्यांमध्ये मोठया प्रमाणावर गुंतवले जात होते.पण संदर्भ वेगाने बदलत



आहेत. अमेरिकेअंतर्गत आणि जागतिक पातळीवर देखील

गेल्या वर्षभरातील डोनाल्ड ट्रम्प यांच्या पदाला शोभा न देणाऱ्या अनेक निर्णयामुळे जागतिक अर्थव्यवस्था/व्यापार/ भू राजनैतिक संबंधांमध्ये प्रचंड अनिश्चितता तयार झाली आहे. हे सगळे कोठे जाणार आहे कोणालाच माहित नाही. एवढेच नाही तर अमेरिकेन अर्थव्यवस्था , तेथील महागाई व व्याजदर , अमेरिकेचे सतत वाढणारे कर्ज आणि डी-डॉलरायझेशनच्या चर्चा यामुळे भविष्यात डॉलर कमकुवत आणि अस्थिर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

केंद्रीय बँकांच्या अमेरिकन डॉलर ऐवजी सोन्याचे साठे करण्याला अजून एक निर्णायक कारण ठरले. रशिया युक्रेन युद्धनंतर रशियाच्या केंद्रीय बँकेने अमेरिकेन रोख्यात गुंतवलेले काही शे बिलियन्स डॉलर्स अमेरिकेने गोठवले.सर्वच देशांना भीती वाटते की 'भविष्यात आपले अमेरिकेन सरकरबरोबर काही बिनसले तर अमेरिका केव्हाही आपल्या त्यांच्याकडील गुंतवणुकी गोठवु शकते ; पुढे जाऊन आपल्याच गुंतवणुकीचा आपल्या विरुद्ध ब्लॅकमेल साठी वापर करू शकते'.

एक स्पष्टीकरण:-आपल्या देशातील कुटुंबांनी मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी केल्यामुळे परकीय चलनांवर ताण येतो, सोने एक अनुत्पादक मत्ता आहे. त्या प्रमाणात अर्थव्यवस्थेत उत्पादक मत्तांसाठी भांडवल वळत नाही. त्यामुळे कुटुंबांनी सोन्या बद्दलचे नको तेवढे आकर्षण कमी केले पाहिजे या मताचा मी आहे. गरीब कुटुंबासाठी सोने विकत घेणे, ते गहाण ठेवून कर्ज घेणे सारे आतबट्याचे आहे. सोन्याचे भाव सर्वांच्या जिव्हाळयाच्या विषय आहे. त्याची सद्यकालीन राजकीय अर्थव्यवस्था समजून घेणे एवढाच माफक उद्देश.

**-संजीव चांदोरकर**

# छत्रपती संभाजी महाराजःपराक्रमाचे तेजस्वी प्रतीक



मराठ्यांच्या इतिहासात शौर्य, पराक्रम, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेची असंख्य तेजस्वी उदाहरणे आढळतात. या परंपरेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून भारतीय इतिहासात अभूतपूर्व कार्य केले. मात्र या स्वराज्याचे रक्षण करताना आपल्या प्राणांची आहुती देणारे, संकटांना न डगमगता सामोरे जाणारे आणि मृत्यूला देखील हसत स्वीकारणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होय. १४ मे हा दिवस छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका राजाचा जन्मदिन नसून स्वाभिमान, विद्वत्ता आणि अपराजित धैर्य यांच्या स्मरणाचा दिवस आहे.

संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व केवळ योद्ध्याचे नव्हते, तर ते एक कुशल प्रशासक, अभ्यासू साहित्यिक आणि दूरदृष्टी असलेले राजकारणी होते. त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग हे संघर्ष आणि कटकारस्थानांनी भरलेले होते. आग्रा येथे औरंगजेबाच्या कैदेतून सुटका करताना त्यांनी दाखवलेले धैर्य उल्लेखनीय होते. शिवाजी महाराजांसोबत त्यांनी संकटांना सामोरे जात स्वराज्याचे धडे घेतले. बालवयातच त्यांनी युद्धकला, राजकारण आणि प्रशासन यांचे शिक्षण घेतले. त्यामुळे पुढे राज्यकारभार सांभाळताना त्यांना अनेक अनुभवांचा उपयोग झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यावर मोठे संकट आले. अंतर्गत राजकीय मतभेद आणि बाह्य शत्रूंचे आक्रमण अशा कठीण परिस्थितीत संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा सांभाळली. १६८१ मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला आणि त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्यांच्या कारकिर्दीचा काळ हा अत्यंत संघर्षमय होता. मुघल सम्राट औरंगजेबाने दक्षिणेत उतरून मराठ्यांचे राज्य संपविण्याचा निर्धार केला होता. त्याच वेळी सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्याशीही संघर्ष सुरू होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी धैर्याने आणि चातुर्याने शत्रूंना तोंड दिले.

१६८९ मध्ये संगमेश्वर येथे आपल्यातीलच काहींच्या फितुरीमुळे संभाजी महाराज आणि कवी कलश मुघलांच्या ताब्यात गेले. औरंगजेबाने त्यांना अमानुष छळ दिला. त्यांच्या डोळ्यांसमोर अत्याचार करण्यात आले, शरीराचे हाल करण्यात आले, तरीही त्यांनी स्वाभिमान सोडला नाही. अखेर ११ मार्च १६८९ रोजी त्यांची क्रूर हत्या करण्यात आली. मात्र त्यांच्या बलिदानामुळे मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि स्वराज्य अधिक बळकट झाले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे महत्त्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. त्यांनी दिलेला संदेश संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. संकटे कितीही मोठी असली तरी स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा यांचा त्याग करू नये, हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. त्यांचे बलिदान हे भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे.संभाजी महाराज अत्यंत विद्वान, संवेदनशील आणि कुशल शासक होते. त्यांनी राज्यकारभारात शिस्त, न्याय आणि प्रजेच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांनी शेतकरी, सैनिक आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले.संभाजी महाराजांच्या विद्वत्तेचा विचार केला तर ते त्या काळातील अत्यंत अभ्यासू राजांपैकी एक होते. त्यांनी संस्कृत साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. 'बुधभूषण' या ग्रंथामध्ये त्यांनी राजकारण, नीतिशास्त्र आणि प्रशासन यांवर विचार मांडले आहेत. युद्धाच्या धामधुमीतही साहित्य आणि ज्ञान यांच्याशी त्यांची नाळ जोडलेली होती. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक व्यापक आणि प्रेरणादायी ठरते.

आज महाराष्ट्रात आणि देशभरात संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. व्याख्याने, मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि इतिहास अभ्यास शिबिरे यांच्या माध्यमातून त्यांच्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली जाते. अनेक युवक संघटना आणि सामाजिक संस्था त्यांच्या विचारांचा प्रचार करतात. मात्र केवळ जयंती साजरी करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचे आणि आदर्शांचे पालन करणे अधिक महत्त्वाचे आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# मार्क वाढले म्हणून बुद्धी वाढतेच?

हल्लीचे बारावी चे निकाल पाहिल्यावर हसावे की रडावो,तेच कळेना झाले आहे. आपले गुण मुलांना सांगितले तर आपण मूर्ख किंवा 'ढं' च ठरतो. कारण.. चाळीस,पन्नास टक्क्यावाला विद्यार्थी आता शोधून सुद्धा सापडेना झाला. तर या स्पर्धेत,सॉरी परीक्षेत..काही विद्यार्थ्यांना..चक्क १००% गुण मिळाले आहेत. हे सगळे पाहून मला असा प्रश्न पडतो, की आजच्या पिढीतील ही मुले एवढी बुद्धिमान कशी काय झाली आहेत.? की.. पेपर तपासणाऱ्यांनी जाऊ द्या हो म्हणत.. मार्क देताना खिरापत वाटल्या सारखी त्यांना मदत केली आहे.? कारण.. शंभर टक्के मार्क म्हणजे,पेपर लिहिताना एकही चूक नाही, असा त्याचा अर्थ होतो, आणि..असे खरोखरच होऊ शकते का.? हा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही.

कारण.. आमच्या काळात मराठीच्या पेपरमध्ये काना,मात्रा चुकला तरी अर्धा मार्क गायब व्हायचा.वेलांटी विसरली, अनुस्वार राहिला, पूर्णविराम चुकला, की शिक्षक लाल पेनाने अशी काही फटकारणी मारायचे, की जणू काही आम्ही देशद्रोहच केला असावा, शिवाय मार्क कापणी वेगळीच..आमचे सर तर मराठीत सर्वात चांगल्या निबंधाला ५.५/१० गुण द्यायचे. आम्ही त्याला सुंदर ५५ म्हणायचो. म्हणजे निबंध



चांगला लिहिला आहे. कधी कधी मनात विचार येतो की सरानी निबंध लिहिला तर त्याला तरी सुंदर ५५ गुण मिळतील का! मग आजच्याला पेपर तपासताना हे नियम असतील की नाही.?

गणितात उत्तर बरोबर आले, तरी..मधली पायरी चुकली म्हणून मार्क कापले जायचे. इंग्रजीमध्ये स्पेलिंग चुकले, की संपलेच समजा. विज्ञानाच्या पेपरमध्ये आकृतीत जरा इकडे तिकडे झाले, की.. मार्क होत्याचे नव्हते होऊन जायचे.

आणि आता काय.. पोरांना ९८,९९,१०० टक्के मिळत आहेत. एवढे गुण पाहिले की वाटते, महाराष्ट्रात सगळीकडेच.. ज्ञानेश्वर, आइनस्टाईन आणि विश्वेश्वरय्या सारख्या अभियंत्यांचा वारसा घेऊन मुले जन्माला आले आहेत की काय.?

पूर्वी निकालाच्या दिवशी वातावरण वेगळेच असायचे. एखाद्याला ३५% पडले, तरी हौसेणे त्याच्या घरात पेढे वाटले जायचे. कारण त्याकाळी 'पास' होणे हीच फार मोठी गोष्ट होती. गावात एखादा मुलगा फर्स्ट क्लासमध्ये पास झाला, की त्याचे नाव चहाच्या टपरीपासून किराणा दुकानापर्यंत चर्चेत असायचे. ७०% मिळवणारा म्हणजे अक्षरशः विद्वान समजला जायचा.त्याच्याकडे लोक आदराने पाहायचे. किमान महिनाभर तरी गावात त्याच्या नावाची चर्चा असायची. आणि आता.. ९०% पडले, तरी पोरं आणि त्यांचे आईबाप दोघंही शोकसभेत बसल्यासारखे चेहरे करून बसतात. फक्त ९२ टक्के आले..हे वाक्य आजकाल इतक्या दुःखी सुरात बोलले जाते, की ऐकणाऱ्याला वाटावे, की आता त्या मुलाचे करिअर संपले की आयुष्य उध्वस्त झाले असेल.

पूर्वी वर्गात एखादाच मुलगा हुशार असायचा, बाकीचे त्याच्याकडून गृहपाठ उतरवायचे. आता प्रत्येक गल्लीमध्ये दहा टॉपर निघत आहेत. त्यामुळे 'हुशार' या शब्दाची किंमतच उरलेली नाही. गुण एवढे वाढलेत, की गुणवत्ता कुठे हरवली तेच कळेनासे झाले आहे.

आणि गंमत म्हणजे, त्या काळात कमी मार्क पडूनही लोक जगले, नोकऱ्या केल्या, संसार उभे केले, मुलांना शिकवले. आजच्या भाषेत सांगायचे झाले तर, त्या ३५ टक्केवाल्यांनीच आजचे ९९ टक्केवाले घडवले आहेत.तरी सुद्धा.. या घोडे बाजारात आजही मला ही टॉपर मुले डावीच वाटतात. कारण यांच्याकडे फक्त पुस्तकी ज्ञान आहे..

खरं सांगायचे झाले तर, शिक्षणाचे रूपांतर आता ज्ञानापेक्षा आकड्यांच्या स्पर्धेत झाले आहे. मुलांच्या डोक्यावर टक्केवारीचा एवढा ताण टाकला गेला आहे, की त्यांचं बालपण, खेळ, छंद, मस्ती... सगळंच कुठेतरी हरवत चाललं आहे. पूर्वी निकाल लागला, की आम्हा मित्रांची टोळी विहिरीवर, मैदानावर, सिनेमागृहात किंवा भेळ मिसळीच्या हॉटेलमध्ये जाऊन आनंद साजरा करायची. आणि आता निकाल लागला, की मुलं आणि पालकांसमोर पहिला प्रश्न असतो.. पुढील शिक्षणासाठीचा कटऑफ किती आहे.?


जग बदलले, शिक्षण बदलले, स्पर्धा वाढली हे मान्य आहे. पण एक गोष्ट मात्र खरी.. मार्क वाढले म्हणून बुद्धी वाढतेच असे नाही, आणि मार्क कमी पडले म्हणून आयुष्य संपते असे देखील मुळीच नाही. कारण शेवटी गणिताच्या वहीतले आकडे आणि आयुष्याचे गणित, या दोन्ही गोष्टी खूप वेगळ्या असतात. सुदैवाने की दुर्दैवाने म्हणावे तेच समजेना झाले..पण, या आकड्यांच्या स्पर्धेत धावणाऱ्या आणि त्यात यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचं मनःपूर्वक अभिनंदन.!!

परिक्षेत नापास होणाऱ्यांची घटती संख्या चिंताजनक आहे... सगळ्या विद्यार्थ्यांना ९०% टक्क्यांच्या वर मार्क येत आहेत..मग भविष्यात देश चालवणार कोण? आमदार खासदार आणायचे कुठून?

**(साभार व्हॉट्स)**

# युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेच्या थैट भूमीवरून

जेव्हा १४९२ मध्ये अमेरिकेचा शोध लागला तेव्हा सर्वात अगोदर शोध लागलेल्या बेटाला इंडियाचे नाव वेस्टइंडिज व तेथे जंगलात असलेल्या स्थानिक रहिवाश्यांना इंडियाचे नाव रेड इंडियन का दिल्या गेले? हजारो वर्षापूर्वी इराक.अरबस्तान मधील लोक भारतात येऊन व्यापार करू लागले.त्यामुळे युरोपियन यांना इंडिया नावाचा देश पृथ्वीवर आहे हे माहित झाले होते परंतु निश्चित कुठे आहे हे माहित नव्हते स्पेनच्या राणीने इंडियाचा शोध लावण्याची जबाबदारी कोलंबसला दिली.कोलंबस युरोपच्या पश्चिमेकडे १४७५ला निघाला व तब्बल २०वर्षांनी १४९२ मध्ये सर्वात अगोदर एक लहान बेट दिसले तेच इंडिया आहे असे समजून त्यास इंडियाचा अपभ्रंश करून इंडिज म्हटले व



ते बेट युरोपच्या पश्चिमेकडे असल्यामुळे त्यास वेस्ट इंडिज नाव दिले जे आजही प्रचलित आहे.त्या भागात स्थानिक आदिवासी जंगलात राहत होते ते लाल रंगाचे होते तेच इंडियन आहेत असे समजून त्यांना 'रेड इंडियन' म्हटल्या गेले. ज्यांना आजही अमेरिकेमध्ये 'रेड इंडियन' म्हणूनच ओळख आहे.

**अशोक कविटकर**
वनाधिकारी (निवृत्त). रा. अमरावती(म.रा.)
ह. मु.ऑस्टिन टेक्सास

# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत : सोमनाथची गाथा

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थिती हे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे,ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच 'सोमनाथ चंद्राचा अधिपती' हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व-हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती.सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधी लाकूड आणि गवताची असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.

इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०-५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि-अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तीच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे.सोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल-रहमान अल-मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.

तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा-अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले.पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेङ्गाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२–८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.

१८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर-जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.१९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन 'भक्ती आणि लज्जा' असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२–१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केले: 'या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे.'जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल.

दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला 'हिंदू पुनरुत्थानवाद' म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू-गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे.त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माण मैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना 'ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू' हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो..

'आम्ही अजूनही येथे आहोत.
आम्ही स्मरण ठेवतो.
आम्ही पुन्हा उभारतो.
आम्ही टिकून राहतो.'

**-ब्रिजेश सिंह, प्रधान सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच
अकोला
जिल्हा विशेष

## ...थोडक्यात...

### आस्था योग फाउंडेशनचा उपक्रम; पक्ष्यांसाठी जलपात्र



**अकोला :** स्थानिक वर्धमान नगर येथील गार्डन मध्ये आस्था योग फाउंडेशन व महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे अमरावती विभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत अवचार तथा जिल्हाध्यक्ष उल्हास मोकळकर यांच्या मार्गदर्शनात उन्हाचा पारा ४६ अंशाचे वर गेल्यामुळे मनुष्याच्या जीवाची लाही लाही होत आहे. त्यामुळे पक्षी उन्हामुळे पाण्यावाचून तडफडत आहेत, ही बाब लक्षात येताच गार्डनमध्ये गणेश अवताडे, विनोद देशमुख, शिवाजीराव चव्हाण, किशोर गावंडे, जनार्धन नवथळे, यांनी जलपात्र तयार करून झाडांना लावण्यात आले, या उपक्रमाबद्दल त्यांचे या परिसरातील वॉकिंग करणारे अबाल वृद्ध व योग वर्गातर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

### अ. ज. विद्यार्थ्यांना नामांकित निवासी शाळेत प्रवेशाबाबत आवाहन

**अकोला :** अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेमध्ये इयत्ता १ लीमध्ये प्रवेश देण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छूकांसाठी विनामुल्य प्रवेश अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला येथे, तसेच नजिकच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेत मिळतील.

इतर कोणत्याही माध्यमातुन प्रवेश अर्ज प्राप्त करुन न घेता प्रकल्प कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधुन तसेच नजीकच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेत प्रवेश अर्ज प्राप्त करुन या कार्यालयास सादर करावा. प्रवेश अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असुन अंतिम तारीख दि. २५ मे आहे.सदर योजनेचा लाभ घेणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.पालकाने विद्यार्थ्यांचे नावे सक्षम अधिका-याने दिलेल्या अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकीत प्रत सादर करावी. या योजनेचा लाभ घेउु इच्छिणाऱ्या मुलांच्या पालकाच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा १ लाखच्या आत असणे आवश्यक आहे. (तहसीलदाराचे). इयत्ता १ ली प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांचे वय ६ वर्ष पुर्ण असावे. या योजनेचा लाभ घेवू इच्छिणा-या विदयार्थाचे पालकानी प्रवेश अर्जासोबत संमतीपत्र व दोन पासपोर्ट फोटो जोडावे.

### दहावी परीक्षेत न्यू ईरा हायस्कूलची उज्वल कामगिरी; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**अकोला :** मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या शालांत परीक्षेत न्यू ईरा हायस्कूल, अकोला येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या यशाचा चढता आलेख कायम राखला आहे. यंदा शाळेचा निकाल ८७.५० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक तसेच क्रीडा, एन.सी.सी. व स्काऊट-गाईड क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शाळेतून स्वानंद निलेश उदार याने ८५.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. स्वरुप विनोद ढोणे व कु. देवश्री नितीन जयसिंगपुरे यांनी प्रत्येकी ८०.६० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. अदिती लबडे हिने ७४ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. तसेच मोहन सुभाष गोपनारायण, वेदांत ढोरे, सुमेध देशमुख आणि कृष्णमित बगाडे यांनीही उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. शैक्षणिक यशाबरोबरच विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रातही चमकदार कामगिरी केली. मोहन सुभाष नारायण याने बुद्धीबळ व एन.सी.सी. क्षेत्रात जिल्हास्तरावर यश मिळविले. पूर्वा योगेश सातव व चैताली ऐरंडे यांनी बॉक्सिंग स्पर्धेत राज्यस्तरीय रौप्यपदक पटकावत भारतीय बॉक्सिंग संघात निवड मिळविली.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अकोट यांचे कार्यालय**

क्र. प्रस्तु- ३/तह/कावि - १०७/२०२६ दिनांक-१७/०४/२०२६

जाहीरनामा

मौजे अकोट व इतरत्र लोकांना याव्दारे सूचित करण्यात येते की, अर्जदार कल्पना अभिमन्यु वानखडे, रा फरकाळे नगर अकोट ता अकोट जि अकोला यांनी या कार्यालयात अर्ज करुन, कल्पना अभिमन्यु वानखडे यांचा मौजे अकोट येथे दि. २०/१२/१९७९रोजी जन्म झालेला असून त्याची नोंद विहित मुदतीत मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, अकोट यांना यांच्या जन्म नोंदवहीमध्ये अनावधानाने करण्यात आलेली नसल्यामुळे जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्माची नोंद घेण्याकरीता परवानगी आदेश निर्गमित करण्याबाबत विनंती केली आहे.

उपरोक्त प्रमाणे परवानगी आदेश देण्याबाबत कुणाची काही हरकत / आक्षेप असल्यास हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपली हरकत / आक्षेप लेखी स्वरुपात दाखल करावी. मुदतीनंतर आलेली हरकत / आक्षेप ग्राह धरली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसिलदार,
अकोट**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १५९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# गौण खनिज उत्खनन प्रकरणात शेतक-यांचे जबाब नोंदविले

## मळसुर-पहाडसिंगी रस्त्याच्या कामात मुरूम व खडक वापर प्रकरण ; ठेकेदारांना सात दिवसांची मुदत

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील अतिदुर्गम मळसुर-पहाडसिंगी मार्गाच्या डांबरीकरण कामात कथितरीत्या अवैधरीत्या उत्खनन केलेला मुरूम आणि विहिरीतील खडक वापरण्यात आल्याच्या प्रकरणात महसूल प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. या संदर्भात पातुरचे तहसीलदार राहुल वानखेडे यांनी शेत सपाटीकरणाच्या नावाखाली मुरूम उत्खनन केल्याचा आरोप असलेल्या शेतकऱ्यांचे जबाब नोंदविले असून संबंधित ठेकेदारांना स्पष्टीकरणासाठी सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

मळसुर-पहाडसिंगी रस्त्याच्या डांबरीकरणासाठी मार्च महिन्यात मोठ्या प्रमाणावर विहिरीतील खडकांची रात्रीच्या वेळी वाहतूक करून त्यांचा वापर करण्यात आल्याचा आरोप आहे. महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या आश्रयाने हे काम झाल्याचीही चर्चा परिसरात सुरू आहे. दरम्यान, हा प्रकार उघडकीस आल्यानंतर खडकांच्या वापरावर पडदा टाकण्यासाठी गावंडगाव परिसरातील एका



शेतकऱ्याच्या शेतात सपाटीकरणाच्या नावाखाली जेसीबीच्या सहाय्याने मुरूम उत्खनन करण्यात आल्याचे सांगितले जाते.

८ ते १० ट्रॅक्टरद्वारे शेकडो ब्रास मुरूमाची वाहतूक करून तो रस्त्याच्या कामात वापरण्यात आल्याचा आरोप असून, त्यामुळे शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान झाल्याची बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने संबंधित शेतकऱ्यांना नोटिसा बजावून त्यांचे जबाब नोंदविले आहेत. मात्र, या प्रकरणातील संबंधित ठेकेदारांनी अद्याप जबाब नोंदविलेला नाही. जबाब सादर करण्यासाठी त्यांनी सात दिवसांची मुदत मागितल्याने प्रशासनाने ती मंजूर केली आहे. दरम्यान, हे प्रकरण राजकीय स्तरावर दाबण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा असून जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घालण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

**जबाब नोंदवून पुढील कारवाई**

'गावंडगाव परिसरातील शेतातून मुरूम उत्खनन व विहिरीतील खडक वाहतुकीच्या आरोपांप्रकरणी संबंधित शेतकऱ्यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. ठेकेदारांनी मागितलेल्या वेळेनुसार सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे. जबाब नोंदविण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कारवाई करण्यात येईल,' अशी माहिती तहसीलदार राहुल वानखेडे यांनी दिली.

### दंडात्मक कारवाईचा वेग मंदावल्याने प्रश्नचिन्ह

गौण खनिजांच्या किरकोळ उत्खनन किंवा वाहतुकीच्या प्रकरणांत महसूल विभाग तातडीने दंडात्मक कारवाई करतो. मात्र, या प्रकरणात जेसीबीद्वारे मोठ्या प्रमाणात उत्खनन करून ट्रॅक्टरने वाहतूक झाल्याचे आरोप असूनही अडीच महिने उलटूनही कारवाईची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. लाखो रुपयांच्या महसूल नुकसानीच्या आरोपांनंतरही प्रशासनाची भूमिका मवाळ का, असा सवाल उपस्थित होत आहे.

## अंगणवाडी सेविका सौ. सिंधू डावरे यांचा सन्मान



■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानीय भागीरथ वाडी येथील रहिवासी व देशपांडे प्लॉट येथील अंगणवाडी केंद्र क्रमांक २९ च्या सेविका सौ. सिंधू देवेंद्र डावरे या ३५ वर्षांची यशस्वी सेवा पूर्ण करून नुकत्याच सेवानिवृत्त झाल्यात. त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावंत व समर्पित सेवेबद्दल परिसरातील नागरिकांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.सौ. सिंधू देवेंद्र डावरे यांनी १ जून १९९० रोजी आपल्या अंगणवाडी सेवेला सुरुवात केली. गेल्या ३५ वर्षांत त्यांनी लहान बालकांची जपणूक, गरोदर व स्तनदा मातांना पोषण आहाराचे वितरण, बालकांचे नियमित वजन मोजणे तसेच पूर्व-प्राथमिक शिक्षण देण्याचे कार्य अत्यंत जबाबदारीने पार पाडले. लहान बालकांना अक्षर ओळख व अंक ओळख करून देणे तसेच कुपोषित बालकांसाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद असून, त्यांच्या या सेवेमुळे अनेक बालकांच्या विकासाला योग्य दिशा मिळाली.

## वाट चुकलेल्या चिमुकलीला अकोट ग्रामीण पोलिसांचा आधार ; काही तासांत आईच्या ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरात वाट चुकलेल्या सहा वर्षीय चिमुकलीला अकोट ग्रामीण पोलिसांनी तत्परतेने मदत करून तिच्या आईच्या ताब्यात सुखरूप दिल्याची घटना बुधवारी घडली. पोलिसांच्या संवेदनशील भूमिकेमुळे नागरिकांकडून कौतुक व्यक्त होत आहे.

अकोला येथील श्रावणी मनोज मोकळकर ही सहा वर्षीय मुलगी अकोटमधील शौकत अली चौक परिसरात आपल्या मावशीकडे आली होती. दुपारी चार वाजताच्या सुमारास ती घराबाहेर पडली; मात्र परिसराची माहिती नसल्याने वाट चुकत जवाहर रस्त्याने छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत पोहोचली. घाबरलेल्या अवस्थेत ती रडत



असल्याचे पाहून स्थानिक नागरिकांनी तिची विचारपूस केली; मात्र तिला व्यवस्थित माहिती सांगता येत नव्हती.

दरम्यान, अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याचे दामिनी पथक तांदुळवाडी परिसरातून पेट्रोलिंग करून परत येत असताना चौकात गर्दी दिसली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत चिमुकलीला ताब्यात घेतले. घाबरलेल्या अवस्थेत असलेल्या मुलीला ग्रामीण पोलीस ठाण्यात आणून तिला बिस्कीट, पाणी व नाश्ता देत धीर देण्यात आला.

पोलिसांनी प्रेमाने विचारपूस केल्यानंतर ती अकोल्याहून मावशीकडे आल्याचे तसेच तिची आई पणज येथे असल्याचे सांगत होती. यानंतर पोलीस हवालदार भास्कर सांगळे यांनी पणज येथील पत्रकार दिनेश बोचे

### दामिनी पथकाच्या सतर्कतेमुळे ६ वर्षीय मुलगी सुखरूप परत

यांच्याशी संपर्क साधून मुलीबाबत माहिती घेतली. चौकशीत ही मुलगी पणज येथील किशोर धोंगडे यांच्या नात्यातील असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी मुलीच्या मामाला व आईला संपर्क करून चिमुकलीला त्यांच्या ताब्यात सुखरूप सुपूर्द केले. ही कार्यवाही अकोट ग्रामीण पोलीस निरीक्षक किशोर जूनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक वैभव तायडे, अर्चना इंगळे, दामिनी वानखडे, पोलीस हवालदार भास्कर सांगळे, शुभम लुंघे व शैलेश जाधव यांनी केली.

## रखरखत्या उन्हात वाहतूक पोलिसांची कसरत

■ प्रतिनिधी | अकोला ■

विदर्भात उष्णतेची तीव्र लाट सुरू असून अकोल्यातील तापमानाने ४५ अंशांचा टप्पा ओलांडला आहे. अशा कडक उन्हात शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलीस दिवसभर रस्त्यावर उभे राहून कर्तव्य बजावत आहेत. मात्र, या पोलिसांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सुविधा अद्याप उपलब्ध नसल्याचा मुद्दा आता पुढे आला आहे.

सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून अकोला वाहतूक पोलिसांना 'एअर कूल्ड जॅकेट' उपलब्ध करून देण्याची मागणी केली

- 'एअर कूल्ड जॅकेट'ची मागणी
- अमरावतीत सुविधा, मग अकोल्यात का नाही?
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उमेश इंगळे यांचे पत्र



आहे. इंगळे यांनी पत्रात नमूद केले आहे की, शेजारच्या अमरावती जिल्ह्यात पोलिसांना उष्णतेपासून संरक्षण मिळावे यासाठी आधुनिक 'कूलिंग जॅकेट्स'चे वाटप करण्यात आले आहे. या जॅकेटमुळे शरीराचे तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. मात्र, अमरावतीपेक्षा अधिक तापमानाचा सामना करणाऱ्या अकोल्यातील पोलिसांना अद्याप ही सुविधा मिळालेली नाही.दरम्यान, भर उन्हात वाहतूक नियंत्रण करताना पोलिसांना उष्माघात, थकवा आणि आरोग्याच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचेही इंगळे यांनी पत्रात म्हटले आहे.

शहरातील नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी वाहतूक पोलीस जीवाची पर्वा न करता काम करत असल्याने त्यांना तातडीने 'एअर कूल्ड जॅकेट' उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. या मागणीमुळे आता पोलीस प्रशासन आणि राज्य सरकार अकोला वाहतूक पोलिसांच्या आरोग्य सुरक्षेबाबत कोणता निर्णय घेते, याकडे लक्ष लागले आहे.

## अमानतपूर परिसरातील डम्पिंग यार्डमुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात; तात्काळ हटविण्याची मागणी



■ प्रतिनिधी | अकोला ■

येथून जवळच असलेल्या अमानतपूर कोढा, खडकी, सांगवी मोहाडी परिसरातील डम्पिंग यार्डमुळे संपूर्ण परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दूषित हवा, पाणी व पर्यावरणामुळे लहान मुले, महिला, वृद्ध नागरिक तसेच जनावरांनाही गंभीर त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार डम्पिंग यार्डमधील कचऱ्याचे योग्य वैज्ञानिक व्यवस्थापन होत नसल्यामुळे श्वसनाचे आजार, दुर्गंधी, संसर्गजन्य रोग आणि प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.या संदर्भात प्रदूषण मंडळ व सरपंच आशाताई पांडव, उपसरपंच प्रमोद पटोले आदींना अनेक वेळा निवेदन, तक्रारी करूनही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.सबब संबंधित विभागाने गावा जवळील डम्पिंग यार्ड तात्काळ हटवावे, पर्यायी सुरक्षित जागेची व्यवस्था करावी.

# तीन जिवंत बैलांसह चारशे किलो गोमांस जप्त

## अकोट शहर पोलिसांची कारवाई ; दोघांना अटक, दोघे फरार

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरातील कुरेशीपुरा परिसरात गोवंश जनावरांची अवैध कत्तल सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळताच अकोट शहर पोलिसांच्या डी.बी. पथकाने पहाटे धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत ४०० किलोग्रॅम गोवंश मांस, तीन जिवंत बैल व कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण २ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून दोघे आरोपी फरार झाले आहेत.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवार, १३ मे रोजी पहाटे साडेचार वाजताच्या सुमारास अकोट शहर पोलीस ठाण्याचे डी.बी. पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते यांना कुरेशीपुरा येथील शौकतअली चौक परिसरातील एका घरात गोवंश जनावरांची कत्तल सुरू असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली.



त्यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष तत्काळ छापा टाकला. धाडीदरम्यान चार इसम गोवंश जनावरांची कत्तल करताना आढळून आले. मात्र पोलिसांना पाहताच त्यातील दोघांनी घटनास्थळावरून पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून दोन आरोपींना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये निसार अहमद अब्दुल रहेमान (वय ४८, रा. कसाबपुरा, अकोट) आणि शेख इलीयास अहमद अब्दुल बशीर (वय ४६, रा. इफ्तेखार प्लॉट, अकोट) यांचा समावेश आहे. तर शेख इरफान शेख हनीफ (वय ५२) आणि शेख मुश्ताक शेख कदीर (वय ६५, दोघेही रा. शौकतअली चौक, अकोट) हे आरोपी फरार झाले असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या कारवाईत अंदाजे ८० हजार रुपये किमतीचे ४०० किलो गोवंश मांस, तीन जिवंत बैल तसेच कत्तलीसाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले. प्रकरणी संबंधित कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक अमोल माळवे, डी.बी. पथक प्रमुख पोउपनि निलेश बारहाते, पोहेकॉ गणेश सोळंके, गजानन राठोड, नापोकॉ विपुल सोळंके, पोकॉ अश्विन चव्हाण, मोहन दुर्गे आणि महिला पोलीस कर्मचारी पद्मीन येरणाळे यांनी सहभाग घेतला.

# कचऱ्याच्या ढिगाऱ्यांत गुदमरतेय गांधींची कर्मभूमी

## ‘सुंदर शहर’च्या घोषणा फक्त बॅनरवर; वर्धेकरांच्या नशिबी दुर्गंधी, अस्वच्छता आणि प्रशासनाची उदासीनता

**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधींच्या विचारांनी देशाला स्वच्छतेचा संदेश देणारे वर्धा शहर आज स्वतःच कचऱ्याच्या विळख्यात अडकले आहे. ‘स्वच्छ शहर, सुंदर शहर’च्या घोषणा देत नगरपालिकेकडून कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असला, तरी प्रत्यक्षात शहरातील रस्ते, चौक, गल्लीबोळ आणि बाजारपेठा कचऱ्याच्या ढिगाऱ्यांनी व्यापल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून ‘सुंदर शहर नव्हे, कचरा शहर’ अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

शहरातील अनेक भागांत उघड्यावर साचलेला ओला-सुक्या कचऱ्याचा ढिग, त्यातून येणारी असह्य दुर्गंधी आणि सर्वत्र विखुरलेला प्लास्टिक कचरा हे चित्र आता रोजचे झाले आहे. मुख्य रस्त्यांच्या कडेला, निवासी वस्त्यांमध्ये आणि गर्दीच्या चौकांत कचराकुंड्या ओसंडून वाहताना दिसतात. काही ठिकाणी तर कचरा वेळेवर उचलला जात



नसल्याने भटक्या जनावरांचा आणि डास-माशांचा उपद्रव वाढला आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.विशेष म्हणजे कचरा व्यवस्थापनासाठी नगरपालिकेकडून दरवर्षी मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जातो. स्वच्छता मोहिमा, जनजागृती अभियान आणि प्लास्टिक बंदीच्या घोषणा मोठ्या थाटामाटात केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात परिस्थिती जसंच्या तसं असल्याने हा पैसा जातो कुठे असा प्रश्न नागरिक आता उघडपणे विचारू लागले आहेत.प्लास्टिक बंदीबाबतही प्रशासनाचा केवळ दिखाऊपणा उघड होत आहे. शहरातील बाजारपेठांमध्ये आजही सर्रास प्लास्टिक पिशव्यांचा वापर होताना दिसतो. दंडात्मक कारवाईच्या घोषणा आणि छापेमारीचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्षात बंदीची प्रभावी अंमलबजावणी कुठेच दिसून येत नाही. त्यामुळे प्लास्टिक बंदी ही फक्त कागदोपत्री आणि प्रसिद्धीपुरतीच मर्यादित राहिल्याची टीका नागरिकांतून होत आहे.नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी शंभर दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेताना शहर सुंदर करण्याचा संकल्प जाहीर केला होता. कचरा निर्मूलनासाठी कठोर उपाययोजना आणि स्वच्छतेबाबत ठोस कृतीचे आश्वासनही देण्यात आले होते. मात्र शंभर दिवस उलटूनही शहरातील अस्वच्छतेचे चित्र बदलले नसल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी पसरली आहे.दरम्यान, पावसाळा तोंडावर आल्याने साचलेल्या कचऱ्यामुळे डेंग्यू, मलेरिया आणि इतर साथीच्या रोगांचा धोका वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने शहरातील कचरा हटवून स्वच्छतेची मोहीम युद्धपातळीवर राबवावी, प्लास्टिक बंदीची कठोर अंमलबजावणी करावी आणि ‘सुंदर शहर’च्या घोषणा प्रत्यक्ष कृतीत उतरवाव्यात, अशी जोरदार मागणी आता वर्धेकर नागरिकांकडून होत आहे.

### कचरा उचलणारे ट्रॅक्टरच शहर घाण करतात

वर्धा नगरपालिकेने लाखो रुपयांचा कचरा संकलन ठेका दिला; मात्र कचरा वाहून नेणारे ट्रॅक्टरच रस्त्यावर घाण सांडत फिरत असल्याचे संतापजनक चित्र समोर आले आहे. ट्रॅक्टरमधून प्लास्टिक व ओला कचरा रस्त्यावर पडत असल्याने शहरात दुर्गंधी पसरली आहे. ‘स्वच्छ शहर’च्या घोषणा करणाऱ्या प्रशासनाचा हा भोंगळ कारभार नागरिकांच्या रोषाचे कारण ठरत असून संबंधित ठेकेदारांवर कारवाईची मागणी जोर धरत आहे.





# सावधान! आता वाहतूक पोलिसांच्या अंगावर ‘तिसरा डोळा’

## वर्धा येथे नियम तोडणारे थेट कॅमेऱ्यात कैद होणार

**वर्धा/जनमाध्यम**

भरधाव वेग, दारू पिऊन स्टेअरिंग पकडणारे चालक आणि वाहतूक पोलिसांशी हुज्जत घालणाऱ्यांना आता वर्धा पोलिसांनी जबरदस्त दणका दिला आहे. शहर आणि जिल्ह्यात वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक शाखेच्या अंमलदारांच्या अंगावर आता ‘बॉडीवॉर्न कॅमेरे’ झळकणार असून प्रत्येक कारवाईचा थेट व्हिडीओ पुरावा तयार होणार आहे.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी वाहतूक विभागाला कठोर निर्देश देत अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आक्रमक मोहीम सुरू केली आहे. अति वेगाने वाहन चालविणारे, दारू पिऊन रस्त्यावर जीवाशी खेळ करणारे चालक तसेच मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर आता ‘ऑन कॅमेरा’ कारवाई होणार आहे.

वाहतूक अंमलदारांच्या गणवेशावर बसविण्यात आलेल्या या अत्याधुनिक कॅमेऱ्यांमुळे फोटो, ऑडिओ आणि व्हिडीओ रेकॉर्डिंग एकाच वेळी होणार आहे. विशेष म्हणजे या शासकीय कॅमेऱ्यातील रेकॉर्डिंगमध्ये कोणतीही एडिटिंग किंवा डिलीट करता येणार नसल्याने कारवाईची विश्वासार्हता वाढणार आहे.वाहतूक पोलिसांना चलन करताना अनेकदा चालकांकडून वादविवाद, धमक्या आणि दबावाला सामोरे जावे लागते. मात्र आता प्रत्येक क्षण कॅमेऱ्यात कैद होणार असल्याने पोलिसांच्या सुरक्षेलाही मोठे कवच मिळाले आहे. वरिष्ठ अधिकारीही थेट कारवाईची पाहणी करू शकणार असल्याने अंमलदारांवर जबाबदारी अधिक वाढली आहे.नियम पाळा... अन्यथा कॅमेऱ्यात कैद व्हाल, असा स्पष्ट इशारा वाहतूक विभागाने दिला असून नागरिकांनी सुरक्षित प्रवास करून अपघात टाळावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### वाहनांची तोडफोड; दोघांना मारहाण

**वर्धा-**आर्वी नाका परिसरात कार व दुचाकीची तोडफोड करून दोघांना मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दशरथ कु-हाडे व अंगत सोळंखे यांनी जुन्या वादातून संताप व्यक्त करत वाहनांची तोडफोड केली. यावेळी त्यांनी दोघांना मारहाणही केली. या घटनेत वाहनांचे नुकसान झाले असून जखमींना किरकोळ दुखापत झाली आहे. प्रणय विलास कलोडे यांनी याप्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. घटनेनंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

### भुरट्या सट्टाकिंगवर पोलिसांची कारवाई

**वर्धा-**शहर पोलिसांनी भुरट्या सट्टाकिंगवर धडक कारवाई करीत एका आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी रोख रकमेसह सट्टा साहित्य जप्त केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुलफैल परिसरातील अमर अजय माटे हा अवैधरित्या सट्टा व्यवसाय चालवत असल्याची माहिती शहर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या वेळी आरोपीकडून १ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वन्यप्राणी समोर आल्याने दुचाकी अपघात; एक ठार

**वर्धा-**भरधाव दुचाकीसमोर अचानक वन्यप्राणी आल्याने झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला. ही घटना धाडी शिवारात घडली. रविंद्र रामदास ठाकरे (रा. पंचाळा, ता. आष्टी) असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविंद्र ठाकरे दुचाकीने जात असताना अचानक अज्ञात वन्यप्राणी वाहनासमोर आला. त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात दुचाकी घसरून अपघात झाला. यात रविंद्र ठाकरे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा-**पिपरी मेघे येथील वॉर्ड क्रमांक ३ मध्ये राहणाऱ्या एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. अविनाश राजू मंजूळकर (२०) असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्राप्त माहितीनुसार, अविनाश यांनी राहत्या घरी गळफास घेतल्याचे कुटुंबीयांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांना तातडीने खाली उतरवून रुग्णालयात नेण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# महागाईच्या आगीत बळीराजा होरपळला

## शेती साहित्य दरवाढीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले

**साहूर/जनमाध्यम**

आधीच नापिकी, अवकाळी पाऊस आणि बाजारातील अस्थिरतेने त्रस्त असलेल्या बळीराजावर आता महागाईचा आणखी एक घाव बसला आहे. आखाती देशातील युद्धामुळे कच्च्या मालाच्या दरात झालेल्या प्रचंड वाढीचा थेट फटका शेती व्यवसायाला बसत असून पीव्हीसी पाईप, ठिबक सिंचन, स्प्रिंकलर, प्लंबिंग साहित्य आणि इतर शेती उपयोगी साहित्याच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. परिणामी, यंदाचा शेती खर्च मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

साहूर व परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी आधुनिक सिंचन पद्धतीचा स्वीकार केला आहे. पाण्याची बचत आणि उत्पादनवाढ यासाठी ठिबक व स्प्रिंकलर प्रणाली प्रभावी मानली जाते. मात्र युद्धजन्य परिस्थितीमुळे प्लास्टिक व इतर कच्च्या मालाच्या आयातीत घट झाल्याने उद्योगांना महाग कच्चामाल खरेदी करावा लागत आहे. त्याचा थेट परिणाम शेती साहित्याच्या किमतीवर झाला असून दरात तब्बल ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे शेतकरी सांगत आहेत.पूर्वी शासनाकडून ठिबक सिंचन व शेती साहित्यावर ५० ते १०० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळत होते. त्यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळत होता. मात्र अनेक योजना बंद झाल्यानंतर आता शेतकऱ्यांना सर्व साहित्य स्वखर्चाने घ्यावे लागत आहे. त्यातच बाजारातील भरमसाठ दरवाढीमुळे नवीन सिंचन व्यवस्था उभारणे म्हणजे शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे.पाईपलाईन खोदकाम, फिटिंग, प्लंबिंग साहित्य आणि मजुरीचे दरही वाढल्याने सिंचन प्रकल्पाचा खर्च दीडपट ते दुप्पट झाला आहे. त्यामुळे अनेक शेतकरी नवीन सिंचन योजना राबवण्यापासून मागे हटत असल्याचे चित्र दिसून येत आहे. उत्पादन वाढवण्यासाठी आधुनिक साधने वापरायची, पण तीच आता परवडेनाशी झाली आहेत, अशी हतबल प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.एकीकडे शेतीमालाला हमीभाव नाही, तर दुसरीकडे शेतीसाठी लागणाऱ्या प्रत्येक वस्तूच्या दराने उच्चांक गाठला आहे. त्यामुळे शेती करायची तरी कशी असा प्रश्न आता बळीराजा विचारू लागला आहे. महागाईच्या या भस्मासुराने शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असून शासनाने तातडीने अनुदान योजना सुरू करून दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# भावाकडून भावास मारहाण

**वर्धा-**दारूच्या नशेत घरासमोर खाटेवर झोपलेल्या भावाला काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना सालोड हिरापूर परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमी इरशाद बब्बू शेख (२७) यांनी दिलेल्या तक्रारीवरून सावंगी पोलिसांनी शाहरुख बब्बू शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीला दारू पिण्याची सवय असून किरकोळ कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. त्यानंतर आरोपीने संतापाच्या भरात काठीने मारहाण केली. यात इरशाद शेख जखमी झाले. जखमीवर स्थानिक रुग्णालयात उपचार करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच सावंगी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. परिसरातील नागरिकांनी वाढत्या कौटुंबिक वादांबाबत चिंता व्यक्त केली आहे.

### अज्ञात चोरट्याने दुचाकी लंपास

**वर्धा-**सावळी (बु.) शेतशिवार परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कारंजा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. प्राप्त माहितीनुसार, एमएच २७ बीयू २७२३ क्रमांकाची दुचाकी शेतशिवार परिसरात उभी करण्यात आली होती.

# हिंगणघाटच्या मातीतून झळकला शब्दांचा ‘भीम स्टार’

## संघर्षाच्या राखेतून उभा राहिलेला प्रणय सतलज, आज महाराष्ट्राच्या आंबेडकरी गीतविश्वाचा बुलंद आवाज

**हिंगणघाट/जनमाध्यम**

विदर्भाच्या मातीत जन्मलेला एक सामान्य तरुण आज आपल्या शब्दांच्या ताकदीवर संपूर्ण महाराष्ट्राच्या हृदयावर अधिराज्य गाजवत आहे. हिंगणघाटचे सुपुत्र शायर प्रणय सतलज यांनी संघर्ष, जिद्द आणि सामाजिक बांधिलकीच्या जोरावर आंबेडकरी गीतांना नवी ओळख दिली आहे. भीम स्टार म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या प्रणय सतलज यांच्या गीतांनी आज लाखो तरुणांच्या मनात स्वाभिमानाची ज्योत पेटवली आहे.

प्रणय सतलज यांचे मूळ नाव प्रणय चरणदास खोब्रागडे. शिक्षक वडील चरणदास खोब्रागडे यांच्या संस्कारात वाढलेल्या प्रणय यांना लहानपणापासूनच शायरीची प्रचंड आवड होती. आर्थिक संघर्ष, प्रतिकूल परिस्थिती आणि आयुष्यातील कठीण प्रसंगांना सामोरे जात त्यांनी शब्दांना आपले शस्त्र बनवले. प्रसिद्ध आंबेडकरी गायक सरवर जानी यांच्या सहवासाने त्यांच्या लेखणीला नवी दिशा मिळाली. त्यानंतर नागपूर येथे शिक्षण घेत असताना त्यांचा परिचय आंबेडकरी साहित्य, चळवळ आणि सामाजिक विचारांशी झाला.महागायक प्रकाशनाथ पाटणकर यांच्या प्रेरणेने त्यांनी समाजमनाला भिडणारी गीते लिहायला सुरुवात केली. बोले रमाईचा हर्षाने भीमराव, खिशात मावत नाही नोटा’, पुस्तक भीमाचं रमाईचं, अस्तित्व काय आहे’ यांसारख्या गीतांनी महाराष्ट्रभर प्रचंड लोकप्रियता मिळवली. त्यांच्या गीतांत वेदना, विद्रोह आणि परिवर्तनाचा जाज्वल्य आवाज ऐकायला मिळतो.भीम नगर का बच्चा गरम, भीमाला चॅलेंज नाही, यांसारख्या गीतांनी तरुणाईत नवा उत्साह निर्माण केला. टी-सीरिज, झी म्युझिकसारख्या मोठ्या संस्थांसोबत काम करत त्यांनी अनेक नवोदित कलाकारांनाही व्यासपीठ मिळवून दिले.‘राष्ट्र गौरव २०२३’ आणि छत्रपती शिवाजी महाराष्ट्र राज्य पुरस्कार २०२४ यांसारख्या सन्मानांनी गौरविण्यात आलेले प्रणय सतलज आज लाखो तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. हिंगणघाटच्या मातीतून



उगवलेला हा शब्दांचा तारा भविष्यात आणखी तेजाने झळकणार, हे निश्चित.



# गजानन जिकार यांची दक्ष नागरिक फाऊंडेशनच्या प्रसिद्धी प्रमुखपदी नियुक्ती

**वर्धा/जनमाध्यम**

महिलांवरील व लहान मुलींवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर दक्ष नागरिक फाऊंडेशन पोलीस मित्र यांच्या वतीने जिल्हा कार्यालयात मंगळवारी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत सामाजिक कार्याची दखल घेत गजानन विठोबाजी जिकार यांची वर्धा जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.

बैठकीत फाऊंडेशनच्या कार्याचा उद्देश, सामाजिक जनजागृती, नागरिकांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करणे तसेच महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली.

वाढत्या विघातक व रोगट मानसिकतेविरोधात अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.जिल्हा कार्यकारिणीच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत संघटनेच्या आगामी उपक्रमांची दिशाही निश्चित करण्यात आली. गजानन जिकार यांच्या नियुक्तीमुळे संघटनेच्या प्रसिद्धी व सामाजिक कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, विश्व वारकरी सेना, विविध शेतकरी संघटना तसेच महाराष्ट्र शासन पुरस्कृत पत्रकार संरक्षण समिती यांच्या पदाधिकाऱ्यांनी जिकार यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दीड वर्षांपासून मुख्याध्यापकच बेपत्ता; नारा केंद्र शाळेला प्रशासनाने वाऱ्यावर सोडले

## ग्रामीण शिक्षणाचा कणा मोडण्याचा डाव? पालक संतप्त; ‘जि.प. शाळा वाचवा’चा आक्रोश

**कारंजा घाडगे/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या जिल्हा परिषद शाळांकडे प्रशासन किती बेफिकिरीने पाहते, याचे जिवंत उदाहरण कारंजा तालुक्यातील नारा येथील उच्च प्राथमिक केंद्र शाळेत पाहायला मिळत आहे. तब्बल दीड वर्षांपासून उच्च श्रेणी मुख्याध्यापकाचे पद रिक्त असल्याने शाळेचा कारभार अक्षरशः रामभरोसे सुरू असून पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

१९०५ साली स्थापन झालेली ही ऐतिहासिक शाळा म्हणजे ग्रामीण शिक्षणाचा अभिमान मानली जाते. या शाळेने आजवर आयएएस अधिकारी, चार्टर्ड अकाउंटंट, प्राचार्य, प्राध्यापक, बँक अधिकारी, सैनिक, मंत्रालयातील सहसचिव, पुरातत्त्व विभागातील अधिकारी तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर घडवले आहेत. मात्र आज त्याच शाळेला प्रशासनाच्या उदासीनतेमुळे अक्षरशः उपेक्षेची वागणूक मिळत असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.सध्या शाळेत जवळपास १३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. वर्ग १ ते ५ साठी चार शिक्षक तर ६ ते ८ साठी



दोन शिक्षक कार्यरत आहेत. शिक्षक आपापल्या परीने विद्यार्थ्यांना शिक्षण देत असले तरी मुख्याध्यापक नसल्यामुळे शाळेच्या प्रशासकीय कामकाजावर मोठा परिणाम होत आहे. अनेक महत्त्वाचे निर्णय रखडले असून शाळेचा विकास थांबला असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी गुणवत्तेचा झेंडा कायम उंच ठेवला आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक क्रीडा महोत्सवात नारा येथील विद्यार्थिनी रिया धंडाळे हिने बुद्धिबळ स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा नावलौकिक वाढवला. शिक्षक दिगंबर निमजे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी अनेक क्षेत्रात यश मिळवले आहे. तरीही प्रशासन मात्र या शाळेकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप होत आहे.दरम्यान, जिल्हा परिषद शाळांमध्ये कॉन्व्हेंट पद्धतीचे शिक्षण सुरू झाल्यानंतर ग्रामीण पालकांचा कल पुन्हा जि.प. शाळांकडे वाढू लागला आहे. महागड्या खासगी शाळांऐवजी मोफत आणि दर्जेदार शिक्षणासाठी पालक जिल्हा परिषद शाळांवर विश्वास ठेवत आहेत.

मात्र अशा वेळीच प्रशासनाने मुख्याध्यापकाची जागा रिक्त ठेवून ग्रामीण शिक्षणाच्या मुळावर घाव घातल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.जिल्हा परिषद शाळा टिकल्या तरच ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित राहील, असा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे. येणाऱ्या नवीन शैक्षणिक सत्रापूर्वी नारा केंद्र शाळेला कायमस्वरूपी उच्च श्रेणी मुख्याध्यापक द्यावा, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १६६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# फटाकेबाज बुलेटबाजांचा जुळ्या शहरात धुडगूस

## रात्रीच्या सन्नाट्यात 'धडधड'ची दहशत, -पोलिसांच्या निष्क्रियतेवर नागरिक संतप्त

**अचलपूर/प्रतिनिधीः-** जुळ्या शहरात सध्या एक वेगळीच दहशत नागरिकांच्या छातीत धडधड निर्माण करत आहे. रस्त्यावरून भरधाव वेगाने धावणाऱ्या आणि सायलेन्सरमध्ये बदल करून अक्षरशः फटाक्यांसारखे आवाज करणाऱ्या बुलेटस्वारांनी अचलपूर-परतवाडा शहरातील शांतता भंग केली आहे. रात्री-अपरात्री कानठळ्या बसवणारे आवाज करत धुडगूस घालणाऱ्या या टवाळखोर बुलेटबाजांमुळे नागरिक त्रस्त झाले असून पोलिस प्रशासन मात्र याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत आहे.

अचलपूर-परतवाडा मार्ग, बस स्टॅन्ड परिसर, दुराणी चौक, जयस्तंभ चौक, चिखलदरा रोड, धारणी रोड, वाघामाता रोड ,विदर्भ मील कॉलनी स्टॉप तसेच शहरातील प्रमुख मार्गांवर रात्री उशिरापर्यंत या बुलेटबाजांचा हैदोस सुरू असतो. धडाधड फटाक्यांसारखे आवाज करत वेगाने जाणाऱ्या या दुचाकींमुळे पादचारी, महिला, लहान मुले आणि विशेषतः ज्येष्ठ नागरिक भयभीत होत आहेत. अनेक वेळा अचानक होणाऱ्या या प्रचंड आवाजामुळे लोक दचकून जातात, तर काही ठिकाणी किरकोळ अपघात टळल्याच्या घटनाही समोर येत आहेत.



एकेकाळी रुबाब आणि शिस्तीचे प्रतीक मानली जाणारी बुलेट आज काही टवाळखोरांच्या हातात दहशतीचे साधन बनत चालली आहे. सायलेन्सरमध्ये बेकायदेशीर बदल करून मुद्दाम फटाक्यांचा आवाज काढत रस्त्यावरून फिरणे, ट्रिपल सीट फिरणे, भरधाव वेगाने वाहने चालवणे आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणे, हा या बुलेटबाजांचा नवा 'स्टाईल शो' बनला आहे. कायद्याचा धाक संपल्याने या टवाळखोरांची मुजोरी दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे अनेकदा काही जागरूक नागरिकांनी या बुलेटबाजांना हटकण्याचा प्रयत्न केला असता उलट हे टवाळखोर अंगावर धावून येतात, शिवीगाळ करतात आणि मारहाणीच्या धमक्या देतात. त्यामुळे सामान्य नागरिक भयभीत झाले असून गुंड प्रवृत्तीच्या या बुलेटबाजांविरोधात कोणी उघडपणे बोलण्यासही धजावत नाही. 'पोलिसांचा धाक राहिला असता तर ही मुजोरी वाढली नसती,' अशी संतप्त प्रतिक्रिया अनेक नागरिक व्यक्त करत आहेत.

वाहतूक पोलिसांनी केवळ हेल्मेट तपासणी आणि दंड वसुलीपुरते मर्यादित न राहता अशा फटाकेबाज बुलेटस्वारांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शहरातून होत आहे. सायलेन्सरमध्ये बदल करून ध्वनीप्रदूषण करणाऱ्या वाहनांवर तत्काळ जप्तीची कारवाई करावी, रात्री गस्त वाढवावी तसेच प्रमुख चौकांमध्ये विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

अचलपूर- परतवाडा शहरातील वातावरण आधीच संवेदनशील असताना काही बेफाम वाहनचालकांच्या उन्मादी वर्तनामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वीही किरकोळ कारणांवरून शहरात तणाव निर्माण झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे वेळेत लगाम न घातल्यास एखाद्या दिवशी या टवाळखोर बुलेटबाजांमुळे मोठा अनुचित प्रकार घडण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

'रस्त्यावर स्टंटबाजी आणि फटाकेबाजी करणाऱ्यांना अभय कोणाचे?' असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारत असून पोलिस प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलून जुळ्या शहरातील नागरिकांना या ध्वनीदहशतीतून मुक्त करावे, अशी तीव्र जनभावना व्यक्त होत आहे.

# जळू परिसरात अवैध रेती वाहतूकींवर लोणी पोलिसांची मध्यरात्री कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण भागातील अवैध रेती उत्खनन आणि वाहतुकीविरोधात लोणी पोलिसांनी पुन्हा एकदा कठोर पाऊल उचलत मोठी कारवाई केली. संयुक्त नाकाबंदी दरम्यान पोलिसांनी विनापरवाना रेती वाहून नेणारा टिप्पर पकडून तब्बल १५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात चालक आणि क्लिनरला ताब्यात घेण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लोणी पोलीस स्टेशनला अवैध रेती वाहतुकीबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. त्यानुसार १२ मेच्या रात्री लोणी व नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी संयुक्तरित्या जळू गाव परिसरात नाकाबंदी सुरू केली. दरम्यान संशयित टिप्पर (एमएच २७ बीएक्स ९३८६) अडवून त्याची तपासणी करण्यात आली. तपासात टिप्परमध्ये विनापरवाना रेतीची वाहतूक सुरू असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी वाहनातील सुमारे १२ ब्रास रेती जप्त केली.

कारवाईदरम्यान चालक मिर अब्बास अली रिझवी (रा. अशरफपुरा, अचलपूर) आणि क्लिनर जाहेद शहा (रा. लालखडी, हजरा नगर, अमरावती) यांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत रेतीसह टिप्पर असा एकूण १५.६० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध रेती तस्करीच्या वाढत्या प्रकारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी ग्रामीण पोलिसांनी कारवायांचा धडाका सुरू ठेवला असून, संबंधितांविरोधात कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. ही कारवाई अमरावती ग्रामीण पोलिस अधिक्षक निकेतन कदम, दत्ता तोटेवाड, अशोक थोरात, किरण वानखडे आणि सतिशकुमार खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# शिराळ्यातील जळालेल्या मृतदेह प्रकरणाचे गुढ कायम

## पोलिसांसमोर ओळख पटविण्याचे मोठे आव्हान

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूर बाजार तालुक्यातील शिराळा-नया अकोला रोडवरील निर्जन शेत परिसरात सहा महिन्यांपूर्वी आढळून आलेल्या एका अज्ञात तरुणाच्या जळीत मृतदेहाचे गूढ आजही कायम आहे. काळाच्या ओघात या प्रकरणाची चर्चा कमी झाली असली, तरी 'तो तरुण नेमका कोण होता?' हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे.

६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळच्या सुमारास शेतात अर्धवट जळालेल्या अवस्थेत तरुणाचा मृतदेह आढळून आला होता. मृताचे वय अंदाजे २० ते २५ वर्षे असल्याचे सांगण्यात आले होते. विशेष म्हणजे मृताच्या डोक्यावर आणि पोटावर धारदार शस्त्राने वार झाल्याच्या खुणा दिसून आल्याने हा केवळ अपघाती मृत्यू नसून नियोजित हत्येचा प्रकार असल्याचा संशय सुरुवातीपासूनच व्यक्त करण्यात आला होता. पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेहावर ज्वलनशील पदार्थ टाकून तो जाळण्यात आल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला होता. घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली होती. पोलिसांनी घटनास्थळावरील कपडे, इतर साहित्य तसेच बेपत्ता व्यक्तींच्या नोंदींचा आधार घेत मृताची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, सहा महिन्यांच्या तपासानंतरही कोणताही ठोस धागा हाती लागलेला नाही. दरम्यान, या प्रकरणात वलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपासाची दिशा बदलली आहे.

**नावात बदल**

पासपोर्ट
तेजस संजय रावणगावकर
Tejas Sanjayed Ravangaokar

तेजस संजयराव रावणगावकर
Tejas Sanjayrao Rawangaokar
हे दोन्ही नाव एकाच व्यक्तीचे आहे

MAHAVITARAN

**E-TENDER NOTICE**

Separate sealed Bids in prescribed forms are invited for execution of e-tender for hiring of vehicle for Amravati Testing Division under Amravati Circle for the year 2026-27 of Tender No. SE/AMT/OM/HOV/MVP2020/TESTING DIV/2025-26/T-35R The estimated cost of tender is Rs. 4.92 Lakhs. On line sale of Tender Documents on MSEDCL's website www.mahadiscom.in https://etender.mahadiscom.in from Dt. 13.05.2026 to Dt. 17.05.2026 upto 23.55 hrs. Last date for EMD payment is Dt. 17.05.2026 upto 17.00 hrs.
Email ID. seamravati2011@gmail.com
Contact person Executive Engineer (Adm) Tel. No 0721-2663640
PRO No.112

Superintending Engineer, M.S.E.D.C.Ltd. O&M Circle Office, Amravati

# लक्ष्मी गॅस एजन्सीविरोधात ग्राहकांचा संताप

## दोषीवर कारवाईची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील रुक्मिणी नगर परिसरातील लक्ष्मी गॅस एजन्सीच्या कथित मनमानी कारभारामुळे ग्राहक संतापले आहे. संतापलेल्या ग्राहकांनी आज बुधवार १३ मे रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करून दोषी विरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी केलेली आहे.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, एजन्सी संचालकांची मनमानी सुरू आहे. सिलेंडरची बुकिंग झाल्यावरही सिलेंडर येत नाही. गॅस सबसिडीचे पैसे खात्यात जमा होत आहे, पण सिलेंडर नाही मिळत.

जाब विचारल्यावर कर्मचारी उद्धट भाषेचा वापर करत आहे. एजन्सीचे काही कर्मचारी अतिरिक्त पैसे घेऊन सिलेंडरची ब्लॅक मध्ये विक्री करत असल्याचा आरोपही करण्यात आलेला आहे. नागरिकांनी वितरण गाडीतील कर्मचाऱ्यांना ब्लॅकमध्ये सिलेंडर विकताना पकडण्याचा दावाही केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषीवर कार्यवाही करावी अशी मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केलेली आहे. यावेळी वैशाली अकोटकर, अल्किया फातिमा, स्मिता कासदेकर, शीला काटे, विद्या मोहोड, संगीता घोडेस्वार, अनिल कडू आदि उपस्थित होते.



**जाहीर नोटीस**

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३४१/२०२६ ने.ता.१९.०६.२०२६

**अर्जदार -** १. निर्मलाबाई जानराव धाकडे, वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
२. चंद्रकला अमीत थोरात, वय ६२ वर्षे, धंदा - घरकाम
दोन्ही रा.पाथरे भवन, इमामवाडा, नागपूर, ता.जि.नागपूर
३. सुभाष कैपतराव तंतरपाळे (मयतांचे वारस)
३अ) श्रीमती सुषमा सुभाषराव तंतरपाळे, वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
३ब) रोहीत सुभाषराव तंतरपाळे, वय ३३ वर्षे, धंदा - मजुरी
३क) सौरभ सुभाषराव तंतरपाळे, वय २३ वर्षे, धंदा - मजुरी
३ड) कु.प्रियंका सुभाषराव तंतरपाळे, वय ३० वर्षे, धंदा - घरकाम
३इ) कु.सोनाली सुभाषराव तंतरपाळे, वय २५ वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.कोळविहीर, ता.मोर्शी, जि.अमरावती
ह.मु.पाथरे भवन इमामवाडा, नागपूर, ता.जि.नागपूर
-- विरध्द --
**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ व २ चे वडील तर अर्जदार नं.३अ चे सासरे तर अर्जदार नं३(ब,क,ड,इ) चे आजोबा नामे **कैपतराव गजमल तंतरपाळे,** हे दिनांक **१४.०८.२००३ रोजी** नागपूर, ता.जि.नागपूर येथे मरण पावले. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक / /२०२६ शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 76/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व **विश्व बौध्द संघ ट्रस्ट,** अमरावती
नोंदणी क्रमांक
बाबत अर्जदार - **राहुल वासुदेवराव बेलोकार**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **१२.०५.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**(र.र.ठाकरे)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

**जाहीर नोटीस**

**विद्यमान २२ वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**
सक्सेशन क्र.७७/२०२५ चौ.ता.१२.०६.२०२६

**अर्जदार :** 1. Sunil Ganpat Malokar, Age 57 Yrs. Occu.: Labour
R/o Ram Nagar, Ward No.5, Rajura Bazar, Dist.Amravati
-- विरुध्द --
**गैरअर्जदार :** Post Office Saving Bank through it's Manager
Branch at Gokul Market, Amravati Branch
Tq.Dist.Amravati.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालायात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत **गणपत महादेव मालोकर** यांचे निधन दिनांक **०९.११.२०२४** रोजी झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशीर उत्तराधिकारी आहेत व ईतर कोणीही मयतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. **(रुपये रक्कम ५९,६३८/- अक्षरी रु.एकोणसाठ हजार सहाशे अडोतीस फक्त)**

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, ह्याची नोंद घ्यावी.

आज दिनांक **०४.०२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक (प्रशासन)**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.३०८३/२०२५
**देवराव व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Devrao Khanduji Shendokar, Age 71 Yrs. Occu.: Retired
2. Nilesh Devrao Shendokar, Age 46 Yrs. Occu.: Pvt. Job.
Both R/o Near Hanuman Mandir Santoshi Nagar, Near Vilas Nagar, V.M.V. AmravatiNagar V.M.V. Amravati
3. Pankaj Devraoji Shendokar, Age 42 Yrs. Occu.: Pvt.Job
R/o Bajarang Nagar, VTC-V.M.V., Amravati.
4. Sau.Sarika Rajesh Jawalekar, Age 45 Yrs. Occu.: HOusehold
R/o Flat No.B-202, Amrut Vihar Apartment, Hingna Road, Near Vasudeo Nagar, Metro Station 158, Rajendra Nagar, Nagpur
-- विरुध्द --
**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रेखाताई देवराव शेंडोंकार** यांचे दिनांक **०३.०३.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार देवराव व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **देवराव व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**जाहीर नोटीस**

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र. २२७/२०२६ ने.ता.०४.०७.२०२६

**अर्जदार :** १. अर्चना नितीन कोरडे
वय ५५ धंदा - घरकाम
२. ज्ञानेश्वरी नितीन कोरडे
वय २६ धंदा - घरकाम
दोन्ही रा.शिक्षक कॉलनी, चांदूरबाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
-- विरुध्द --
**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक सोपान नितीन कोरडे** यांचा मृत्यू दिनांक **२४.११.२०२४** रोजी अपघाताने मृत्यू झालेला असून ते कायमचे रा.शिक्षक कॉलनी, चांदूरबाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहीवासी होते. तसेच मृतकाचे वडील **नितीन जनार्धन कोरडे** यांचा देखील मृत्यू झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.क्र.७५/२०२० नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**११.०५.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

**मा. दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.१५३/२०२६ ने.ता.२०.०६.२०२६

**अर्जदार :** १. मंदा शतनसिंग खानंदे,
रा.छत्री तलाव रोड, जेवड नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
२. दिनेश शतनसिंग खानंदे,
रा.स्मशान रोड, जेवड नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. नरेश शतनसिंग खानंदे,
रा.समाज मंदिराजवळ, जेवड नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
४. निलेश शतनसिंग खानंदे,
रा.हिंदु स्मशान भूजीजवळ, जेवड नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
-- विरुध्द --
**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **शतनसिंग रत्नाजी खानंदे** यांचा मृत्यू दि.**२४.०१.२०२६** रोजी **जामगांव** ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. अर्जदार नं.१ ही पत्नी असून अर्जदार नं.२ ते ४ ही मुले आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०७ मे, २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

**जाहीर नोटीस**

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३३७/२०२६ ने.ता.२०.०६.२०२६

**अर्जदार -** १. श्री.प्रशांत रामदास जाधव
वय ४४ वर्षे, धंदा - शेती
रा.वार्ड नं.३, दुर्गवाडा, पो.पार्डी, ता.मोर्शी, जि.अमरावती
-- विरध्द --
**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार चे वडील नामे **रामदास पांडुरंग जाधव,** हे दिनांक **२५.१०.२०१२ रोजी** दुर्गवाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावले. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक / /२०२६ शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 435/225/2025
सार्वजनिक न्यासाचे नांव व **टॅक्स बार असोसिएशन, अमरावती, ता.जि.अमरावती**
नोंदणी क्रमांक **एफ-५९९४**
बाबत अर्जदार - **श्री.रतन नाथुलाल शर्मा**
**गैरअर्जदार -** **१. श्री.राजीव चतुर्भूज जव्हेरी**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये चौकशी करणार आहेत.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०५.०५.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती

**जाहीर नोटीस**

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र. २३०/२०२६ ने.ता.०४.०७.२०२६

**अर्जदार :** १. कुसूम महादेवराव वानखडे, वय ८२ धंदा - निरंक
रा.वार्ड नं.२, भातकुली, ता.भातकुली, जि.अमरावती
२. विश्वास अंबादासजी भोजने, वय ७७ धंदा - सेवानिवृत्त
रा.बेलोरा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
-- विरुध्द --
**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक अंबादास हिरामणजी भोजने** यांचा मृत्यू दिनांक **०६.०३.१९८४** रोजी तसेच **मृतक मनकर्णा अंबादासराव भोजने** यांचा मृत्यू दिनांक **१९.०७.२०१५** रोजी बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२३०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**११.०५.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 45/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व **संकटमोचन हनुमान चॅरिटेबल ट्रस्ट, सरोज कॉलनी, सुतगिरणी** रोड, अमरावती, ता.जि.अमरावती
नोंदणी क्रमांक
बाबत अर्जदार - **श्री.नंदु भिमराव खराटे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०७.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**(श्रीमती वाय.एस.शेख)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २४५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### फुगावात किराणा दुकानात चोरी

**बेलोरा-**चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या फु गाव येथे अज्ञात चोरट्याने किराणा दुकान फोडून सुमारे २५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जीवन बबनराव वानखडे यांचे गावात किराणा दुकान असून, अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने दुकानातील नगदी रक्कम तसेच किराणा सामान असा एकूण अंदाजे २५ हजार रुपयांचा माल चोरून नेला.या प्रकरणी तक्रारीवरून चांदूरबाजार पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार सागर भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल रोशन चव्हाण व सुनील खेरडे पुढील तपास करीत आहेत.

### ७ लाख रुपयांचा रेतीचा मुद्देमाल जप्त

**बेलोरा-**चांदूरबाजार पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे ठोंडा काशी नदीतून होणाऱ्या रेतीच्या चोरीवर कारवाई करत तब्बल ७ लाख रुपयांचा माल जप्त केला आहे.चांदूरबाजारचे ठाणेदार सागर भामरे यांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर पीएसआय प्रदीप कांबळे, रोशन चव्हाण आणि ज्ञानेश्वर गवई यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून ट्रॅक्टरसहित रेती जप्त केली.या कारवाईत आरोपी अनिकेत उर्फ 'सनी' गोपाळराव कवाडे व अमन देशमुख, दोघांना शिराळा येथून अटक करण्यात आली. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

# अकरावी प्रवेशाला सुरुवात; शून्य फेरी ८ मेपासून, पहिली फेरी २१ ते २८ मे

## ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला गती, वर्ग १ जुलैपासून सुरु होणार

**अमरावती/का.प्र.**

दहावीचा निकाल लागल्यानंतर लगेचच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. महेश पालकर यांनी अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली असून, अकरावी प्रवेशाच्या शून्य तसेच पहिल्या फेरीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार ८ मे ते २० मेदरम्यान शून्य फेरी, तर २१ मे २८ मेदरम्यान पहिल्या फेरीतील प्रवेश होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अकरावीसाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जात असून, आतापर्यंत ७ लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरला आहे. अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू असून, विद्यार्थी येत्या ११ मेपासून प्रवेश अर्जातील पहिला व दुसरा भाग भरू शकतात. इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला केवळ ऑनलाइन पद्धतीनेच प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेश अर्ज भरावा, असे आवाहन डॉ. पालकर यांनी केले आहे.

शिक्षण विभागातर्फे अकरावी प्रवेशाची शून्य फेरी ८ मेपासून सुरू झाली असून, विद्यार्थी प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरू शकतात. ११ मे ते १३ मे या कालावधीत विद्यार्थी अर्जाचा पहिला भाग व दुसरा भाग तसेच व्यवस्थापन, अल्पसंख्याक, इन-हाऊस खोट्या संदर्भातील माहिती भरू शकतात. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी किमान एक आणि कमाल १० कनिष्ठ महाविद्यालयांची प्राधान्याने नोंदणी करावी. तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी १४ ते १५ मेदरम्यान प्रसिद्ध केली जाईल. या यादीवर १६ मे रोजी विद्यार्थ्यांना हरकती नोंदवता येतील.

२० मे रोजी पहिल्या फेरीसाठी रिक्त जागा प्रदर्शित केल्या जाणार आहेत.

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला गती मिळाली असून, यंदा २०२६-२७ चे शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यासाठी राज्य व सोबतच अमरावती शिक्षण विभागाने तयारी पूर्ण केली आहे. विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी वेगाने सुरू असून, अकरावीचे वर्ग १ जुलैपासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी दिली आहे.राज्यातील अकरावीची ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया दर वर्षी रेंगाळत असून, या प्रक्रियेत १० फेऱ्यांपेक्षा अधिक फेऱ्या होतात. ग्रामीण भागात काही ठिकाणी तांत्रिक अडचणी निर्माण होतात. यंदा निकाल लवकर जाहीर झाला असून, ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया लवकर सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे अकरावीचे शैक्षणिक वर्ग वेळेत सुरू ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. उर्वरित विद्यार्थ्यांचे प्रवेशही पुढील फेऱ्यांद्वारे तातडीने पूर्ण केले जातील,असे निखिल मानकर उपशिक्षणाधिकारी माध्यमिक अमरावती तथा सहायक शिक्षण उपनिरीक्षक यांनी स्पष्ट केले.सोबतच जिल्हातील विद्यार्थाना प्रवेश करण्याकरीता सुलभता यावी व प्रवेश प्रक्रिया समजावी याकरिता जिल्हास्तरावर मातोश्री विमलाबाई देशमुख (रुलर) अमरावती येथे अकरावी ऑनलाईन मार्गदर्शन केद्र स्थापन केले असुन समन्वयक म्हणून आदित्य गावंडे ९५०३२०३१४० तसेच तालुका निहाय मार्गदर्शन केन्द्राची व समन्वयकाची नावे खालील प्रमाणे तालुका भातकुली रवींद्र राठोड ७५८८०८५८८०, नांदगाव खंडेश्वर सतीश पवार ९८२२६०४३००,चांदूर बाजार मनोज पोकळे ९५०३५७६५२४, अचलपूर मोहम्मद फिरोज खान ९८८१७४२४७६,धामणगाव रेल्वे सुशील नागपुरे ७७४१०१४६६६, तिवसा साचिन जगताप ७५०७००४३५५, चांदूर रेल्वे प्रवीण शिंगाणे ८६००२०१४४२, मोर्शी हर्षल देशमुख ७४२००५८९३१ , वरुड दीपक चांदनबावणे ९४२१००६७७७, दर्यापूर नरेंद्र गोंडाणे ७९७२००१३६३ , शिल्पा चौधरी अजनगाव सुर्जी ९७६६८९०७८४ चिखलदरा सुनील मुंदाणे ८८०५५६००९८,धारणी शिवाजी गुट्टे ९४२३६१०२५० वरिल संबाधित सर्व केंद्र समन्वयकाना संपर्क करण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालय अमरावती यांनी सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व वर्ग दहावीमधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व पालकांना केले आहे.

# दोन एकरांतील केळी जमीनदोस्त

## ठिबकचे ३.५ लाख थकले, कर्जाचा फास वाढला

**अंजनगाव बारी-**परिसरावर नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक संकटाचा तिहेरी तडाखा बसल्याने शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. वादळी वारे, अचानक आलेला मुसळधार पाऊस आणि गारपीट या तिहेरी आघातामुळे केळी, संत्रा आणि कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

सर्व्हे क्रमांक ३९९/१ मधील शेतकरी निखिल श्रीकृष्ण भोपळे यांच्या २ एकर क्षेत्रातील केळी पिकाची परिस्थिती तर अत्यंत भीषण आहे. एकूण २६५० खोडांपैकी तब्बल १६०० ते १८०० खोड जमीनदोस्त झाले असून नुकसान सरळ लाखोंमध्ये गेले आहे. प्रतिकिलो रु. १४ च्या दराने हे अर्थकारण शेतकऱ्यांसाठी प्रचंड धक्कादायक ठरत आहे. घटनेनंतर तलाठी आणि कृषी सहाय्यकांनी पंचनामा पूर्ण केला आहे.याच दरम्यान, आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या भोपळे यांच्या डोक्यावर कर्जाचा भार आणखी वाढला आहे. ठिबक योजनेचे ३.५ लाख रुपये अद्याप मिळाले नाहीत. पीककर्जाची रक्कम १ लाख ३७ हजारांवर पोहोचली असून परतफेडीचा ताण दिवसेंदिवस वाढत चालला आहे. कृषी केंद्राचे थकित पैसे चुकवण्यासाठी भोपळेंना आपली एसआयपी मोडावी लागली, ज्यामुळे त्यांची आर्थिक सुरक्षितता पूर्णपणे ढासळली. सर्व खर्च भागवल्यावर त्यांच्या हातात केवळ हेक्टरी २२ हजार रुपये उरले आणि २ एक्कर केळी नुकसान भरपाई १७ हजार रुपये रक्कमच भोपळे यांना मिळणार. पुढील हंगाम उभा करण्यासाठी ही रक्कम अत्यंत अपुरी ठरणार हे स्पष्ट आहे.अचानक आलेल्या आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे श्रम, गुंतवणूक आणि वर्षभराची अपेक्षा एका क्षणात कोसळली आहे. नैसर्गिक आघात, वाढता कर्जाचा बोजा, प्रलंबित अनुदान आणि महागाई या चक्रव्यूहात शेतकरी पूर्णपणे अडकला आहे. शेतकऱ्यांकडून शासनाने तात्काळ मदत, नुकसान भरपाई, कर्जसवलत आणि प्रलंबित ठिबक अनुदानाची त्वरित सोडवणूक करण्याची मागणी तीव्र झाली आहे.

वादळानं १८०० केळी खोड एका क्षणात उखडून टाकली. ज्यामुळे लाखोंचे नुकसान झाले, पण शासनाकडून अद्याप कोणतेही ठोस पाऊल उचलल्या गेले नाही. ठिबकचे ३.५ लाख अडकले, कर्जाचा फास घट्ट होत चाललाय. मदत न मिळाल्यास पुढचा हंगाम उभा करणे अशक्य आहे. ही आमच्या जगण्याची लढाई आहे, आणि शासनाने तात्काळ निर्णय घेतला पाहिजे.

**निखिल भोपळे,**
शेतकरी, अंजनगाव बारी

# जी एच रायसोनी युनिव्हर्सिटातर्फे रविवारी पेंटिंग स्पर्धा

**अमरावती/का.प्र.**

जी एच रायसोनी युनिव्हर्सिटी, अमरावती आपले सामाजिक उत्तरदायित्व पार पाडत अमरावती शहरातील बालचित्रकारांपासून ते व्यावसायिकांपर्यंत सर्वांसाठी विषय-केंद्रित म्हणजेच थीम बेस पेंटिंग स्पर्धेचे आयोजन मे महिन्यात दर रविवारी ठेवण्यात आली आहे.

या स्पर्धेची सुरुवात ३ मे पासून अंजनगाव बारी रोडवरील युनिव्हर्सिटी परिसरात सुरु झाली असून या मालिकेचा दुसरा टप्पा. १७ मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ८:३० वाजता सुरू होणाऱ्या स्पर्धेची थीम 'पारंपारिक आणि समकालीन फ्यूजन' थीम वर आधारित आहे. या स्पर्धेत तीन वेग वेगळे ग्रुप असतील. ज्यामध्ये ८ ते १३ वर्षे, १४ ते २१ वर्षे आणि २१ वर्षावरील स्पर्धकांना सहभाग घेता येणार आहे.

प्रत्येक गटासाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी एकूण ३७,०००/- ची आकर्षक रोख पारितोषिक ठेवण्यात आली असून प्रोत्साहन पारितोषिके हि दिली जाणार आहे. स्पर्धेसाठी प्रति सहभागी ५९ इतकी नाममात्र नोंदणी फी ठेवण्यात आली आहे. स्पर्धेत प्रतिभागी होण्या करिता डॉ. अमर मोरे त्यांचाशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रुग्न सेवा हीच ईश्वर सेवा अंतर्गत साधना म्हस्के यांनी घेतले तपासणी शिबीर



**शिराळा-**रुग्ण सेवेचा प्रारंभ १२ मे पासून,शिराळा येथून साधना म्हस्के, यांच्या पुढाकाराने, रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा ह्या अंतर्गत सेवा सुरू करण्यात आली.ह्या मध्ये दर आठवड्याला गुरवारी शिराळा येथून बस सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.ह्या करिता राजेंद्र गोडे कॉलेज आणि हॉस्पिटल ह्यांचे सहकार्य घेण्यात येत आहे. ही सेवा सर्वच आजाराबाबत असून,ज्या रुग्णांना सदर सेवेचा लाभ घ्यायचा असेल त्यांनी साधना राजेंद्र म्हस्के,यांचे कडे नाव,वय,आजार,मो.न.ई.माहिती द्यावी.व येणाऱ्या गुरुवार करिता आपले नाव नोंदवावे.सकाळी ९.०० वा. सांगितल्या प्रमाणे जे स्थळ राहील. त्या ठिकाणी हजर राहायचे आहे.सोबत एक वेळ जेवणाचा डब्बा,घ्यायचा आहे.व १०रू. नोंदणी फी करिता घ्यावे.बाकी सेवा मोफत देण्यात येत आहे. ज्या ठिकाणाहून आपण बस मध्ये बसणार, तेथेच परत पोचून दिल्या जाईल. सर्व आपल्या शिराळा वासियांना आव्हान करण्यात येत आहे की ,या सेवेचा लाभ सर्वांनी घ्यावा .नाव नोंदणी करिता ,व अधिक माहिती करिता ७०३८७४९५७२ व ९८८१२२७००१ह्या मो.न.वर संपर्क साधावा. आज ललिता लामासे, सुनीता कालमेघ, चंदा भोवाळू. किर्तीमाला ढोक, पुष्प बुरांगे, विजय पावडे, विनोद कपडे, मनोहर बुरंगे, गजानन गंधे, गणेश बोराले, ललिता मानकर, देविदास मानकर, श्रद्धा देशमुख, मंदा येवतकर, नलिनी खाडे, वैशाली भोवालू यांनी या सेवेचा लाभ घेतला.


# सावंगा (विठोबा) येथे वैशाख अमावस्या निमित्त चंदन उटी उत्सव

## अधिक ज्येष्ठ मास भजन मांड कार्यक्रमाचा शुभारंभ

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यात असलेल्या प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे वैशाख अमावस्या निमित्त चंदन उटी उत्सव तसेच अधिक ज्येष्ठ मास अखंड जागृती भजन मांड कार्यक्रमाचा शुभारंभ आयोजित करण्यात आला आहे.

श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान यांच्या वतीने दि. १६ मे २०२६, रोजी दुपारी ५.०० वाजता संस्थान परिसरात भक्तिभावपूर्ण वातावरणात चंदन उटी उत्सव संपन्न होणार आहे. या प्रसंगी चंदनउटी नंतर बाहेरगावाहून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन अन्नदानदाते डॉ क्रांतिसागर पांडुरंग ढोले रा. चांदुर रेल्वे जि. अमरावती यांच्या वतीने व संस्थानच्या अन्नदान समितीचे नियंत्रणात करण्यात येत आहे. याच दिवशी पहाटे ५.०० वाजता संस्थानतर्फे अधिक ज्येष्ठ मास निमित्त आयोजित अखंड जागृती भजन मांड कार्यक्रमाचा शुभारंभ लहान मंदिरात ढाल बसवून होणार असून,मुख्य मंदिरात कृष्णाजी महाराजांचे गण सुमरनाने विश्वस्त मंडळ व भाविक भक्तांच्या उपस्थितीत भजनाचा गजर सुरू होईल.दि.१६ मे ते १५ जून २०२६ या कालावधीत अधिक ज्येष्ठ मास भजन मांडीचे आयोजन करण्यात आले आहे. या मांडीत दैनंदिन सहभागी अवधूत भजन मंडळाची संस्थान तर्फे दैनंदिन भोजन,चहा व नास्ता इ.व्यवस्था करण्यात आली आहे आणि सहभागी मंडळांना महाराजांची गाथा,संस्थानची टोपी व सन्मान पत्र देवून सन्मानित करण्यात येणार आहे.या मांडीत महाराजांच्या सेवे प्रती निस्वार्थ भावनेने व सेवाभावी वृत्तीने कार्य केले आहे अशा भाविकांचा संस्थान तर्फे सत्कार करण्यात येणार आहे. भाविकांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची नियमित बससेवा उपलब्ध आहे.चांदूर रेल्वे बसस्थानकातून: सकाळी ९.०० दुपारी ३.०० व सायंकाळी ७.१५ अमरावती बसस्थानकातून: सकाळी ७.३० व सायंकाळी ५.४५भाविकांनी अवैध वाहनांचा वापर टाळून अधिकृत बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तन मन धनाने सहकार्य करावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल तसेच विश्वस्त विनायक पाटील,वसंत शेंडे, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर,



प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी यांच्यासह समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाय.ई.एस. इंग्लिश स्कूलचा दैदिप्यमान यश



**नांदगाव खंडेश्वर-**येथे यशवंत शिक्षण संस्था संचालित वाय.ई.एस. इंग्लिश स्कूलचा इयत्ता १० वीचा १००% निकाल लागला आहे.

एकूण ३९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून त्यातील अरशीलहक हा. शेख (९७.२०%) यांनी तालुक्यात प्रथम, तर नंदनी इंगोले (९५.६०%) यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. श्लोक आंबुलकर (९२.८०%), काजल पायघाण (९०.६०%), आणि मनीष शेलारे (९०.२०%) यांनी अनुक्रमे तृतीय, चतुर्थ व पाचवा क्रमांक मिळवला.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक नारायण सोनोने, वर्गशिक्षिका वैशाली अंबडकर, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

# जनता हायस्कूल पूर्णा नगर विद्यालयाची एसएससी मध्ये उत्तुंग भरारी

**अंजनगाव बारी -** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संचालित जनता हायस्कूल पूर्णा नगर विद्यालयाने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी नोंदवत ९०.४१% असा उच्च निकाल नोंदवला आहे. एकूण ६३ विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थ्यांनी प्राविण्य, २५ विद्यार्थ्यांनी प्रथम तर ११ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी मिळवत परंपरेप्रमाणे यशाची घोडदौड कायम ठेवली. यंदाच्या निकालात



खुशी राजेश महिंगे हिने ९५.४०% गुणांसह तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवत चमकदार यश मिळवले. श्रावणी गणेश कथे हिने ९४.८०% गुणांसह द्वितीय तर अपूर्वा किशोर बोबडे हिने ९३% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला.या यशाबद्दल संस्था अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, शाळा निरीक्षक खाडे साहेब, पंडागळे साहेब व सर्व कार्यकारिणी सदस्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय वर्गशिक्षिका भारती देशमुख, सर्व शिक्षकवृंद, मुख्याध्यापिका नीलाक्षी गणगणे तसेच पालकांना दिले.शिक्षक उमक, डोईफोडे, भारती देशमुख, छाया आमोदे, नेरकर, तायडे, भोयर व इंगळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा दिल्या.विद्यालयाच्या मार्गदर्शन, परिश्रम व शिस्तीमुळे साध्य झालेल्या या उत्कृष्ट निकालाचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

# श्री.तनसुखदास राठी विद्यालयची यशाची परंपरा कायम



**कुऱ्हा-**श्री. गणेशदास राठी छात्रालय समिती अमरावती द्वारा संचालित तालुक्यातील नावलौकिक असलेली शाळा श्री. तनसुखदास राठी विद्यालय वऱ्हा या शाळेचा यावर्षीचा निकाल ८४.८८% लागलेला आहे. या वर्षी विद्यालयातून दहावीच्या बोर्ड परीक्षेला एकूण ८६ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. त्यापैकी वंशिका मलवार ही ८७.२०% टक्के गुण प्राप्त करून विद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तसेच द्वितीय क्रमांक सृष्टी गायकवाड ८५.८०% टक्के तृतीय क्रमांक वैशाली माळोदे ८३.८०% आणि चतुर्थ क्रमांक सेजल बद्रे ८३.४०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेली आहे .यावर्षी परीक्षेमध्ये प्राविण्य श्रेणीमध्ये १२ विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये २० विद्यार्थी, द्वितीय श्रेणी मध्ये ३३ विध्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयातून परीक्षेमध्ये यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे श्री गणेशदास राठी छात्रालय समिती अमरावतीचे अध्यक्ष वसंतकुमारजी मालपाणी, उपाध्यक्ष जुगल किशोरजी गट्टाणी, सचिव डॉ गोविंदजी लाहोटी, संस्थेचे सहसचिव तथा तनसुखदास राठी विद्यालय, वऱ्हा शाळा समिती अध्यक्ष मोहनबाबू कलंत्री,तसेच संस्थेच्या प्रशासकीय अधिकारी आभा लाहोटी व विद्यालयाचे माननीय मुख्याध्यापक संजय पाचंगेव सुरेंद्र गणोरकर, निवृत्ती सातपुते,नितीन पांडे,गंगोत्री गंगन,स्वाती राजनकर व विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

तसेच सर्व विद्यार्थ्यांना उज्वल शैक्षणिक भविष्याच्या वाटचालीस अनंत शुभेच्छा प्रदान केल्या.तसेच विद्यालयात अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकां विषयी व शाळेच्या मुख्याध्यापकांनी इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेच्या अभ्यासा बाबत केलेल्या मार्गदर्शना मूळे सर्व विध्यार्थी उत्तम गुण घेऊन उत्तीर्ण झाले याबद्दल ग्रामस्थांनी सर्वांचे कौतुक केले.

आणि शाळेविषयी तसेच संस्थेच्या पदाधिकारी यांच्या बद्दल आपला अतूट विश्वास व्यक्त केला.

# स्व.अतुल जगताप माध्यमिक विद्यालयाचा निकाल १०० टक्के

**चांदुर रेल्वे -** येथील स्व. अतुल जगताप माध्यमिक विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून एकुण ६३ विद्यार्थ्यापैकी ६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शाळेतून एकुण विद्यार्थ्यापैकी ३७ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत, १९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत ५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर २ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले शाळेतून प्रथम क्रमांक लावण्या राजेंद्र शिदोडकर ९४.२० टक्के गुण द्वितीय कमांक विशाखा उके वैष्णवी सोळंके ९३.८० टक्के गुण तर तृतीय क्रमांक ईशा गणवीर ९२.०० टक्के गुण पटकावीले वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे संस्थेच्या अध्यक्षा प्रा.उत्तरा जगताप सचिव प्रा. वीरेंद्र जगताप कोषाध्यक्ष परिक्षीत जगताप व विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.एस. तळोकारै शिक्षक काकडे, बोदिले, धोटे, आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्वाचे अभिनंदन केले.



# दोन मोजण्या...दोन निष्कर्ष, फायदा नेमका कोणाचा?

# गाजीपूर-रुदाळी खाण प्रकरण तापले; कोट्यवधींचे दंड प्रलंबित

## महसूल विभागाच्या भूमिकेवरच संशय

**अ‍ॅड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील पोपटखेड गट ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या गाजीपूर व रुदाळी परिसरातील गौण खनिज उत्खनन प्रकरणाने आता पर्यावरणीय किंवा महसुली अनियमिततेचा मुद्दा ओलांडत थेट महसूल यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. एकाच खाण परिसराच्या दोन वेगवेगळ्या मोजण्या, त्यातून आलेले परस्परविरोधी निष्कर्ष आणि कोट्यवधी रुपयांच्या दंड रकमा वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्याने 'नेमका फायदा कोणाचा?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या या आदिवासी बहुल पट्ट्यात मागील दीड दशकांपासून मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खनन सुरू आहे. मंजूर खाण आराखड्यांच्या चौकटीबाहेर जाऊन खोलवर उत्खनन, अतिरिक्त उत्खनन आणि नियमबाह्य खाणकाम झाल्याचे आरोप सातत्याने होत आहेत. विशेष म्हणजे, या खदानींच्या मोजण्या वेळोवेळी करण्यात आल्या, पंचनामे झाले, कोट्यवधी रुपयांचे दंडही ठोठावण्यात आले; मात्र प्रत्यक्ष महसूल वसुलीच्या बाबतीत प्रशासनाची भूमिका मात्र संशयास्पदरीत्या निष्क्रिय राहिल्याचा आरोप होत आहे.

### ६४ कोटींवरून थेट ४८ कोटींवर दंड; 'मोजणी' की 'मॅनेजमेंट'?

मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ मधील मोठ्या प्रमाणातील गौण खनिज उत्खनन प्रकरणी जमीनमालक विलास कालू चिमोटे आणि भाडेपट्टाधारक संतोष चांडक यांच्यावर सुरुवातीला तब्बल ६४ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. महसूल विभागाच्या कारवाईनंतर हे प्रकरण चर्चेत आले; मात्र काही काळातच पुन्हा ETS मोजणी करण्यात आली आणि आश्चर्यकारकरित्या दंडाची रक्कम कमी होत थेट ४८ कोटी रुपयांच्या घरात पोहोचली. या दोन मोजण्यांमध्ये नेमका फरक काय होता? पहिली मोजणी चुकीची होती की दुसरी? की दरम्यान काही 'सेटिंग' झाली? असे प्रश्न आता उघडपणे विचारले जाऊ लागले आहेत. स्थानिक नागरिकांच्या मते, दोन्ही पंचनाम्यांचे तांत्रिक परीक्षण झाल्यास कोट्यवधींचा दंड कमी होण्यामागचे वास्तव बाहेर येऊ शकते. विशेष म्हणजे, एवढा प्रचंड दंड ठोठावूनही त्याची वसुली अद्याप प्रलंबित आहे. त्याहून धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित भूखंडांवर अन्य औद्योगिक व्यवहार सुरूच असल्याचे सांगितले जाते. तर या प्रकरणातील संतोष चांडक यांनी शेजारीच असलेल्या गट क्रमांक ३७ मध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळाची आवश्यक ना-हरकत न घेता स्टोन क्रशर सुरू केल्याची माहिती समोर येत आहे. एवढ्या गंभीर स्वरूपाच्या महसुली आणि पर्यावरणीय उल्लंघनांनंतरही प्रशासनाकडून कठोर कारवाई दिसून येत नसल्याने संशय अधिकच गडद होत आहे. 'दंड आकारणे ही केवळ कागदी कारवाई आणि प्रत्यक्षात महसूल वसुली टाळणे, हा नवाच फॉर्म्युला प्रशासनाने शोधला आहे का?' अशी टीका पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिक करत आहेत.

### ठराविक खदानींचीच मोजणी?

गाजीपूर-रुदाळी परिसरात निवडक खदानींचीच ऊिए मोजणी करण्यात येत असल्याचे बोलले जात आहे. अनेक ठिकाणी मंजूर परवान्यापेक्षा अधिक खोलीत उत्खनन झाल्याचे दिसून येत असतानाही त्यांची अधिकृत मोजणी झालेली नाही. सर्व खदानींचे निष्पक्ष मोजमाप झाल्यास शासनाच्या महसुलात मोठी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### मार्च एंडिंगच्या नावाखाली 'वसुली'; पण शासनाचा महसूल मात्र हवेत?

मध्यंतरी मार्च एंडिंग आणि महसूल उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या पार्श्वभूमीवर अकोटचे उपविभागीय अधिकारी यांनी संबंधितांकडून सक्तीची वसुली करण्यासाठी RCC प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिल्याची माहिती आहे. मात्र हे निर्देश शासनाचा महसूल वसूल करण्यासाठी होते की केवळ दबावतंत्राचा भाग, असा सवाल आता उपस्थित होत आहे. कारण, कडक निर्देशांनंतरही तहसील कार्यालयाच्या स्तरावर प्रत्यक्ष वसुली झाली नाही. फाइलांची हालचाल, नोटिसा आणि कागदी प्रक्रिया यापलीकडे प्रशासन गेलेच नाही. परिणामी कोट्यवधींचा महसूल आजही थकबाकीच्या गर्तेत अडकून आहे.

### अवैध उत्खननाचा 'गोरखधंदा' अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने?

गाजीपूर-रुदाळी परिसरात अनेक खदानींमध्ये मंजूर खोलीपेक्षा अधिक उत्खनन झाल्याचे आरोप वारंवार होत आहेत. काही ठिकाणी तात्पुरत्या परवान्यांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात गौण खनिज उपसा झाल्याचे सांगितले जाते. मात्र आश्चर्य म्हणजे, अनेक खदानींची आजतागायत अचूक मोजणीच झालेली नाही. त्यामुळे महसूल विभाग निवडक खदानींचीच मोजणी करतो का? आणि उर्वरित प्रकरणांकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जाते का? अशी चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे. पर्यावरणप्रेमींच्या मते, 'या परिसरातील सर्व खदानींचे सॅटेलाइट मॅपिंग आणि स्वतंत्र तांत्रिक मोजणी झाली तर हजारो कोटींच्या महसुली घोटाळ्याचे वास्तव समोर येऊ शकते.'

### २०१९ पासून ५८ कोटींचा दंड 'सातबारातच कैद'-

याच परिसरातील आणखी एका प्रकरणात गट क्रमांक २ मधील बाळू शंकर सोयाम व इतरांवर २०१९ मध्येच तब्बल ५८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. मात्र या दंडाची वसुली करण्याऐवजी महसूल विभागाने तो बोजा सातबारावर चढवून प्रशासनिक जबाबदारी संपल्यासारखी भूमिका घेतल्याची टीका होत आहे. स्थानिकांच्या मते, 'दंड आकारण्याची आकडेवारी दाखवून शासनाची दिशाभूल केली जाते; पण प्रत्यक्षात महसूल वसुली शून्यच आहे.' असा आरोप करण्यात येत आहे.

---

# साऊर येथे भीषण आग; दोन घरांचे मोठे नुकसान

**सुदैवाने जीवित हानी टळली**



**टाकरखेडा शंभू/ प्रतिनिधीः-** साऊर येथे बुधवारी दुपारी एक ते दीड वाजण्याच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत दोन घरांचे मोठे नुकसान झाले. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र एका घराचे पूर्णपणे नुकसान होऊन संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, गावातील रत्ना संजय सोळंके यांच्या घराला अचानक आग लागली. शुद्धमती तंतरपाळे यांच्याही घराचे आग लागल्याने नुकसान झाले. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तत्काळ आग विझविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली व शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात आली.

या आगीत घरातील धान्य, कपडे, भांडी ☞(पान २ वर)

# चांदुर रेल्वेत गोवंश तस्करी करणारे दोघे ताब्यात

## ६.६० लाखांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदुर रेल्वे पोलिसांनी गोवंश तस्करी करणाऱ्या दोन आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून ६ गोवंशीय जनावरांसह ६.६० लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. इर्शाद खान युसुफ खान (वय ३६, हैदरपुरा) व शेख हारून शेख महबूब (वय ४५, मांडवा चांदुर रेल्वे) असे अटक आरोपींची नावे आहे.

माहिती नुसार चांदुर रेल्वे पोलिसांचे पथक पेट्रोलिंग करीत असताना गुप्त माहिती मिळाली की मांडवा परिसरातून गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक होणार आहे. या माहितीवरून पोलिसांनी नाकाबंदी करून टाटा झेनॉन पिकअप एमएच १२ जेएफ ३७८५ वाहनाची तपासणी केली असता यामध्ये २ लाख ☞(पान २ वर)

# अमरावतीत पुन्हा एमडीचा साठा जप्त; गुन्हे शाखेची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरात अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याविरोधात अमरावती गुन्हे शाखेने आणखी एक निर्णायक कारवाई करत एमडी (मेफेड्रोन) विक्रीसाठी फिरणाऱ्या एका संशयिताला ताब्यात घेतले. या कारवाईत तब्बल २७ ग्रॅम एमडीसह दुचाकी वाहन असा एकूण ४.६५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुप्त माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साहू बाग, विलासनगर परिसरात सापळा रचला होता. संशयित हालचाली आढळल्यानंतर पोलिसांनी एका व्यक्तीची तपासणी केली असता त्याच्याकडे एमडी ड्रग्ज आढळून आले. पोलिसांनी तत्काळ त्याला ताब्यात घेतले.अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव इलियास अली महेबूब अली (वय ४०, रा. अन्सारनगर, ☞(पान २ वर)

---

# शेतकऱ्याला हनी ट्रॅप मध्ये अडकून ७० लाखांची खंडणी उकळली

## आरोपी दांपत्याविरुद्ध गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या क्षेत्रात एका ६४ वर्षीय शेतकऱ्याला 'हनी ट्रॅप'मध्ये अडकवून त्याच्याकडून तब्बल ७० लाख रुपयांची खंडणी उकळल्याचा थरार उघड झाला आहे. माहिती नुसार पीडित शेतकरी हे नांदगाव पेठ परिसरातील रहिवासी आहेत. त्यांचे शहरात राधानगरमध्ये घर आहे. त्यांची ओळख गाडगेनगर भागात एका मोबाइल शॉपी आणि झेरॉक्स दुकान चालवणाऱ्या दाम्पत्याशी झाली. सुरुवातीला फक्त मोबाइल रिचार्ज आणि झेरॉक्स काढण्यासाठी जाणाऱ्या या शेतकऱ्याला त्या दुकानदाराच्या पत्नीने आपल्या सौंदर्याच्या आणि गोड बोलण्याच्या जाळ्यात ओढले. दोघांमधील ओळख वाढत गेली. त्यातून शारीरिक संबंध प्रस्थापित झाले. मात्र, हे संबंध म्हणजे एका मोठ्या कटाचा भाग होते.

एकदा जाळ्यात अडकल्यानंतर आरोपी दाम्पत्याने खरा चेहरा दाखवला. बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करू, अशी धमकी देऊन या दाम्पत्याने गेल्या चार वर्षांत टप्प्या टप्प्याने वृद्ध शेतकऱ्याकडून तब्बल ७० लाख रुपये उकळले. आपली बदनामी होईल, या भीतीने पीडित शेतकरी निमूटपणे पैसे देत राहिला. मात्र, ही मागणी थांबत नसल्याचे पाहून अखेर त्यांनी पोलिसांचे दार ठोठावले. हा प्रकार सोमवारी रात्री उशिरा उघडकीस आला. पीडित शेतकऱ्याने दिलेल्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलिसांनी कारवाई करत ☞(पान २ वर)

# कारागृहाच्या लोखंडी गजावर बंद्याने आदळलं डोकं


## यवतमाळवरून अमरावतीत आणल्यावर गोंधळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** हत्या प्रकरणात एमसीआर वर कारागृहात पाठविण्यात आलेल्या एका बंदिने आज बुधवार १२ मेच्या दुपारी कारागृह परिसरात जोरदार हंगामा केला. यवतमाळ कारागृहातून अमरावती कारागृहामध्ये पाठवल्यावर नाराज झाल्याने बंद्याने बॅरेकमध्ये लोखंडाच्या गजावर डोके आपटून स्वतःला जखमी केले. या घटनेमुळे कारागृह प्रशासनात एकच खळबळ उडाली. मनोहर सावतकर (यवतमाळ) असे जखमी कैद्याचे नाव आहे. त्याला सुरक्षा व्यवस्थेअंतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. माहितीनुसार बंदि शरद सावतकर विरुद्ध यवतमाळ जिल्ह्यात हत्येचे प्रकरण दाखल आहे. न्यायालयाने त्याला एमसीआरवर यवतमाळ कारागृहात पाठवले होते. चार महिने पूर्वी प्रशासकीय कारणास्तव त्याला अमरावती कारागृहात स्थानांतरित करण्यात आले. तेव्हापासून तो कारागृहातील अधिकाऱ्यांजवळ त्याला यवतमाळ पाठवण्याची मागणी करत होता. बुधवारी दुपारी बारा वाजता शरद



सावतकरने एमसीआर बॅरेकमध्ये अचानक हंगामा सुरू केला. सर्वांच्या नजरे देखत तो बॅरेक मधील लोखंडी सळई वर डोके आदळू लागला. यामुळे त्याच्या डोक्यावर मार लागला आणि त्याचे रक्त वाहू लागले. या प्रकरणानंतर कारागृहात एकच खळबळ उडाली. कारागृहातील कर्मचाऱ्यांनी त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात बंदीजणासाठी चार बेड उपलब्ध आहेत. इथे आधीच सहा कैदी उपचार घेत आहे. अशात शरद सावतकर याला ट्रामा केअर युनिटमध्ये भरती करण्यात आले आहे. जेथे त्याच्यावर उपचार सुरू आहे.या प्रकरणानंतर कारागृह प्रशासनाच्या वतीने रिपोर्ट तयार करण्याचे काम सुरू आहे. तसेच त्याच्या विरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बंद रुग्णालयातील पाण्याच्या टाकीत आढळला कुजलेला मृतदेह





## -पठाण चौकात खळबळ

**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरातील पठाण चौक परिसरात बुधवारी सकाळी एका धक्कादायक घटना उघडकीस आली. अनेक दिवसांपासून बंद असलेल्या रुग्णालयातील पाण्याच्या टाकीत अज्ञात व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. मृताची ओळख अद्याप पटलेली नसून, हा प्रकार हत्या आहे की आत्महत्या, याबाबत पोलिस तपास करत आहेत.

माहितीनुसार, डॉ. वजीर पटेल संस्था संचलित रुग्णालय काही दिवसांपासून बंद अवस्थेत आहे. गेल्या काही दिवसांपासून परिसरात दुर्गंधी पसरत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संशय निर्माण झाला होता. अखेर बुधवारी सकाळी नगरसेवक राशीद अली व सामाजिक कार्यकर्ते वाहिद खान यांनी नागपुरी गेट पोलिसांना माहिती दिली.

माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत रुग्णालयाचे कुलूप तोडून आत तपासणी केली. तपासादरम्यान छतावरील पाण्याच्या टाकीमध्ये एका व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. मृतदेहाची अवस्था अत्यंत खराब असल्याने तो अनेक दिवसांपासून टाकीत असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेनंतर पोलिसांनी तातडीने फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि श्वान पथकाला घटनास्थळी ☞(पान २ वर)

---

# पहाटे टोकन, दिवसभर उन्हात रांगा वलगावच्या इंण्डेन गॅस वितरका विरोधात नागरिकांचा संताप

## १६००० ग्राहकांचा भार कमी करून स्वतंत्र वितरण देण्याची मागणी

## -जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-** वलगाव परिसरातील ग्रामीण ग्राहकांना घरगुती गॅस सिलेंडर वितरणात होत असलेल्या गैरसोयीबाबत नवीन गॅस एजन्सी सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते शुभम जवंजाळ यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, वलगाव येथील Indian Oil Corporation अंतर्गत कार्यरत नितेश इंण्डेन गॅस वितरकाकडून ग्रामीण भागातील ग्राहकांना गॅस सिलेंडर वितरणात मोठ्या प्रमाणात अनियमितता होत आहे. वितरण व्यवस्थापनातील त्रुटी, ग्राहकांशी अभद्र वर्तन तसेच घरपोच सेवा न मिळाल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी घरपोच मिळणारे सिलेंडर आता वलगाव कार्यालयातून टोकन पद्धतीने वितरित केले जात आहेत. पहाटे ३ वाजल्यापासून टोकन वाटप सुरू होत असून ग्राहकांना सिलेंडर मिळविण्यासाठी चांगापूर येथील गोदामावर सकाळपासून रांगेत उभे राहावे लागत आहे. ☞(पान २ वर)

# पिंपळखुटा येथील नाल्यात आढळला मानवी सांगाडा

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या पिंपळखुटा शेत परिसरात अज्ञात इसमाचा सांगाडा आढळल्याने खळबळ उडाली. दोन शेतांच्या मधात वाहणाऱ्या नाल्यात हा मानवी सांगाडा दिसताच गावातील नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. माहितीनुसार पिंपळखुटा परिसरात डॉक्टर डहाणे आणि उत्तम भगत यांच्या शेताच्या मधातून वाहणाऱ्या नाल्यात मानवी सांगाडा दिसल्याची माहिती पोलीस पाटील विनोद अर्मळ यांनी फ्रेजरपुरा पोलिसांना दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक तिथे दाखल झाले. त्यांनी संपूर्ण परिसर सील करून तपास सुरू केला. फॉरेन्सिक टीम आणि श्वान पथकलाही घटनास्थळी बोलविण्यात आले होते. फ्रेजरपुराचे ठाणेदार रोशन शिरसाट, सहाय्यक आयुक्त कैलाश पुंडकर, गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संपूर्ण परिसराचे निरीक्षण केले.सांगाडा जिल्हा सामान्य रुग्णालयात तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे. विविध पोलीस ठाणे हद्दीत बेपत्ता असणाऱ्या लोकांचे रेकॉर्ड पोलीस तपासात आहे. यामुळे मृताची ओळख पटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आरोग्य अधिकारी जाधव व कोणार्क कंपनीच्या मनमर्जीमुळे सफाई व्यवस्था डबघाईस

## १० लाख नागरिकांचे स्वास्थ धोक्यात -माजी नगरसेवक मुन्ना राठोड यांचा आरोप



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय कारकिर्दीमध्ये तत्कालीन मनपा आयुक्त डॉ. प्रवीण आष्टीकर व देविदास पवार यांनी आपल्या आर्थिक विकासाकरिता दैनंदिन साफसफाई व्यवस्था ही झोननिहाय प्रणाली सुरू केली होती व आष्टीकर यांनी आपल्या जवळच्या कार्यकर्त्यांना नियम बाहय पद्धतीने तीन वर्षाचा कंत्राट दिला होता. तीन वर्षांमध्ये साफसफाई व्यवस्था पूर्णपणे डबघाईस आली होती. या विरोधात सामाजिक संघटनेने आंदोलन केले आणि जनतेचा रोष पाहता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये याचिका दाखल करण्यात आली होती,याची दखल घेत उच्च न्यायालयाने हा कंत्राट रद्द केला. त्यानंतर तत्कालीन मनपा युक्त सौम्या शर्मा यांनी सत्ताधारी पक्षांच्या नेत्यासोबत चर्चा करून कोणार्क कंपनीला निविदा अटी शर्ती शिथिल करून ३०० कोटीचा कंत्राट दिला. पण आरोग्य अधिकारी डॉ. अजय जाधव आणि कंपनी संचालकांच्या मनमर्जीमुळे शहरात स्वच्छतेची व्यवस्था डबघाईस आल्याचा आरोप आज बुधवार १३ मे रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत माजी नगरसेवक मुन्ना राठोड यांनी केला आहे. त्यांनी सांगितले की, शहरातील ☞(पान २ वर)